

किंमत ₹ ८०
पृष्ठसंख्या ७६

# पालकनीती

पालकत्वाला वाहिलेले मासिक

वर्ष १५ • अंक ७ • ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१५



शंभराचं आहे, मुलांकडे आहेत
शंभर भाषा, शंभर हात, शंभर विचार

# AUROBINDO

COMMITTED TO HEALTHIER LIFE

## Forstavir-3 Tablets

(Tenofovir Disoproxil Fumarate 300mg + Emtricitabine 200mg + Efavirenz 600mg)

## Forstavir-EM

(Tenofovir Disoproxil Fumarate 300mg + Emtricitabine 200mg Tabs)

**Better option to 3TC Containing regimen**

## HIVUS-LR

(Lopinavir 200mg + Ritonavir 50mg Tabs)

US FDA approved

### Zidovex L+E Kit

Kit of 2 Tabs of Zidovudine 300 mg + Lamivudine 150 mg
&1 Tablet of Efavirenz 600 mg

### Zidovex - LN

Zidovudine 300 mg + Lamivudine 150 mg + Nevirapine 200 mg

### Forstavir-L

Tenofovir 300 mg + Lamivudine 300 mg

### Forstavir-LE

Tenofovir 300 mg + Lamivudine 300 mg
Efavirenz 600 mg

### Zidovex - L

Zidovudine 300 mg + Lamivudine 150 mg

### Viranz 600

Efavirenz 600 mg

Veritaz

Building Happier Lives Through Medicare

Veritaz Healthcare Limited H. No. 1/121, Sy No. 66 & 67 Part, Seriling ampally Mandal, Miyapur, Hyderabad 500 050 Mob - 9850220198

HETERO
Genx
ART CARE
at every lap of life




*With Best Compliments from*

**Tenolam-AR kit**
Tenofovir 300 mg + Lamivudine 300 mg and Atazanavir 300 mg + Ritonavir 100 mg Tablets

**Trustiva** 1 O.D.
TENOFOVIR 300 MG + EMTRICITABINE 200 MG + EFAVIRENZ 600 MG TABLETS

**TENOLAM-E**
TENOFOVIR 300 MG + LAMIVUDINE 300 MG + EFAVIRENZ 600 MG TABLETS

*With Best Compliments From*

# Xquisite Print Solutions Pvt. Ltd.

34/8, Erandawane, Parashuram Process Building
Near Mehandale Garrage, Pune - 411004.
Phone : 2545 9251, 2545 9252

**पा ल क नी ती**
पालकत्वाला वाहिलेले मासिक

**संपादक**
संजीवनी कुलकर्णी

**संपादक मंडळ**
प्रकाश अनभूले
मधुरा राजवंशी
वसीम मणेर
सोमीनाथ घोरपडे
नीला आपटे
मंजिरी निंबकर

**अतिथी संपादक**
नीलिमा गोखले

**मुखपृष्ठ, अंक मांडणी व रेखाटने**
वसीम मणेर

**मुखपृष्ठ**
'पोळ्याचा बैल'
आनम शेख, वय ६ वर्षे
कमला निंबकर बालभवन, फलटण

**अक्षरजुळणी**
स्वाती जामदार

**मुद्रण**
ग्रीन ग्राफिक्स, पुणे

**जानेवारी ते डिसेंबर २०१६ साठी वर्गणी रु.२५०**

वर्गणीचा चेक / ड्राफ्ट
'पालकनीती परिवार'
या नावाने काढावा.

पालकनीती परिवाराचे प्रकाशन
वर्ष १५ वे अंक ७ वा
ऑक्टोबर नोव्हेंबर २०१५

**संपर्क :**
**पालकनीती परिवार,**
प्रगत शिक्षण संस्था
रिंग रोड, लक्ष्मीनगर, फलटण ४११५२३
०२१६६ २२३०४१
psspalakneeti@gmail.com
www.palakneeti.org



# अ नु क्र म

**मुलांच्या शंभर भाषा** / लोरिस मालागुझी / ५
**संवादकीय** / ६
**मूल शंभराचं आहे** / शलाका देशमुख / ८
**निळी भिरभिरी, सुरस्सू आणि इतर गोष्टी** / सतीश आवटे / ११
**सावली** / राजीव तांबे / १४
**बाटकीचा** / प्रकाश अनभूले / १६
**मुलांचे सुप्त गुण** / आभा भागवत / १८
**चित्रामागचं चित्र** / यशवंत देशमुख / २२
**बैदा** (कथा) / वसीम मणेर / २६
**माझ्या जन्माचं चित्र** / संजीवनी कुलकर्णी / ३०
**नकाशा** (चित्रकथा) / समीरा कुरेशी / ३३
**टिंबाकडून अक्षराकडे** / मंजिरी निंबकर, नीलिमा गोखले / ३५
**निसर्गाची शाळा** / सुनील करकरे / ४२
**गजरा** / मालविका झा / ४६
**चंदूचा मेंदू आणि शंभर शक्यता** / सुबोध केंभावी / ४८
**हत्तीचं वजन** / मधुरा राजवंशी / ५२
**वंचित समाजातील मुलांच्या ऊर्जांना वाव हवा** / राजन इंदुलकर / ५५
**जीवाचे बांधकाम** / गीतांजली चव्हाण / ६२
**आक्का, करेक्ट!** /नीलिमा सहस्रबुद्धे / ६३
**मज्जेत शिकण्याचा जादुई मंत्र** / प्रकाश बुरटे / ६५

**अंकरचनेत सहभागी असलेल्या सर्व लेखक, चित्रकार, छायाचित्रकार आणि जाहिरातदारांचे मन:पूर्वक आभार!**

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही. या अंकात प्रदर्शित केलेली सर्व मते ही लेखकांची व्यक्तिगत समजावीत.

## मुलांच्या शंभर भाषा

मूल
शंभराचं आहे.
मुलाकडे आहेत,
शंभर भाषा
शंभर हात
शंभर विचार
खेळण्याच्या, बोलण्याच्या, विचार करण्याच्या पद्धती
ऐकण्याच्या पद्धती
आनंद घेण्याच्या
प्रेम करण्याच्या
मजा करण्याच्या
गाण्याच्या
शंभर ठिकाणं शोधण्याच्या
समजून घेण्याच्या पद्धती
शंभर ठिकाणची स्वप्नं बघण्याच्या

मुलांकडे असतात शंभर भाषा
(आणि खरं तर आणखी शेकडो)
पण ते त्यातल्या नव्याण्णव चोरतात.
शाळा आणि कल्चर
अलग करतात
शरीर आणि मेंदूला.
ते मुलांना सांगतात
हात न वापरता विचार करा
डोकं वापरू नका
बिन बोलता फक्त ऐका
आनंद न घेता फक्त समजून घ्या

ते सांगतात मुलांना
जे दिसतंय त्याचाच शोध घ्या फक्त
आणि अशा प्रकारे ते
नव्याण्णव काढून घेतात
शंभरातले.

ते सांगतात मुलांना,
काम आणि खेळ
सत्य जग आणि आभासी जग,
विज्ञान आणि कल्पना
आकाश आणि धरा
तर्क आणि स्वप्न
कधी एकत्र असूच शकत नाहीत.
आणि असं
सांगतात
ते मुलांना की
शंभर नाहीचेत मुळी.
मूल म्हणतं
बिलकुल नाही
शंभर आहेतच मुळी
अगदी नक्की.

**लोरिस मालागुझी**
**भाषांतर: मंजिरी निंबकर**




## Hundred languages of children

The child is made of one hundred.
The child has
a hundred languages
a hundred hands
a hundred thoughts
a hundred ways of thinking
of playing, of speaking.
A hundred.

Always a hundred
ways of listening
of marveling, of loving
a hundred joys
for singing and understanding
a hundred worlds
to discover
a hundred worlds
to invent
a hundred worlds
to dream.

The child has
a hundred languages
(and a hundred hundred hundred
more)
but they steal ninety-nine.
The school and the culture
separate the head from the body.
They tell the child:
to think without hands
to do without head
to listen and not to speak
to understand without joy
to love and to marvel
only at Easter and at Christmas.

They tell the child:
to discover the world already there
and of the hundred
they steal ninety-nine.

They tell the child:
that work and play
reality and fantasy
science and imagination
sky and earth
reason and dream
are things
that do not belong together.

And thus they tell the child
that the hundred is not there.
The child says:
No way. The hundred is there.

-**Loris Malaguzzi**

प्रिय वाचक,

या वर्षी पालकनीतीचे अंक फलटणच्या प्रगत शिक्षण संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या संकल्पना -आखणी-मांडणीतून उतरलेले आहेत हे आपल्याला माहीत आहेच. जानेवारीपासून या गटाने अतिशय सुंदर अंक आपल्याला दिले आहेत. या संस्थेची ग्रामीण पार्श्वभूमी आणि त्यातही शाळा आणि अनेक शैक्षणिक उपक्रम असल्यामुळे इथल्या शिक्षण-पालकत्व विचारांना मातीचा अनवट सुगंध आहे असंच हे अंक वाचताना जाणवतं. तरुणाईचा विशेष सहभाग असल्यामुळे साहजिक येणारी धडाडी आणि हो, नव्या माध्यमांचा आजवर पालकनीतीत क्वचितच असलेला संदर्भही या वर्षभरातल्या अंकांमध्ये आवर्जून दिसला. नवबाल-शिक्षणासारख्या विषयामधले तज्ज्ञही आपल्याला ह्याच वर्षी अंकांमधून भेटले. आजवरच्या अंकांपेक्षा सरस म्हणावेत असे अंक यावर्षी आपल्याला वाचायला मिळालेत. मुख्य म्हणजे, पालकनीती बंद व्हायची शंका आल्यावर संपादनाचा अनुभव नसतानाही ह्या गटानं हिरीरीनं पुढे होऊन ते आव्हान स्वीकारलं, हे खचितच कौतुकास्पद आहे.

पालकनीती सुरू राहावी इतकंच नाही तर बहरत जावी, त्यामध्ये वैचारिक आणि सर्जनशील वैविध्य यावं यासाठी हा एक आगळा-वेगळा प्रयोगच आपण करत आहोत. फलटण गटानं एक वर्षभरातले अंक तयार केल्यानंतर पुढच्या वर्षासाठी 'क्वेस्ट' (क्वालिटी एज्युकेशन सपोर्ट ट्रस्ट) या शिक्षणक्षेत्रात भरीव काम करणाऱ्या संस्थेनं प्रतिसाद दिलेला आहे! २०१६ सालातील अंकांची संपादनधुरा क्वेस्टचे साथी घेणार आहेत.

२००७ साली स्थापन झालेल्या क्वेस्ट संस्थेचं काम महाराष्ट्र राज्यातल्या मुख्यत: आदिवासी पाडयांमधल्या आणि वंचित गटांमधल्या मुलांबरोबर चालतं. बालशिक्षण आणि प्राथमिक शिक्षण यांमधला गुणवत्ताविकास आणि त्याचबरोबर शिक्षकांच्या क्षमता वाढवणं हे संस्थेचं उद्दिष्ट आहे. नवीन शिक्षणव्यवस्था निर्मिण्यापेक्षा सरकारी रचनांचा दर्जा उंचावण्याचं आव्हान क्वेस्टनं स्वीकारलं आहे. राज्यातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयं, २० आश्रमशाळा, ११० अंगणवाड्यांबरोबरही क्वेस्टचं काम चालतं. याशिवाय धुळे, जालना, नंदुरबार, पालघर आणि रत्नागिरी जिल्ह्यात शिक्षणविषयक अनेक प्रकल्पही चालू आहेत. शिक्षक अभ्यास मंडळ, मुलांच्या साक्षरतेच्या संदर्भातील संशोधन-प्रकल्प आणि शिक्षकांसाठी वेबसाईटवरचे ऑनलाईन वर्ग हे संस्थेचे विशेष उपक्रम आहेत.

शिक्षणाशी आणि त्यातही ग्रामीण आणि आदिवासी परिघाशीही सांगत्य असल्याचा परिणाम त्यांच्या अंकांच्या मांडणी-बांधणीवरही होणार आहे. आम्हाला ही पर्वणी वाटते आहे. बालशिक्षणाची आजची स्थिती अधिक सकस व्हावी यासाठी क्वेस्ट फार मोलाचं काम करत आहे. त्यामुळे शिक्षणाचा मुद्दा त्यांच्या अंकात उठावानं येणार यात शंकाच नाही. मात्र शिक्षणाबद्दलची मांडणी होताना पालकपणाचा मुद्दा हरवला जाऊ नये, अशीही आमची अपेक्षा आहे. या दोनही मुद्द्यात साम्य तर आहेच पण एक वेगळेपणही आहे. शिक्षणाबद्दल आजच्या काळात अनेक नियतकालिकं उपलब्ध होतात, पालकांसाठी मात्र अगदीच कमी, पालकनीतीसारखं एखादंच. अर्थात त्यासाठी आपण सगळेच मदतीला आहोत, असा विश्वास आपल्या सर्वांच्या वतीनं क्वेस्टगटाला आम्ही दिला आहे.

पालकनीती हे संवादाचं माध्यम आहे. म्हणूनच आजवरच्या संपादक-वाचकपरिवारानंही पालकनीतीच्या या नव्या प्रयोगांमध्ये सहभागी व्हावं, आणि या नव्या गटाला सर्वतोपरी सहकार्य करावं अशी आठवण आणि विनंती करत आहोत.

जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१६ या कालावधीतले अंक तर क्वेस्टच्या संपादनातले असतीलच, असं ठरवलं आहे. पालकनीतीच्या परिवारात प्रगत शिक्षणसंस्थेसोबत क्वेस्टही सामील होत आहे, त्यांचं प्रसन्न स्वागत!

**पालकनीती परिवार**

# संपादकीय

साल १९४५. दुसरे महायुध्द संपले होते. इटलीच्या ईशान्येकडे असणाऱ्या रेजिओ एमिलिया या नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असलेल्या भागातील युद्धावर गेलेले अनेक तरुण सैनिक कधी परतलेच नाहीत. आपल्या समाजाची बांधणी आता आपणच करायला हवी ही जाणीव झालेल्या स्त्रियांच्या एका गटाने युद्ध संपल्याची घोषणा झाल्यानंतर सहा दिवसांत एक शाळा सुरू करण्याचे ठरवले. त्यांच्या मदतीला होता, लोरिस मालागुझी नावाचा एक तरुण शिक्षक.

युद्धाने होरपळलेल्या या भागाने हा निर्णय घेतला आणि सारे कामाला लागले. बायकांनी पडक्या इमारतींच्या विटा काढून, धुऊन ठेवायला सुरुवात केली. शाळा बांधण्यासाठी जमीन एका शेतकऱ्याने दिली होती. वाळू नदीतून काढली होती, वासे आणि इतर लाकूड पडक्या इमारतींमधून काढून आणले होते आणि कामगार व मजूर म्हणून अख्खा गाव तयार होता. बांधकामासाठी लागणारा पैसा उभा करण्यासाठी जर्मन सैन्याने माघार घेताना सोडून दिलेला एक रणगाडा, काही ट्रक व काही घोडे विकायचे ठरले. आणि शाळा चालवायला पैसा? 'आणू कुठून तरी,' हे उत्तर होते युद्धाची भीषणता अनुभवलेल्या या साध्या-सुध्या शेतकरी-कामकरी माणसांचे. केवळ ८ महिन्यांत त्यांनी शाळा उभी करून दाखवली. बघता बघता रेजिओ एमिलिया परिसरात अशा ७ शाळा उभ्या राहिल्या.

दुसऱ्या महायुद्धानंतर समाज वेगाने बदलत होता. नव्हे, नव्याने घडत होता. तरुण पालक आपल्या मुलांसाठी सामाजिक सुविधा व शिक्षण मागत होते. त्यांना चांगल्या, गुणवत्तापूर्ण शाळा पाहिजे होत्या. भेदभावापासून, धार्मिक शिक्षणापासून दूर असलेल्या शाळा.

आतापर्यंत लहान मुलांच्या शिक्षणावर जणू कॅथलिक चर्चचा एकाधिकार होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर बदलणाऱ्या समाजाला आता धर्मनिरपेक्ष शाळा हव्या होत्या. अशा शाळा जेथे समता असेल, प्रत्येक मूल स्वप्रयत्नाने शिकू शकेल आणि जिथे मुलांच्या मनातील कुतूहलाचीही जपणूक होईल. या शिक्षकांनी जणू वसा घेतला होता, स्वतःचे पारंपरिक शिक्षणविचार बाजूला ठेवून मुलांकडून, समाजाकडून, परिसरात घडणाऱ्या घटनांकडून शिकण्याचा! थोर शिक्षणतज्ज्ञ पियाजेंचे सिद्धांत त्यांनी मार्गदर्शक ठरवले. पियाजे म्हणतात, मुलांनी जर आपणहून शोध घ्यायला सुरुवात केली आणि जर अंक, आकार, मिती, वर्गीकरण, मापन, बदल या सर्व संकल्पना मुलांच्या रोजच्या आयुष्याचा, विचार करण्याचा, बोलण्याचा एक अविभाज्य भाग बनल्या तर त्या मातृभाषेगत सहज होऊन जातात.

या छोट्या शाळांमधील शिक्षक आणि पालक झपाटलेले होते. मनात भीती होती. पण उत्साह त्यापेक्षा दांडगा होता. शिकवण्याचा अनुभव नव्हता. एका साध्या विचाराने सर्वांना प्रेरित केले होते. **मुलांबद्दलच्या आणि मुलांसाठीच्या सगळ्या गोष्टी मुलांकडूनच शिकल्या पाहिजेत.** कारण पालक, शिक्षक इत्यादी प्रौढ मंडळी जेव्हा मुलांच्या शिकण्याचा, शिक्षणाचा विचार करतात तेव्हा त्यांना त्यांच्या स्वतःच्या अनुभवांच्या आणि ज्ञानाच्या मर्यादा पडतात. मूल कसे विकसित होते व शिकते, मुलाचे स्वत्व किंवा ओळख कुठून येते, मुलांच्या गरजा, इच्छा आणि हक्क काय आहेत याची उत्तरे आपण स्वतःवरून आणि स्वतःच्या मुलांबद्दलच्या अपेक्षांवरून मिळवतो. मुलांचा बुद्धीचा आवाका प्रचंड वाढत असतो, असे आपण म्हणतो; पण प्रत्यक्षात त्यावर आपण विश्वास ठेवत नाही. कारण मुले काय म्हणताहेत, त्याकडे आपण कधी लक्षच देत नाही. उलट 'त्यांना काय कळतंय' असे म्हणून सूचना देण्यातच गुंग असतो. 'शोध' घेण्यातून शिकण्याच्या पद्धतीचा आग्रह धरतो, पण त्यांना मोकळे सोडायला कचरतो. 'हे तुला जमणार नाही', 'तू अजून लहान आहेस' याऐवजी 'चल, आपण करूया' असे म्हणायला तरी आता आपण शिकले पाहिजे.

रेजिओ एमिलियाने नेमके हेच केले आणि आज बालशिक्षणासाठी रेजिओ एमिलिया बालशाळा जगप्रसिद्ध आहेत. या बालशाळांमधील मुले प्रदीर्घ प्रकल्पात विविध कामे करतात. कधी ती आठवडाभर सुपर मार्केटला भेट देऊन शाळेत एक मार्केट उभे करतात. आपण काय पहिले ते चित्रे, प्रतिकृती, चिखलकामातून उभे करतात. कधी कोणी पालक त्यांना महिनाभर वाइन करायला शिकवतात. कधी कधी शाळा गावातल्या चौकात भरते. आयुष्यभर शिक्षण चालू असते असे आपण म्हणतो तेव्हा मुलांच्या शाळेबाहेर घडणाऱ्या अशा शिक्षणाची सजग नोंद आपण घ्यायला हवी, त्याचा गांभीर्याने विचार करायला हवा, त्या शिक्षणाचा आदर करायला हवा अन औपचारिक शिक्षणात त्याला आदराने स्थानही द्यायला हवे – हे आपल्याला रेजिओ एमिलियाचे तत्त्वज्ञान सांगते.

मुले तासन्तास एखाद्या मुंगीचे निरीक्षण करू शकतात. का? सिनेमाची पोस्टर्स रंगवली जाताना तासन्तास बघत बसतात, का? हिरव्या झाडांच्या सावल्याही हिरव्या रंगवाव्या असे त्यांना का वाटते? मुलांना पडणारे प्रश्न जेव्हा आपल्याला पडतील आणि त्यांची उत्तरे शोधायचा प्रयत्न आपण करू, तेव्हाच कळेल की आपणच निर्माण केलेली ही शिकण्याची बंद चौकट अगदी एकेरी एकमितीय आहे आणि मुलांचे जग मात्र अनेक पैलू असलेले आणि वैविध्यपूर्ण! कशी बसणार सांगड? मग एकच उपाय उरतो. मुलांच्या ९९ भाषा मारून टाकायच्या आणि आपल्या सोयीची एकच भाषा त्यांच्यावर लादून परीक्षाबहाद्दर आणि पाठांतरबहाद्दर असा एकांगी, एकसुरी समाज बनवत राहायचा. हेच करत आलो आहोत आपण, कित्येक वर्षे!

आपले पालकत्व, शिक्षण व्यवस्था आणि मुलांचे विश्व यांचा सेतू बांधण्याची नितांत गरज आज जाणवते ती याचसाठी. हे काम सोपे नाही, पण समाजस्वास्थ्यासाठी ते अत्यावश्यक आहे. पालक म्हणून, शिक्षक म्हणून आपण आपल्या मुलांना नक्की काय 'शिकवत' आहोत हे तपासून पाहायला हवे. ते शिकवण्याचा आपल्याला अधिकार तरी आहे का, याचाही विचार करायला हवा. मुलांबद्दलच्या आणि मुलांसाठीच्या सगळ्या गोष्टी मुलांकडूनच शिकण्याची सुरुवात कुठेतरी करायला हवी.

जेव्हा माशांतील नर-मादी ओळखणाऱ्या, माडीच्या तुरट चवीचा अनुभव असणाऱ्या, पानाफुलांच्या माळेत बागेचा नकाशा पाहणाऱ्या, स्वलिपीत लांबलचक कथा लिहिणाऱ्या आणि कोंबडी अंडे नक्की कसे घालते याचा शोध घेणाऱ्या मुलांच्या अनुभवविश्वाला आपण गंभीरपणे घ्यायला शिकू, त्यांच्या शंभर भाषा समजण्यासाठी प्रयत्न करायला लागू, त्यांच्या मनात चाललेल्या असंख्य क्रिया-प्रक्रियांमध्ये किंचितसे का होईना डोकावून पाहायला लागू तेव्हा त्यांच्या जगण्याला आणि शिकण्याला प्रौढ व्यक्ती म्हणून आपला थोडाफार हातभार लागत आहे असे समजायला हरकत नाही.

• • •



# मूल शंभराचं आहे

शलाका देशमुख

शलाका देशमुख १९९० पासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचे मूळ शिक्षण चित्रकलेचे. मुंबईच्या डोअर स्टेप स्कूल मध्ये चित्रकला शिक्षक म्हणून सुरू केलेले काम पुढे शिक्षक प्रशिक्षण, शिक्षण क्षेत्राचा अभ्यास असे वाढले. सध्या त्या दि शिक्षण मंडळ, गोरेगावच्या प. बा. सामंत शिक्षण समृद्धी प्रयासच्या केंद्रप्रमुख म्हणून काम पाहात आहेत. मुलांची चित्रे या विषयावर त्यांनी लेखन केले आहे. शिकताना मागे राहणाऱ्या मुलांना समजून घेण्यात व त्यांनी शिकावे यासाठी प्रयत्न करण्यात त्यांना विशेष रुची आहे.

काही दिवसांपूर्वी एका चित्रप्रदर्शनाला गेले होते. अतिशय शांत वातावरणात लोक एकमेकांशी कुजबुजल्यासारख्या आवाजात बोलत होते. आयोजकांपैकी दोघांची मुलं तिथे होती. साधारण चार –पाच वर्षांची. ती त्या शांततेला मनावर न घेता मनसोक्त आवाज करत इकडून तिकडे धावत होती. गंभीर वातावरणातही स्वतःचा अवकाश निर्माण करून त्यांचा त्यांचा आनंद निर्माण करणं त्यांना सहजच जमलं होतं.

असाच एकदा काही वर्षांपूर्वी शाळेत एक विदूषक आला होता – बहुधा फ्रान्समधून. त्याला अगदी तोडकं–मोडकं इंग्लिश येत होतं. मुलांना फक्त मराठी, तोडकं–मोडकं हिंदी आणि इंग्लिश. विदूषक फक्त 'आई' हा एक शब्द शिकून आला होता. बाकी वेगवेगळ्या भाषांच्या साहाय्याने दोन तास त्यानं मुलांना खिळवून ठेवलं होतं, हे त्याचं कौशल्य खरंच – पण आनंदाची भाषा समजून घेण्याची ताकद जगातल्या सगळ्या मुलांच्यात असते. हे ही त्याला उमजलेलं असलं पाहिजे.

**मूल**<br>
**शंभराचं आहे.**<br>
**मुलाकडे शंभर आहेत,**<br>
**ऐकण्याच्या पद्धती**<br>
**आनंद घेण्याच्या**<br>
**प्रेम करण्याच्या**<br>
**मजा करण्याच्या**

बालवाडीतल्या मुलांना ठोकळ्यांशी खेळताना पाहिलंय का तुम्ही ? रेल्वेगाडीपासून डोंगरापर्यंत आणि बाबांच्या दाढीच्या ब्रशपासून आईस्क्रीमच्या कोनापर्यंत. कधीकधी बेडूक आणि सापही बनून जिवंत होतात ठोकळे मुलांच्या हातात. मुलांकडे असतेच ताकद त्यात प्राण भरण्याची. 'येत नाही', 'जमत नाही' अशा वाक्यांना जागाच नसते मुलांच्या शब्दकोशात.

पोळ्याच्या दिवशी मातीचे बैल बनवूया असं ताई म्हणाल्या. आमच्या शाळेतली मुलं शहरातली. बैलाशी संबंध येणं तर दूरच पण नेहमी बघायला मिळणंही होत नाही. तरी मुलं पटकन तयार झाली बैल बनवायला आणि सुंदर बैल बनवले की त्यांनी. एखादा अनुभव प्रत्यक्ष घेतलेला नसला तरी त्याची कल्पना करणं मुलांना अवघड वाटत नसतं. किंबहुना कल्पना करणं हे त्यांच्या स्वभावाचाच एक अविभाज्य भाग आहे. मला आठवतंय काही वर्षांपूर्वी पाठ्यपुस्तकात एक धडा होता. त्यात विमानतळाचा उल्लेख होता. त्यावर बरीच चर्चा झाली होती की ग्रामीण भागातल्या मुलांना, ज्यांनी विमानतळ कधीच पाहिला नाही त्यांना तो कसा समजेल, असा धडा घालायलाच नको वगैरे. मला तेव्हा असं वाटलं होतं की एकतर मुंबईच्या सगळ्या मुलांनी तरी कुठे विमानतळ पाहिलेला असतो? तो त्यांच्या शहरात असला तरी! पण मुद्दा हा नाहीच. मुलांच्या कल्पनेच्या भराऱ्या उडू शकतात – विमानाबरोबर उंच आकाशात. कदाचित त्यांच्या कल्पनेतला विमानतळ एस्टी स्टॅण्डसारखाही असेल. असू देत – बिघडलं कुठं?

बालवर्गातली मुलं झाडं पाहायला गेली. जाऊन आल्यावर ताई म्हणाल्या, ''चला आता झाडांची गोष्ट कोणकोण लिहिणार?'' सगळ्या मुलांनी हात वर केले आणि सगळ्यांनी गोष्ट लिहिली. रूढार्थानं 'लिहिता' येत नसतानाही. त्याचं कारण मुलांना असं वाटतच नाही मुळी की त्यांना अजून लिहिता येत नाही.

**मूल**<br>
**शंभराचं आहे.**<br>
**मुलाकडे शंभर आहेत,**<br>
**भाषा**<br>
**हात**<br>
**विचार**<br>
**खेळण्याच्या, बोलण्याच्या, विचार करण्याच्या पद्धती**

मुलं अशीच असतात. स्वतःचीच. आपण मोठी माणसं खूप प्रयत्न करतो आपल्याला हवं ते त्यांना शिकवण्याचा, आपल्याला हव्या त्या पद्धतींनी. पण मूल त्या सगळ्याला ओलांडून शोधून काढत असतं स्वतःचीच एक पद्धत. आपण जरा थांबवलं पाहिजे त्यांच्यात लुडबुड करणं आणि त्यांना वळण लावणं. जरा विचार केला तर लक्षात येईल आपल्या की मुलांना शिकवण्याचा उद्योग लावून घेतलाय आपण स्वतःसाठीच. आपल्यासाठी असते शाळेची वेळ, नियोजन आणि तासिका. आपल्याला घाई असते एकापुढे एक नियोजन पूर्ण करण्याची.

अशाच एका दिवशी मुलं दुकान दुकान खेळत होती. दुकानातल्या वस्तू विकत घेतल्यावर त्या त्यांनी स्वतःच्या बॅगेत ठेवल्या. ताई बघत होत्या. वस्तू बॅगेत

गेल्यावर ताईंचा जीव वर-खाली. त्या लगेच म्हणाल्या, ''अगं पण त्या वस्तू आपल्या शाळेतल्या आहेत ना!'' मुलगी म्हणाली, ''थांबा ताई, आता काही बोलू नका. मला बाळाला औषध द्यायला लवकर घरी जायचंय.'' काय गंमत आहे नाही! ताई शाळेत होत्या आणि मुलगी दुकानातून घरी जात होती. ताईंना घाई, दप्तरातल्या वस्तू बाहेर कधी निघतील याची तर मुलीला घाई, बाळाला औषध देण्याची. ताईंनी मुलांना खेळण्यासाठी सगळी योजना तर तयार केली. पण त्याबरोबर आवश्यक असणारा अवकाश, संयम याची योजना करायची राहिली. ती नेहमीच राहून जाते सगळ्याच मोठ्या माणसांची.

**शाळा आणि कल्चर**
**अलग करतात**
**शरीर आणि मेंदूला**
**ते सांगतात मुलांना,**
**काम आणि खेळ**
**सत्य जग आणि आभासी जग**
**कधी एकत्र असूच शकत नाहीत.**

खूप गोष्टी लिहिण्याची आवड असणाऱ्या माझ्या भाचीला मी म्हणाले, एक कल्पना आहे माझ्या डोक्यात, की इंग्रजीतल्या छोट्या छोट्या गोष्टी तयार करायच्या. पुस्तकातल्या गोष्टी खूप मोठ्या असतात आणि माझ्या शाळेतल्या मुलांना ८-१० ओळीतल्या गोष्टी असतील तर पटपट वाचून संपवल्याचा आनंद मिळेल. तू लिहिशील का? शंभर गोष्टींचा प्रकल्प आहे.'' तेव्हापासून दर तीन-चार दिवसांनी तिचा फोन येतो, ''आत्या कधी बसूया? मी लिहिलीय गोष्ट.'' हेच जेव्हा मी मोठ्या माणसांबरोबर बोलले तेव्हा शंभर हा आकडा ऐकून, ''आपण सुरुवात करू, मग बघू कसं जमतंय ते,'' अशी सावध प्रतिक्रिया येते.

**शंभर ठिकाणची स्वप्नं बघण्याच्या**
**मुलांकडे असतात शंभर भाषा**
**(आणि खरं तर आणखी शेकडो)**

दोन वर्षांपूर्वी आमच्या शेजारी राहणाऱ्या जुळ्या बहिणी आल्या होत्या आमच्या घरी. जेव्हा ते कुटुंब दुसरीकडे राहायला गेलं तेव्हा नुकत्याच चालायला लागल्या होत्या. आमच्या घरी पेपर मॅशेची बकरी आहे तिच्याशी खेळायला यायच्या त्या. आजोबांबरोबर आल्या तेव्हा जुनं सगळच विसरल्या होत्या. बकरी मात्र छान लक्षात होती. जवळ जवळ तासभर होत्या. तेवढ्या वेळात केलीच होती त्यांनी तिला जिवंत. ती उभी का राहात नाहीये असा एकीचा पुन्हा पुन्हा आजोबांना प्रश्न होता. ते सांगायचा प्रयत्न करत होते की ती खोटी आहे, खेळण्यातली आहे. तिला काही ते पटत नव्हतं. बकरीचा पाय तुटलाय आपण तिला सोफ्रामायसिन लावलं की ती उभी राहील नाहीतर तुम्ही तिला सेल घाला म्हणजे ती चालायला लागेल असे वेगवेगळे पर्याय सुचवत होती ती. बकरी उभी राहू शकते यावर तिचा ठाम विश्वास होता

**ते सांगतात मुलांना**
**तर्क आणि स्वप्न**
**कधी एकत्र असूच शकत नाहीत.**
**आणि असं**
**सांगतात**
**ते मुलांना की**
**शंभर नाहीचेत मुळी.**
**मूल म्हणतं**
**बिलकुल नाही**
**शंभर आहेतच मुळी**
**अगदी नक्की**

काय गंमत आहे नाही, मोठ्या माणसांना जिवंत माणसातला जिवंतपणाही जाणवत नाही. आणि मुलांच्या जगात निर्जीव काहीच नाही.

मुलं व्यक्त करतात स्वतःची भावना. प्रेमाची आणि भीतीची, आनंदाची आणि दुःखाची. भीतीबद्दल व्यक्त होताना आर्या लिहिते, ''माझ्या मते जगात असा एकही सजीव नाही की ज्याच्या मनात भीती नाही. प्रत्येकाची भीती वेगवेगळी असते. लहान मुलांना धूरवाल्याची, कचरावाल्याची भीती वाटते. माझ्याएवढ्या मुलांना अंधाराची, कीटकांची, घरात एकटं राहाण्याची तर मोठ्या माणसांना फक्त आपल्या मुलाच्या किंवा मुलीच्या भविष्याची भीती वाटते.'' मुलांना सांगताच येतात स्वतःच्या भावना आणि ओळखतात ती इतरांच्या भावनांनाही. संधी दिली तर व्यक्तही करतात ती मोकळेपणाने.

मुलांमधे असतेच ताकद शंभर भावना जाणवण्याची आणि ती सांगण्याचीही. आपण मोठी माणसं ऐकत नाही त्यांचा आवाज नीट लक्ष देऊन. किंवा वेळ नसतो आपल्याकडे स्पर्शाची भाषा समजून घ्यायला. मग असं म्हणतात माणसं की उगीचच घाबरते ती! किंवा सारखं काय सांगायचं असतं ह्याला काहीतरी कामाच्या मधे मधे! पण असं नाही केलं आपण, देत गेलो संधी मुलांना मोकळेपणानी व्यक्त होत राहाण्याची, सवय लावली स्वतःला तो आवाज ऐकण्याची तर,

**मुलांकडे असतात शंभर भाषा**
**(आणि खरं तर आणखी शेकडो)**

शाळेतल्या ताईंना पुरस्कार मिळाला हे कळल्यावर सायली लिहिते, नयनाताई, मला असे कळले की तुम्हाला पुरस्कार मिळाला आहे. दुसरी आणि चौथीमध्ये तुम्ही मला शिकवले. अभिमानच वाटतो पण तो अभिमान आज तुम्ही खूप मोठा केलात. हे तुमचे यश मला खूप आवडले...'' आमच्या मनात आलं, यातलं आपण काय शिकवलं?

**मूल**
**शंभराचं आहे.**
**मुलाकडे आहेत**
**शंभर भाषा**
**शंभर हात**
**शंभर विचार...**


**शलाका देशमुख**
smg.deshmukhsy@gmail.com
9869245367

*with best compliments from*

CADCAM GURU ®

Design your dreams

**Careers in CAD, CAM & CAE**

www.cadcamguru.com

---

BrainSketch ™

**Ride the wave of Design**

Complete coaching for entrance to

**Design | Fashion | Architecture**

**(NID, CEED, NIFT, NATA)**

www.brainsketch.co.in

---

Florina Apartments,
Opp. S.N.D.T. College, Off Karve Road,
Erandawane, Pune 411 004.
Tel: 020 - 2546 9637, 2543 3529



# निळी भिरभिरी, सुस्सू आणि इतर गोष्टी

**सतीश आवटे**

लेखक पर्यावरणशिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. झाडे, किडे, पिके, पक्षी, मासे यांच्यामधली विविधता आणि त्यांचे लोकसंस्कृतींच्या विविधतेशी असणारे नाते, त्यासंबंधी सहभागी संशोधनपद्धती वापरून अभ्यास आणि माणसांच्या विकासप्रक्रियेमधले संतुलन आणि समन्यायीपणा याबद्दलचे शिक्षण हे त्यांच्या विशेष आवडीचे विषय आहेत.

‘याला काय म्हणता?’ ब्लू मॉरमॉन (वन्यतज्ज्ञ फुलपाखरूप्रेमी आणि अभ्यासक यांनी महाराष्ट्राचं राज्य फुलपाखरू म्हणून घोषित केलेलं फुलपाखरू) बघून माझ्या सहकाऱ्यानं– सुहासनं कास पठाराजवळ गुरं चारणाऱ्या त्या छोटया पोराला विचारलं तेव्हा ते पोरगं उत्तरलं, ‘‘ती निळी भिरभिरी व्हय!’’

महाराष्ट्राच्या राज्य फुलपाखराला मराठी नाव असणं कदाचित गरजेचं नसावं किंवा ते तसं नसणं काहींसाठी हितकारक असावं बहुतेक. पण या पोरानं सांगितलेलं नाव आम्ही आमच्या लेखनात आणि प्रकाशित साहित्यात आणणं सुरू केलं, आणि त्यातून मुलांच्या बरोबर झाडं, पक्षी, साप, किड्यांना राज्याच्या वेगवेगळ्या विभागात, भाषांत असणारी नावं शोधणं एक गंभीर काम म्हणून सुरू केलं.

वर्गीकरणशास्त्रात (taxonomy) पृथ्वीवरच्या सर्व जीवांची आडनाव (genus) आणि नाव (species) अशा दोन भागात नामकरणाची पद्धत आहे. ब्लू मॉरमॉन हे इंग्रजी नाव या फुलपाखराचा निळा रंग आणि मॉरमॉन या ख्रिस्ती संप्रदायाच्या नावावरून पडलं आहे. त्याचे प्राणीशास्त्रीय नाव Papilio polymnestor असे आहे. Papilio या लॅटिन भाषेतील शब्दाचा अर्थ फुलपाखरू असा आहे तर polymnestor हे ग्रीक दंतकथेतील राजाचं नाव आहे.

आता ‘निळी भिरभिरी’ हे पाखराचा डोळ्यात भरणारा निळा रंग आणि त्याची अस्थिर भिरभिर उडण्याची सवय यांचं निरीक्षण करून दिलेलं नाव तितकंच वैज्ञानिक आहे, शिवाय ते फुलपाखरांच्या नैसर्गिक परिसरात राहणाऱ्या सामान्य लहान मुलांच्या, मोठ्या लोकांच्या अनुभवविश्वातून निर्माण झालं आहे. याच परिसरात सिरोपेजिया (Ceropegia), ज्यांना कंदिलफूल असं मराठी लेखनात संबोधलं जातं त्या वनस्पतींना त्यांच्या औषधी उपयोगामुळं दुधी आणि मायाळू अशी नावं स्थानिक लोकांनी दिली आहेत. प्रमाणीकरण ही अभ्यास आणि नोंदी करण्यासाठीची गरज आहे हे कबूल. पण या प्रमाणीकरणाच्या प्रक्रियेत या स्थानिक नावांना बहुतेक वेळा विचारात घेतलं जात नाही. हा उद्योग करणाऱ्यांकडून बहुतेक वेळा त्यांची माहिती घेण्याची तसदीच घेतली जात नाही आणि त्याच्याही पुढं जाऊन प्राणी–वनस्पतींना ‘स्वर्गीय नर्तक’, ‘गप्पीदास’, ‘चक्रवाक’, ‘चक्रांग बदक’, ‘सीतेची आसवे’, ‘पर्जन्यवृक्ष’ अशी संस्कृतप्रचुर नावं आवडीनं दिली जातात आणि इंग्रजी नावांना समर्थ मराठी पर्याय दिल्याचा स्वानंद घेतला जातो. आता हे महाराष्ट्राच्या कोणत्या भौगोलिक भागात हिरीरीनं होत असेल ते वेगळे सांगणे न लगे. अशा या व्यवहारात आदिवासी, भटके, शेतकरी समुदायातील न मुलांच्या, न मोठ्यांच्या भाषेला स्थान दिलं जातं. आणि त्या भाषेबरोबरच त्या समुदायांचे अनुभव, ज्ञान आणि शहाणपण अव्हेरलं जातं. हा एकीकडे अन्याय आहेच पण दुसरीकडे सत्ताधारी जात–वर्ग– प्रणित ज्ञानप्रक्रिया अत्यंत सुमार दर्जाचं ज्ञान निपजते आणि समाजाला जगण्यासाठी नेहमीच परकीय ज्ञानाच्या कुबड्या घ्याव्या लागतात. याची आतून वाटत असणारी लाज मग प्राचीन, ‘देदीप्यमान परंपरेतील कृषीपराशर’ ‘वृक्षायुर्वेद’ ते विमानशास्त्र आणि





अग्निबाणशास्त्र यांच्या अस्मितांनी झाकावी लागते.

ज्ञानप्रक्रियेत वेगवेगळ्या घटकांना सहभागी केलं तर काय होतं याचं माझ्या अनुभवातलं एक उदाहरण बघू. गेली काही वर्ष सह्याद्री परिसरातल्या शाळांमध्ये परिसर, झाडं, किडे, प्राणी, माती, पाणी, कचरा अशा मुद्द्यांवर उपक्रम राबवत आहोत. मुलं त्यांना आवडणारं, शाळा-पुस्तकाबाहेरचं, त्यांच्या परिसराशी जोडणारं असं काही आलं की कशी आनंदी, दबावमुक्त आणि प्रभावीपणे व्यक्त होतात हे तसं शिक्षणशास्त्राला माहीत असलेलं जुनं तत्त्व. हे तत्त्व आम्हाला 'जनुकीय विविधता-अभ्यास' आणि निसर्गसंवर्धनाच्या अंगानं समजून आलं. या मुलांसोबत दोन वर्षं १२ जिल्ह्यांत पसरलेल्या सह्याद्री परिसरातील आंबा, जांभूळ, फणस आणि करवंद या झाडांमधल्या वाणविविधतेचा अभ्यास केला. यातून विशेषतः 'शाळे'नं 'साधारण', 'अप्रगत' ठरवलेली मुलं-मुली, आपण बरे, आपली ठरवून दिलेली नोकरी बरी हे न पाळणारे शिक्षक आणि गावातली म्हातारी-कोतारी यांच्या सहभागातून सह्याद्री परिसरातल्या २०५ आंब्यांच्या वाणांचा शोध घेतला गेला, जो अजून इथल्या फळसंशोधन केंद्रांनी, विद्यापीठांनी घेतलेला नाही. यातून पुढे आली मोग्या, घागरी, चिक्कुळ्या, वताचा, शेप्या, शेंद्री, पोस्ताचा, चंद्रया, राघू, सपरचंद्या, दही, साखारीदोडी, मधगोटी... अशी प्रत्येकाला विशिष्ट नावं आणि त्यांची कारणं, म्हणजे स्थानिक वर्गीकरण व्यवस्था, झाडांच्या गोष्टींत असणारा इतिहास, औषधं आणि खाद्यपदार्थ ह्यांविषयीचं ज्ञान.

हे सर्व 'अभ्यासक्रम-बाह्य' उद्योग शाळेत होताना बघून मुलं हरखून जातात. गावाच्या कुठल्या दिशेला, कुणाच्या शेताच्या बांधावर किंवा कुठल्या डोंगरात आंब्याला या वर्षी आंबे लागलेत, कुठले पाडाला आलेत हे सांगतात. मी मी म्हणत झाडावर चढायची 'रिस्क' घेतात, कोणाच्या घरी चांगलं लोणचं बनतं ते सांगतात, झाडाचा घेर मोजतात, जीपीएस मशीन आणि मोठा क्यामेरा कसा चालवायचा ते सांगा असं शिकायला मागं लागतात. पण या सगळ्याचं अजूनही शिक्षणात स्थान काय हा प्रश्न आहे.

सह्याद्रीकडून महाराष्ट्राच्या दुसऱ्या टोकाकडे, अकोले, वाशीम ह्या परिसरातली पारधी मुलं माळरानावर भक्कम हिंडतात आणि लहानपणापासून पक्षी ओळखायला, त्यांचा आवाज काढायला शिकतात. आवाज काढून बाटी (बटेर) आपल्याकडं बोलावणं हे त्यांच्या जीवनशिक्षणाचं नंबरी सर्टिफिकेट. लावा, बटेर, तितर असे पक्षी आणि त्यांची क्वेल आणि पार्ट्रिज अशी इंग्रजी नावं माहीत असणाऱ्यांना आपल्या ज्ञानगरिबीची आणि उपरेपणाची नेमकी जाणीव तेव्हाच होते जेव्हा त्यांना हे समजतं की रंग आणि आकार यांवरून पारधी ज्ञानपरंपरेनं बटेर पक्ष्यामध्येच बटेर, घागस, लावडू, कालचोच्या, पिलचोच्या, तिबोट्या, गवत्या आणि गेरजा असं आठ प्रकारांत वर्गीकरण केलं आहे. या ज्ञानपरंपरेतून आलेली मुलं ज्या समाजात उच्च शिक्षण घेऊन जागतिक वर्गीकरणशास्त्रात सहभागी होऊ शकतात, तिथं त्या जागतिक ज्ञानात मौलिक भर घालण्याची क्षमता निर्माण होते नाहीतर पाठांतर बहाद्दरांची जमात हेच समाजाचं लक्षण कायम राहतं.

डोंगरात राहणारी मुलं खडस, आळकुट, झोरा, गवत्या, चंदेरा, भोंडगी, पांगट, कोळशी, मळ्या, चिचना, कचकी, खारपा अशी नावं भराभर सांगतात तेव्हा अशीच मला माझ्या जगण्याची आणि शिकण्याची गरिबी ध्यानात येते. शक्यता आहे या लेखाच्या बऱ्याच वाचकांना कळणार नाही की ही गावांची नावं आहेत का झाडांची! ही आहेत कृष्णा, कोयना, दूधगंगा अशा सह्याद्रीतल्या मोठ्या-छोट्या नद्यांतल्या माशांची वैविध्यपूर्ण नावं. इथल्या मुलांचं नि त्यांच्या पालकांचं हे ज्ञान नावापुरतं मर्यादित नसतं, तर ते मासं कुठं, कधी सापडत्यात, पिल्ली कशी असत्यात, काटं किती, बिन तेलाचा मासा कसा शिजवायचा, खायला कसा आहे आणि कधी 'चढाला' निघतो, नर-मादी सारखंच दिसत्यात की वेगवेगळं, विणीच्या हंगामात मादीनं सोडलेल्या अंड्यांवर नर 'दुध सोडत' कसं जातो, नदीच्या डोहात मासं मारू नयेत कारण तिथं भुत्या हाय किंवा आसरा हाय, अशा सगळ्या अंगांनं हे ज्ञान त्यांच्या जवळ असतं. हे नीट ध्यानात घेऊन बघितलं तर उपऱ्या आणि एकांगी अशा सध्याच्या औपचारिक ज्ञानपरंपरेच्या भाषेत ह्यामध्ये वर्गीकरण आहे, परिसरविज्ञान आहे, पाक-पोषणशास्त्र आहे आणि संवर्धन मूल्यं व कृतीही आहे.

या सगळ्याला ना शाळेतल्या अभ्यासात महत्त्व आहे, ना औपचारिक वर्गीकरणशास्त्राच्या उच्चशिक्षणात, ना संशोधन-अर्थव्यवस्थेमध्ये. याचा दुहेरी परिणाम होतो. एक, हे असं संपन्न परंपरेतनं मिळालेलं आणि जगण्यातनं निर्माण केलेलं सांस्कृतिक भांडवल घेऊन, इंग्रजी-लॅटिनच्या बाजारात उतरून, त्या भाषांच्या येण्याशिवाय या पारधी-भोई-कातकरी-कुणबी मुलांना यशस्वी होता येत नाही. आणि दोन, इंग्रजी-लॅटिनचं भांडवल गोळा

केलेला, आर्थिक व राजकीयदृष्ट्या सत्ताधारी पण जगण्यातला अनुभव, विविधता या दृष्टीनं कमजोर समुदाय, ज्ञाननिर्मितीच्या नावाखाली जे काही करत राहतो ते उथळ, कधीकधी ठार चुकीचं, आणि सुमार दर्जाचं पण महागडं असं निघत राहतं आणि एकूण समाजच ज्ञाननिर्मितीत मागास राहतो.

मुलं, शिक्षक, कार्यकर्ते यांच्या सोबत 'जैवविविधता शिक्षण' उपक्रम करत असताना प्रकर्षानं जाणवणारी बाब म्हणजे झाडं, किडे, मासे, पक्षी, साप, उंदरं, हरणं यांच्याबद्दल परंपरेनं दिलेलं आणि आजूबाजूला बघण्यातनं, त्यांच्या सोबत जगण्यातनं आणि या सगळ्यांना, हो सगळ्यांना, खाण्यातनं मिळवलेलं ज्ञान असणाऱ्या मुलांच्या मनात शाळा आणि एकूण समाजानं निर्माण केलेला आत्मविश्वासाचा कमालीचा अभाव. आणि हा अभाव बहुतेकवेळा आयुष्यभर पुरेल इतका मिळतो. त्यातून अर्थातच आर्थिक अभाव जन्माला येतो आणि जोतिबांची 'विद्येवाली चक्री' फिरत राहते, न थांबता.

ही प्रक्रिया मग साहजिकच समाजावर उलटते. वनविभाग वन्यजीवांच्या संवर्धनात अपयशी ठरतो, स्थानिक माशांची विविधता, पाणवनस्पती 'डेटा डेफिशियंट' घोषित होतात, शेतीचा प्रश्न काही केल्या सुटत नाही. सत्ताधारी जातींनी-वर्गांनी लादलेला हा 'अभाव' मग असा सगळ्या क्षेत्रातील ज्ञानाच्या आणि शहाणपणाच्या अभावाच्या रूपात, त्यातून आलेल्या गरिबीच्या, संघर्षाच्या आणि पारतंत्र्याच्या रूपात सर्व समाजाला चक्रवाढ व्याजासहित परत मिळतो.

वरील उदाहरणात अनुभवलेला, हा जगण्यातल्या संपन्न ज्ञानाचा आणि विविधतेचा धिक्कार केवळ त्याच्या पाठ्यक्रमातून वगळण्यात थांबत नाही, तो भाषेच्या माध्यमातूनही सुरू होतो आणि मग तो उघड उघड शोषित समाजांपर्यंत मर्यादित न राहाता वरच्या पातळीलाही पोचून एकूणच मुलांच्या सामाजिक, प्रादेशिक विविधतेला मारून टाकायला लागतो. माझा अडीच वर्षांचा मुलगा 'मला मुतायला आलाय' असं म्हणतो अशी तक्रार त्याच्या 'डे केअर सेंटर' मधून येते आणि त्याला त्याऐवजी 'सुस्सू' आलीय असं शिकवणं सुरू झाल्यावर मग तो आणि मीही या व्यवस्थेच्या प्रमाण एकसुरीपणाचा बळी ठरतो. लहानपणी केलेल्या पाठांतराचा आणि परीक्षेतल्या उत्तम मार्कांचा फोल-थोपलेपणा लक्षात यायला लागतो.

अलीकडेच 'अन्न हे अपूर्णब्रह्म' हे शाहू पाटोळे यांचं पुस्तक वाचलं. यात जनावरांच्या विविध अवयवांपासून बनवलेल्या रगती, लाकुली, जीभ, फाशी, मेंदू बळ नि मांद, कास-खिरी, चीचडे, फरदुळ, वजडी अशा पदार्थांची, त्यांच्या बनवण्याच्या पद्धती आणि चवींची माहिती दिली आहे. हे पुस्तक वाचताना असो किंवा कातडी कमावण्याची प्रक्रिया, हत्यारं, वनस्पतींपासून बनवलेली रसायनं आणि त्याच्याशी निगडीत अमानुष जगण्याचं वर्णन करणारं भगवान इंगळे यांचं 'ढोर' हे पुस्तक मोठेपणी वाचताना असो, ते लवकर न समजणं, मजकूर दोन-तीनदा वाचायला लागणं याचा शैक्षणिक अर्थ आणि पाठांतरामागचं 'शाकाहारी राजकारण' शाळकरी वयातच समजण्यापासून 'शाळा' आपल्याला जाणीवपूर्वक कसं दूर करते हे समजतं.

समाजातलं हे 'शाकाहारी राजकारण' केवळ खाण्यापिण्याशी मर्यादित राहात नाही. ते हळूहळू मुलांच्या स्वाभाविक वर्तनाला नियंत्रित करू पाहातं. दंगामस्ती, छोट्यामोठ्या मारामाऱ्याच काय, नैसर्गिक ऊर्मी म्हणून केल्या जाणाऱ्या झोंबाझोंबीकडेपण 'शाकाहारी समाज' (यात चिकन-मटण-डुक्कर पण वर्तमानात बीफ न खाणारे समाविष्ट आहेत) डोळे वटारून बघायला लागतो.

एकीकडं असा समाज स्वतः त्यानं ठरवलेल्या 'सुसंस्कृततेच्या' निकषांवर दर वर्षी नेमानं 'फेल' होत राहतो आणि असं स्वप्न बघायला लागतो की 'शाळा' नावाच्या 'बेटावर' 'आदर्श नागरिक' घडवणं अतिशय गरजेचं आहे. दुसरीकडं असा समाज मधुमेह, हृदयविकार अशा 'व्याधींनी' ग्रस्त झाल्यावर अनेक गोष्टी केविलवाणा होऊन करायला लागतो - चालायला लागतो, जमलंच तर थुलथुलत पळायला बघतो, इतकंच काय सिंथेटिक गवत असणाऱ्या चटया विकत आणून तिच्यावर ढोपरानं सरपटायची ट्रीटमेंटही घ्यायला लागतो. अद्ययावत डॉक्टर, संशोधक मग त्यांना समजावून सांगतात की मानवी उत्क्रांतीविज्ञान, जीवनशैली आणि रोग संबंधावरील संशोधनातून हे पुढं आलं आहे की नैसर्गिक आक्रमक कृती, शरीरावर छोट्या-मोठ्या जखमा होणं, किमान ओरखडे निघणं हे सर्व बंद झालं की जखमा बऱ्या करणारे रक्तघटक न वापरता साचून राहतात आणि इतर उपयोगी रसायनं पुरेशी निर्माण होत नाहीत; त्यामुळे हृदयरोग, मधुमेह, नपुंसकता असे अनेक आजार, विकार वाढताहेत. हे सर्व आपल्या जीवनशैलीशी निगडीत आहेत. ते कुठल्या रोगकारक जंतूंमुळे होत नाहीत. सततची हिंसक वागणूक हा वेगळा समाज-मानसशास्त्रीय मुद्दा स्वतंत्र हाताळणं गरजेचं आहे. पण त्यापलीकडे जाऊन मुलांचं खेळणं, झोंबाझोंबी, झाडावर चढणं-पडणं, कोपर-ढोपर अधून मधून फोडून घेणं, गवताच्या पात्यांनी ओरखडणं, भीती वाटून जोरात पळणं आणि 'शिकार' पकडणं या सगळ्या 'उचापतींकडं' मानवी उत्क्रांती आणि आरोग्यशास्त्र ह्यांच्या अंगानं बघणं आणि शिक्षणशास्त्रातल्या सध्याच्या प्रचलित संकल्पना आणि उपक्रमांचं त्यादृष्टीनं पुनर्मूल्यांकन करणं महत्त्वाचं आहे.

अशा विविधतेनं 'नटलेल्या' या समाजात, जीव आणि जगणं ह्यातली ही विविधता शिक्षणाच्या वेगवेगळ्या अंगांमध्ये, प्रक्रियेमध्ये आणि व्यवस्थेमध्येही असणं ही मूलभूत गरज आहे. कारण त्यावर एकूण समाज रोगी की निरोगी बनणार हे अवलंबून आहे.

**सतीश आवटे**
satishawate@gmail.com
9881749639



# सावली

**राजीव तांबे**

राजीव तांबे गेली अनेक वर्षे सातत्याने मुलांसाठी काम करत आहेत. मुलांसाठी लेखन, कार्यशाळा, शिक्षक प्रशिक्षण, पालक समुपदेशन अशा विविध पातळ्यांवर त्यांचे काम चालू आहे. त्यांनी युनिसेफसाठी शैक्षणिक सल्लागार म्हणूनही काम पाहिले आहे. त्यांनी लिहिलेल्या बालकथा, कविता, नाटके यांची ६९ पुस्तके आतापर्यंत प्रकाशित झाली आहेत. बाल साहित्यातील त्यांच्या योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत.

लहान मुलांची चित्रकला स्पर्धा होती.

मुलांचा वयोगट होता ६ ते १०.

सुमारे ४०० मुलं शाळेतल्या वर्गात, व्हरांड्यात किंवा मैदानात कुठेही बसून, त्यांना आवडेल ते चित्र काढत होती.

पालकांना मात्र शाळेच्या बाहेर रस्त्यावरच (कोंडून) ठेवलं होतं.

पालकांची धुसफूस सुरू होती पण मुलं आनंदात होती.

या स्पर्धेसाठी काही खास विषय असा नव्हता.

जेव्हा मुलांना सांगितलं की, तुम्हाला आवडेल ते चित्र काढा तेव्हा काही मुलांना चित्रच काढता येईना.

ती मुलं अस्वस्थ होत म्हणाली, ''काहीतरी विषय सांगा नाहीतर आम्ही आमच्या बाबांना तरी विचारतो.''

**मी सांगतोय त्यावर विश्वास ठेवा. त्या मुलांनी आतापर्यंत त्यांच्या आवडीचं चित्र कधी काढलंच नव्हतं! बाबा सांगतील तेव्हा व बाबा सांगतील तेच चित्र त्यांनी काढलं होतं.**

''इथे तुम्हाला कुणी रागावणार नाही, तुमचं चित्र चुकलं असं कुणी म्हणणार नाही. तुम्ही हव्या त्या रंगात, तुम्हाला हवं ते चित्र काढा,'' असं त्या अस्वस्थ मुलांना समजावून सांगताना नाकीनऊ आले कारण हे 'निर्भय विश्व' त्यांचासाठी नवीनच होतं.

त्यातल्या एकाने माझा हात गच्च धरत अविश्वासानं विचारलं, ''ही सगळी मुलं पण कुठलंही चित्र काढणार?''

त्याला जवळ घेऊन थोपटत म्हणालो, ''हो कुठलंही चित्र काढणार... त्यांना आवडेल तेच काढणार...''

माझा हात झटकत तो म्हणाला, ''मी पण कुठलंही... आवडेल ते...''



कानात वारा शिरल्यासारखी ती मुलं उधळली आणि मैदानातल्या मुलांत मिसळली.

मुलांनी आपापले रंग आणले होते.

मुलांची रंगाची देवाणघेवाण सुरू होती.

मुलं मन लावून काम करत होती.

संपूर्ण शाळेत आणि मैदानात अथांग रंगीत शांतता तुडुंब भरली होती.

४०० मुलं गोंधळ करतील, उगाचच इकडे तिकडे नाचानाच करतील असा आम्हा मोठ्या माणसांचा समज होता.

पण...

चित्रं काढता काढता ही मुलं चित्रातच गेली की काय?' असं वाटावं असा सर्जनशील सन्नाटा शाळेत!

आणि

समजदार पालकांचा कलकलाट शाळेबाहेर!

मुलं रांगेत बसली नव्हती आणि ताठही बसली नव्हती. ती त्यांना हव्या त्या ठिकाणी हवी तशी बसली होती.

मुलांना काही हवं-नको पाहण्यासाठी आम्ही काहीजणं मुलांमधून फिरत होतो. पण कटाक्षाने त्यांना कुठलीही सूचना करत नव्हतो.

याचवेळी मला भेटली, इयत्ता पहिलीतली प्रिया.

प्रियाचं चित्र पाहून क्षणभर मला वाईट वाटलं.

तिला मदत करण्याची व तिला सल्ला देण्याची अनिवार उबळ मला आली.

तिनं चित्रात संपूर्ण पानभर हिरवं झाड काढलं होतं.

त्या झाडाखाली काही मुलं खेळत होती, काही खात होती, काही मुलं लोळत वाचत होती.

पण त्या सर्व मुलांचे कपडे, त्यांची खेळणी व त्यांची पुस्तकं प्रियानं हिरव्या रंगात रंगवली होती.

आणि तिचं हे हिरवा रंग देण्याचं काम सुरूच होतं.

मला वाटलं, एक तर प्रिया आळशी असेल. एकच हिरवा खडू घेऊन तिनं तो सगळीकडे घासला असेल. किंवा तिच्याकडे दोनच खडू असतील. हिरवा

आणि चॉकलेटी.

मी प्रियाच्या बाजूला मांडी घालून बसलो. आणि माझ्या उसन्या प्रेमाची झालर लावत तिला म्हणालो, ''अगं, तुला आणखी खडू हवेत का? वेगवेगळ्या रंगात रंगव की, या मुलांचे कपडे, त्यांची खेळणी आणि पुस्तकं. बघ ना आजूबाजूला... मुलांनी किती सुंदर रंगीबेरंगी कपडे घातले आहेत ना? काय? हा घे रंगीत खडूंचा नवीन बॉक्स.''

माझ्या या चमकदार बोलण्यानं आणि मी देत असलेल्या बॉक्सनं ती भारावून जाईल, असं मला वाटलं होतं.

पण मी ज्या हातात बॉक्स धरला होता तो बाजूला सारत ती वज्रासनात बसल्यासारखी बसली.

तिनं दोन हातात चित्र घेऊन मला दाखवलं.

एकदा त्या अपूर्ण चित्राकडे व एकदा माझ्याकडे पाहात ती हळूच हसली.

माझी कीव करत म्हणाली, ''काका, तुम्हाला या चित्रातली सावली दिसली नाही ना?''

**आता माझ्या साक्षात्काराचा क्षण जवळ आल्याची मला जाणीव झाली.**

**मी मनापासून माझी हार कबूल करत मान डोलावली.**

मला समजावत प्रिया म्हणाली, ''काका, या मुलांच्या कपड्यांवर, त्यांच्या खेळण्यावर आणि सर्वांवरच किनई या हिरव्या झाडाची सावली पडली आहे... हिरवीगार सावली!

पहा नं नीट ..

अहो काका माझ्याकडे तर तुमच्यापेक्षा मोठा रंगीत बॉक्स आहे.

पण त्याचा काय उपयोग इथे?''

तिच्या नजरेतून त्या चित्राकडे पाहताना मी अवाक् झालो.

मुलांच्या चित्राकडे पाहण्याची एक नवी दृष्टीच मला प्रियाने दिली होती.

**मोठ्यांच्या विश्वात झाडांच्या सावल्या काळ्या पडतात, म्हणून...**

**मोठ्या माणसांना झाडाच्या सावलीत गेलं की थंडगार वाटतं.**

**पण मुलांच्या विश्वात झाडांच्या सावल्या हिरव्या पडतात.**

**त्यामुळे मुलांना झाडाखाली गेलं की हिरवंगार तर वाटतंच!**

**पण त्यांचं अवघं विश्वंही हिरवंगार होतं!!**

मी उत्सुकता म्हणून ते प्रियाचं चित्र बाजूलाच बसलेल्या चार-पाच मुलांना दाखवलं. पण त्यात कुणालाच काही खटकलं नाही. त्यांनी सही... सही... असं म्हणत एकमेकांना टाळ्या पण दिल्या.

मी मोठा असल्यामुळे फक्त मलाच ते चित्र प्रथम विचित्र वाटलं होतं.

मुलांनी आपल्याला समजतील अशीच चित्र काढली पाहिजेत असं नाही

तर

मुलांनी काढलेली चित्र आपण त्यांच्याकडून समजून घेतली पाहिजेत,

असा एक नवीन शोध मला तेव्हा लागला.

**'मुलांच्या चित्रातलं मर्म**
**ओळखण्यासाठी चित्रकाराची नव्हे**
**तर**
**तुमच्या हृदयातल्या प्रेमाची गरज आहे'**

ही चिनी म्हण
तुम्ही ऐकलीच असेल.

**राजीव तांबे**
rajcopper91@gmail.com
93223 99859

Best Wishes From

**MANAS ENGINEERING CORPORATION**
**Manufacturer of Precision Cutters**

**Datta G. Gholba**
Mobile : 9822881939

4/5/6, Parvati Towers, 82, Parvati, Pune - 411 009
Tel./Fax : 020 24440379,
Email : dattagholba@vsnl.net



# बाटकीचा

प्रकाश अनभूले

प्रकाश अनभूले गेली १५ वर्षे प्रगत शिक्षण संस्थेमध्ये प्रामुख्याने संगणक आणि तंत्रज्ञान विभागात कार्यरत आहेत. गेली दोन वर्षे ते बहुचर्चित 'स्कूल इन द क्लाउड' प्रकल्पावर प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर म्हणून काम पाहात आहेत. त्यांचा अध्यापनात तसेच संस्थेच्या व्यवस्थापनातदेखील सहभाग आहे. त्यांचे विविध माध्यमातून लेखन प्रकाशित होत असते. 'पालकनीती'च्या संपादक मंडळाचे ते सदस्य आहेत.

माझ्या बालपणापासूनच्या जडणघडणीचा, आई-वडील, सवंगडी, शिक्षक, आजूबाजूचा परिसर यांच्या प्रभावाचा फार मोठा फायदा माझ्या लेखन कौशल्य आणि कविता लेखनाला मिळाला हे आज उमगत आहे. कारण कोणत्याही प्रकारच्या सृजनशीलतेला बालपणापासूनच जाणते-अजाणतेपणे खतपाणी घातले जात असते. त्यात अगदीच दोन वर्षे मला लाभलेल्या गोसावी वस्तीवरील शाळेचा वाटा महत्त्वाचा वाटतो.

पालकांनी घराजवळ असलेल्या गोसावी वस्तीवरील शाळेत मला पाठवण्याचे एकमेव कारण होते ते म्हणजे, आई-बाबा दोघे कामावर जात असल्यामुळे घरी लक्ष देणारे कोणी नव्हते. या शाळेत बहुतांश गोसावी समाजाची मुले होती. वय समजण्याचे होते, मात्र विचार आणि अभिव्यक्ती विकास काही नव्हता. लेखन-वाचन कौशल्यांचा गंधही नव्हता. पहिल्या दिवशी शाळेत पाऊल ठेवल्यावर एका पोराने माझ्याकडे पाहात हा कोण 'बाटकीचा' आला असे संबोधन केले. त्याबरोबर अनेक मुले जोराने हसू लागली. मी गोंधळून गेलो पण नक्की काय झाले हे समजले नाही. बाटकीचा म्हणजे आपल्यालाच काहीतरी म्हणतो आहे एवढेच समजले. दुसऱ्याने अजून एक वाक्य टाकले, ''मारी जगावर कायते बैठोरे?'' सुरेश नावाच्या एका मुलाने ती दुसऱ्याची जागा आहे असे मला सांगून मागे बसायला सांगितले. आणि त्याची जागा म्हणजे तरी काय तर वर्गातील एक फरशी. प्रत्येकजण एका एका फरशीवर एकामागे एक बसत असे. एकंदर माझा त्यावेळचा अवतार पाहून ते मला त्यांच्यातीलच एक समजून गेले असावेत म्हणूनच त्याने त्यांच्या भाषेत मला सूचना केली असावी. सुरेशने त्यांच्याच भाषेत हा 'हिंदू' आहे असे सर्वांना सांगितले. ही शाळा माझ्या घरासमोरच्या रस्त्याच्या पलीकडे आणि तेथेच या गोसावी लोकांची वस्ती. त्यामुळे रस्त्यापलीकडील सर्व हिंदू आणि इकडील आपली माणसे असा त्यांचा समज होता.

ही त्यांची भाषा तेव्हा समजत नव्हती पण माझी उत्सुकता जागृत करीत होती. त्यातच 'बाटकीचा' म्हणून स्वागत केलेल्याला नक्की काय म्हणायचे होते, हे जाणून घेण्याची इच्छा हे मुख्य कारण ठरले त्यांच्या भाषेला, संवादाला नीट ऐकण्याचे. वर्गाबाहेर त्यांच्यातील आपापसात चालणाऱ्या संवादातून एखादा परिचयाचा शब्द शोधायचा आणि त्याचा अर्थ लावायचा. आपल्याबद्दल असो किंवा अजून काही, पण त्यांचा संवाद खूप विचार करायला लावायचा. एकंदर ऐकणे आणि त्याचा अर्थ लावणे असे रसायन डोक्यातच सुरू झालेले असायचे कारण मला लिहायला-वाचायला अजिबात जमत नव्हते. नवीन भाषा समजून घेताना चेहऱ्यावरील हावभाव कसे वाचावेत हेही मी तेव्हा शिकलो असेन असे आज वाटते. या सगळ्यातून ''बॉबीवसे केतना पैसा चोरव्या'', म्हणजे बॉबी खाण्यासाठी किती पैसे चोरले; ''केतनो भंगार गोळा करयो?'' म्हणजे किती भंगार गोळा केले? इतपत मला समजू लागले.

ही मुले शाळा संपली की भंगार गोळा करायला निघायची. कारण तीपण त्यांच्या कुटुंबाची एक गरज होती. सगळी माझ्याशी जरा लांबूनच व्यवहार पत्करायची. पण थोडी जवळीक वाटणारा सुरेश मनमोकळेपणाने बोलायचा. तो सांगायचा, ''आमच्यातील पोरं भंगार गोळा करायला जातात. भंगार येचायला जाताना रात्रीचं उरलंसुरलं खातात. काई उरलं नसलं तर शेजारी किंवा भोवती असलेल्या मोठया लोकांच्या वस्तीतून मागून खात्यात. तुमच्या वस्तीत येत नाहीत, कारण त्यांनापण माहीत आहे की ही पण आपल्यासारखीच गरीब लोकं आहेत. गटारी व उकिरड्यातला घाण कचरा व भंगारही साफसुथरा करतात. सगळा कचरा वेगवेगळा करून आईबापाला देतात. आमच्या या पालात शंभर एक घरं आहेत.''

त्यावेळच्या एका तथाकथित नेत्याचा या पोरांच्या पालकांवर चांगला दबाव होता. म्हणून ही पोरं शाळेत येत होती. नेत्याला 'आपण गोसाव्यांना कसे शिक्षणाला प्रवृत्त करतोय' याचे श्रेय घ्यायचे होते. पण सुरेशच्या बोलण्याने मन थोडे भावनिक व्हायचे. त्यांची घरे आणि राहणीमान मी फार जवळून पाहात होतो. या साऱ्याचा कुठेतरी बारीक विचार मनात सुरू असायचा. यातून अजून जाणीव होत होती की आर्थिक परिस्थिती नसताना माझे पालक माझी किती काळजी घेत आहेत. त्या वातावरणातच भावनाप्रधान अशा माझ्या स्वभावाचा विकास झाला असावा असे आज वाटते.

त्या शाळेतल्या मारतुकड्या मास्तरामुळे हळूहळू शाळेबाहेर या मुलांच्या संगतीत जास्त वेळ जाऊ लागला. त्यांच्या आपापसातील संवादातून त्यांच्या भाषेचा अर्थ जाणून घेणे खूप गमतीशीर वाटायचे. डोक्यात अनेक विचार आणि प्रश्न यायचे. आज ते विचार आठवून शब्दात मांडताना ते काहीसे असे असावेत असे वाटते- त्यांना

ही भाषा कशी सापडली असेल? त्यांचे पहिले शब्द कुठले असतील? ते त्यांनी कसे शोधले असतील? आणि त्यांनी ही भाषा त्यांच्यातील इतरांना कशी शिकवली असेल? कारण त्यांना कोणालाही लिहायला वाचायला येत नव्हते. मग मी माझी भाषा घरातून कशी शिकलो याचा विचार करायचो. कारण मलाही कुठे येत होते लिहायला वाचायला? पण माझी भाषा मी बोलू शकत होतो. त्यावेळी हे विचार, हे प्रश्न नक्कीच अमूर्त होते पण कुठे तरी साठत होते. आणि पुढील जडणघडणीत ते पाझरतही राहिले हे नक्की, कारण तुम्हाला जे काही मानसिक-भावनिक पोषणाचे संस्कार बालपणात मिळतात ते आयुष्यावर दीर्घकाळ परिणाम करणारे ठरतात. मग ते कसलेही असोत.

या पालकांवरचा राजकीय दबाव आणि आमिषे या मुलांना शाळेच्या दरवाज्याच्या आत आणून सोडत होती खरी, पण आमच्या मारतुकड्या मास्तराला यांच्या भाषेबद्दल प्रचंड द्वेष वाटत असे. त्यामुळे शाळेत त्यांना आपापसात त्यांच्या भाषेत बोलण्यास त्याने बंदी घातली होती. त्यामागचे कारण काही समजत नव्हते पण त्याचा त्यांच्या भाषेबद्दलचा द्वेष प्रकर्षाने जाणवायचा. मराठीदेखील त्यांची तशी वाईट नव्हती, पण त्यांना ही सक्ती मान्य नव्हती. ती हळू आवाजात का होईना बोलायचीच. पण मास्तराला ऐकू गेले तर त्याचा मार सहन करावा लागत होता. कधीकधी त्यालासुद्धा हळूच बाटकीचा म्हणल्याचा आवाज कानी पडत होता. पण अनेकदा विचारून कुणी बाटकीच्याचा अर्थ सांगत नव्हते. माझे प्रयत्न सुरूच होते. सुरेशला १० पैशाच्या बॉब्या खाऊ घालून त्याचा अर्थ उमगून घेतलाच शेवटी. बाटकीचा म्हणजे 'मादरचोत' अशी शुद्ध मराठीतील शिवी आहे. मला शिवी दिली गेली होती हे जाणून मला काही वाईट वगैरे वाटले नाही कारण शेवटी 'बाटकीच्या'चा मी छडा लावला होता!

मास्तराला वाटणारा त्यांच्या भाषेचा द्वेष हा मलाही कायम सलत राहायचा. शेवटी मास्तराचा कोणत्या ना कोणत्या प्रकाराने निघणारा राग आणि मार मला सहन होत नव्हता म्हणून मी शाळेतून पळ काढत राहिलो. आणि एक वेळ अशी आली की माझी त्यातून सुटका झाली. मला एक नवीन शाळा आणि विश्व मिळाले. पण आजही ती शाळा, ती मुले आणि त्यांच्या भाषेवर बंदी करणारा मारतुकडा मास्तर आठवला, की काही वर्षांपूर्वी कुठे तरी वाचलेली आणि माझ्या वहीत लिहून ठेवलेली अलीटेट नेमतुश्कीन या कवयित्रीची एव्हिन्की भाषेतील मराठीत भाषांतरित केलेली एक कविता आठवल्याशिवाय राहात नाही; आणि मुलांना वर्गात त्यांच्या भाषेला केलेली ती बंदी का नको होती, याचे उत्तरदेखील मिळून जाते.

**माझी भाषा मी कशी विसरू?**
**मी जर माझी भाषा विसरले,**
**आणि त्या भाषेतील गाणी विसरले**
**तर माझ्या डोळ्यांचा आणि कानांचा उपयोग काय?**
**आणि, माझ्या तोंडाचा तरी काय उपयोग?**
**मी जर माझ्या मातीचा वास विसरले,**
**आणि तिच्याशी इमान सोडलं**
**तर माझ्या हातांचा उपयोग काय?**
**आणि, माझ्या जगण्याचा तरी काय उपयोग?**
**माझी भाषा बरोबर नाही,**
**ती कुचकामी आहे**
**ह्या मूर्ख कल्पनेवर**
**मी विश्वास तरी कशी ठेवू–**
**जर माझ्या आईचे मरतानाचे अखेरचे शब्द**
**हे माझ्या भाषेतले असतील तर?**

**प्रकाश अनभूले**
anbhuleprakash@gmail.com
9960460474







# मुलांचे सुप्त गुण

आभा भागवत

आभा भागवत यांनी मास्टर्स ऑफ फाईन आर्टस (यू. एस. ए.), मास्टर्स ऑफ इंडॉलॉजी, जी. डी. आर्ट आणि शास्त्रीय नृत्य व कर्नाटक संगीतातील शिक्षण घेतले आहे. सध्या त्या लहान मुलांसाठी चित्र-कार्यशाळा आणि भित्तिचित्र कार्यशाळा घेतात. पुस्तके व मासिकांसाठी मुखपृष्ठ, रेखाचित्र करतात. त्यांची लहान मुलांसाठी वेगळ्या चित्रशैलीतील काही पुस्तके लोकप्रिय आहेत. अक्षरनंदन शाळेत आणि महिला सेवा संघात चित्रकला पाठ घेतात. अनेक नियतकालिकांमधून त्यांनी चित्रकलेवर लेखन केले आहे. स्वतःची निसर्गाची जाण वाढवण्यासाठी त्या इकोलॉजिकल सोसायटीचा डिप्लोमा करत आहेत.

'Weed is a plant whose virtues have never been discovered. ज्या वनस्पतींचे गुण आपल्याला माहीत नसतात त्यांना आपण तण म्हणतो. हव्या त्या वनस्पती उगवाव्यात म्हणून तण निरुपयोगी समजून काढून टाकलं जातं. उपयोगी काय आणि निरुपयोगी काय याची गणितं माणसाच्या मनात पक्की असतात. छोटी मुलं काय करतात ते न बघताच त्यांनी काय केलं पाहिजे हेही मोठे ठरवत असतात. बाळानं दूध कधी प्यावं, गाणं म्हटलं की शांत व्हावं, पोट भरलं की झोपावं, अमुक वयाचं झाल्यावर चालावं – बोलावं वगैरे वगैरे वगैरे. बाळ मात्र या कशालाच न जुमानता स्वतःला हवं तेच करतं, आईला अगदी रडकुंडीला आणतं. पुढे तर कुणाच्याच हातात फारशा नसलेल्या उंची, वजन, आवाज, रूप यांसारख्या प्रत्येकच गोष्टीवर माणसं अधिकारवाणीनं वाट्टेल तसं मतप्रदर्शन करतात ते करतातच, आणि वर विरोध करणाऱ्या मुलांना रागावतात.

मूल समजून घेणं ही गोष्टच मुळात फार सुंदर आहे. मुलाची निरागसता, विचार करण्याची पद्धत, निर्मळ दृष्टिकोण, प्रत्येकाची स्वतःची अशी खास समज अशा असंख्य गुणांचा जेव्हा ठाव लागेल, तेव्हा मुलाची आपल्याला थोडीफार पारख होईल. मुलांच्यातले सुप्त गुण म्हणजे जणू तणच असतात. त्यांना काढून न टाकता त्यांचं महत्त्व ओळखून वाढू दिलं पाहिजे. निसर्गात तणांचं वेगळं महत्त्व आहे. तणांना असंख्य फुलं येतात, तण वेगानं वाढतं. रानभर पसरतं, जमिनीचा कस वाढवतं आणि त्यांच्यामुळे तयार होणाऱ्या मखमलीसारख्या सकस जमिनीत मोठी मोठी झाडं उगवतात. तणावर अनेक कीटक वाढतात, झाडावर पक्षी राहतात, एक मोठी नैसर्गिक साखळीच असते ती.

मासानोबू फुकुओकांनी जपानमध्ये नैसर्गिक शेतीचे प्रयोग करून जे साधलं त्यातून अत्यंत मूलभूत शैक्षणिक तत्त्वच समोर आली, असं मला वाटतं. तण काढून टाकून जमीन शेतीसाठी तयार करणं त्यांना पटलं नाही. शाळाशाळांतून जसा एकच अभ्यासक्रम सर्व मुलांना शिकवला जातो तसं निसर्गात एकच एक लागवड (mono-culture) केल्यास खूप नुकसान होतं. एका प्रकारची झाडं लावून त्याखाली जमिनीत काहीच उगवत नाही. ना त्याचा जमिनीला उपयोग, ना जीवजंतूंना. झाडांच्या वैविध्याप्रमाणे प्रत्येक मुलाचीही काही अपरिचित वैशिष्ट्यं असतात. ती समजून घेणं दूरच, त्यांचा शोधही लागणार नाही इतक्या वाईट पद्धतींनी मुलांना वागवलं जातं.

चाळीस पन्नास मुलं एका वर्गात कोंबायची आणि त्यांनी एका शिक्षकाकडे लक्ष द्यावं यासाठी प्रयत्न करायचे, हा मुलांवर आणि शिक्षकांवरही अन्यायच होतो. पालकांना घरात मुलापासून सुटका हवी असते आणि त्यासाठी त्यांना शाळा हा उत्तम पर्याय हातात मिळतो. त्यातून ती शाळा चांगलीही असली तर आणखीच छान. पण चांगल्या शाळेत मोजक्याच मुलांना प्रवेश मिळणार, बाकीच्यांचं काय?

माझी एक आठवण आहे. काही कामासाठी शाळेच्या ग्रंथालयापाशी मी वाट बघत उभी होते, १२-१३ वर्षांची असेन. जवळच बसलेल्या दोन शिक्षिकांनी, ''ए इकडे ये गं जरा,'' म्हणून मला बोलावलं.



जणू काही शोभेची वस्तू असल्यासारखं निरखत म्हणाल्या, ''नाव काय? कुठल्या वर्गात आहेस?'' मी तिथेच उभी असताना आपापसात बोलल्या, ''काय सुंदर आहे ना दिसायला? फारच देखणी,'' आणि मग म्हणाल्या, चल जा आता. वाचून कुणाला वाटेल कौतुकच केलं की, त्यात बोचण्यासारखं काय?' एखादी भोग्य वस्तू असल्याप्रमाणे माझ्या बाह्य गुणांचं असं कौतुक केलं जाणं मला दु:स्वासापेक्षाही खटकणारं होतं.

मुलं खूप लहानपणापासून समाज, शाळा आपल्याशी कसे वागतात, त्याचे अर्थ लावत असतात. माणसाचा अस्सलपणा मुलं लगेच टिपतात. खोटं कौतुकदेखील मुलांना आवडत नाही. मुलांमध्ये काय आहे हे समजून न घेता केवळ वरून प्लास्टर चढवल्यासारखं माहिती ज्ञान थापल्यानं ते कधीतरी गळून पडतंच. निसर्गाचा विघटनाचा वेग नेहमीच खूप जास्त असतो, आणि सुघटनाचा कमी. गेल्या शतकात अशा थापलेल्या शिक्षणानं जो माणसाचा ऱ्हास केला, जी झीज केली ती फार वेगानं झाली. ती समजून घेऊन भरून काढणं ही अतोनात आव्हानात्मक प्रक्रिया आहे. त्यावर खूप मेहनत घ्यावी लागेल. आपल्याला या परिस्थितीचं भान येणं ही त्याची पहिली पायरी असेल.

शाळांमध्ये स्पर्धेचं वातावरण इतकं मुरलेलं असतं की, त्या धबडग्यात अनेक मुलांची कलात्मक ओढ कुणाच्या कधी लक्षातच आली नसेल तर नवल नाही. कुठले विषय महत्त्वाचे हे एकदा ठरवूनच ठेवल्यावर कमी लेखल्या गेलेल्या विषयांना तण ठरवून ते दुर्लक्षित राहणं आपसूकच होतं. शाळेतून बाहेर पडल्यावर अनेक वर्ष मला – आपणच एक वाया जाण्याजोगं तण आहोत – अशी भावना होती. त्यामुळे आता माझ्या संपर्कात येणाऱ्या मुलांना तरी असं अजिबात वाटू नये यासाठी मी सतत प्रयत्न करते.

फुकुओकांनी तणातच धान्याची पेरणी केली. कीटकनाशकं वापरली नाहीत. निसर्ग स्वतःची स्वत: कशी काळजी घेतो ह्याची समज आल्यावर ते चकीतच झाले. एखाद्या परिसंस्थेत (ecosystem) कीड का येते याची काही महत्त्वाची कारणं आहेत हे त्यांना दिसून आलं. त्यात ढवळाढवळ झाली तर निसर्गाचा समतोल ढासळतो. मुलांच्या बाबतीतही आपल्याला हेच दिसतं. त्यांच्यातले खास गुण सपाट करून त्यांच्या मनांवर नवीनच काहीतरी पेरल्यामुळे अंगच्या गुणांचा थांगपत्ताच न लागता, ती मुलं बिचारी भलत्याच गोष्टी शिकण्याच्या वाटेनं लागतात. त्यात त्यांना कधीकधी प्रचंड अपयशही वाट्याला येतं. त्यामुळे कमालीचं खच्चीकरण होतं. आणि मग निराशेशी झगडण्यात ऊर्जा घालवावी लागल्यामुळे आयुष्याचा समतोल कुठच्या कुठे हरवतो.

चार वर्षाचा असल्यापासून माझ्या मुलाला, ओजसला 'रस्ता शोधा' हे चित्र काढायला फार आवडतं. त्याच्या त्या चित्रांना आम्ही 'चक्रव्यूह' असं नाव दिलंय. अगदी साध्या चक्रव्यूहांपासून अतिशय गुंतागुतीचे चक्रव्यूह तो तयार करतो. तासन्तास त्याचं आपलंआपलं संशोधन चालू असतं. नवीन चित्रं, नकाशे, ठिकाणं, रस्ते पाहिले की त्यातले आकार लक्षात ठेवून चक्रव्यूहांत वापरतो. तर धाकट्या तुहिनला सोडवायला सोपं जावं म्हणून तो कधी सोपे चक्रव्यूहही बनवतो. एकदा तर आधी अंदाज नसताना, चक्रव्यूह सोडवल्यावर त्यातून नाचणारा मोर दिसायला लागला. त्याच्या दृश्य संवेदना चित्र, कोडं, संशोधन अशा अनेक अंगांनी तो स्वतःहून वापरतो हे पाहताना मनात येतं, की मुलांना मोकळ्या वेळाची नितांत गरज असते. स्थळ-काळाची कोणतीही बंधनं नाहीत अशा वातावरणात मूल खूप गोष्टींचा शोध लावतं. हे शोध लावण्याची प्रक्रिया अतिशय समरसून अनुभवतं आणि अनेक नवे विचार, प्रश्नोत्तरं, संकल्पना, आविष्कार गाठीशी बांधतं. ह्या प्रवासात मूल आपणहून असंख्य गोष्टी शिकत असतं. गरज आहे ती त्यांच्याकडे बघण्याची दृष्टी मोठ्यांमध्ये तयार होण्याची.

घड्याळाला जुंपलेल्या मोठ्या माणसांना लहानग्यांच्या जीवनातली वेळेची वेगळी व्याख्या कशी कळणार? मुलांचं मूल्यमापन कोणत्या निकषावर करायचं याची ठोकळेबाज रीत ठरवली की त्यात लहानग्यांच्या लवचीक मनाला ठाकूनठोकून बसवता येतंच. आणि ते काम शाळा अगदी आवडीनं करतात. उदाहरणार्थ, ओजसच्या या गुणाला अभ्यासक्रमात स्थानच नाहीय. अनेक सुप्त गुणांना जर शाळेतल्या ठरावीक अभ्यासक्रमात जागा करणं शक्य नसेल तर निदान पालक तरी या गुणांची दखल घेणार आहेत का? मुलांच्या दृष्टीनं बघायला



लागलं की पालकांचं वागणं अगदी भयंकर खटकायला लागतं. शाळेतून आली की मुलं घरी कंटाळतात आणि घरच्या मोठ्या मंडळींना त्रास होतो म्हणून त्यांना वेगवेगळ्या क्लासेसना हाकललं जातं. ते आपण थांबवणार आहोत का? मुलांना आपलाआपला वेळ मिळण्याची मुभा देणार आहोत का? विज्ञान, गणित, कला या शाखांपलीकडेसुद्धा हे विश्व खूप मोठं आहे याची जाणीव होण्याएवढा संवेदनशील समाज कसा आणि केव्हा तयार होणार?

कलाकार मुलांकडे तर समाज जवळजवळ कीव-सहानुभूतीनंच बघतो, हे मुलाच्या दृष्टीनं नसेलही पण समाजाच्या दृष्टीनं अगदी केविलवाणं आहे. चित्रकला आणि सतार शिकणाऱ्या दोघी मुलींना १० वी आणि १२ वीच्या परीक्षेपूर्वी सहा महिने क्लास बंद करायला शिक्षकांनी भाग पाडलं. कलेला वाहून घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तर अक्षरश: अनेक दिव्यातून जावं लागतं. ही मुलं शाळेतल्या ठरावीक अभ्यासक्रमात अनेकदा रमत नाहीत. पण त्यांचे सुप्त गुण ओळखून जोपासायला प्रोत्साहन देणं तर सोडाच, ते मारून कसे टाकता येतील याचीच व्यवस्था अभ्यासक्रमांच्या काटेकोर राबवण्यातून होते. सुंदर नाच करता येणारीला वर्गातलं गणित येत नाही असा शिक्का मिळत असला तर तिची तालाची समज गणितात वापरता येण्याजोगी आहे, तसा प्रयत्न करून बघायला हवा असं निदान पालक-शिक्षकांना तरी सुचावं. तीन, पाच, सात, नऊ अशा विषम मात्रांचे अवघड ताल उत्तम समजणाऱ्या विद्यार्थ्याला गणितात गती दिसत नसेल तर शिकवण्याच्या पद्धतीत काहीतरी कमतरता आहे, किंवा आणखीच वेगळ्या कारणानं तो मागे पडतो आहे, हे निश्चितच! चित्रकलेत गती असणाऱ्या एखाद्या मुलाला भौगोलिक रचना समजून घेण्यात फारशी अडचण येण्याचं काहीच कारण नाही. त्याच्या चित्रगुणांची सांगड त्याच्या अवकाशजाणिवेशी (spacial understanding) घालून त्याचा रस टिकवून ठेवता येईल, हे पालक-शिक्षकांना सुचायलाही हवं आणि जमायलाही हवं. ‘कला दुय्यम दर्जाच्या असतात, आणि महत्त्वाचे विषय म्हणजे केवळ विज्ञान आणि गणित!’ या मिथकातून आपण सगळेच जेव्हा बाहेर पडू तेव्हाच आपल्याला मुलांचे खरे गुण डोळसपणे टिपता येतील.

शालेय शिक्षणात विषयांचे कप्पे करून शिकवल्याने जो एकसुरीपणा येतो तो विशेषत: प्रतिभाशाली मुलांना मारक ठरतो. स्पर्धा, कौतुक यांना बळी पडून विशिष्ट विषयांवर मार्कांसाठी मेहनत घेऊन, ठरावीक प्रतिष्ठित विषयांत भरधाव धावणारी मुलं पुढे जातात. अंतिमत: त्यांचंही नुकसानच होतं, स्वतःला इतरांहून श्रेष्ठ समजण्यातलं नुकसान! स्वत:ला श्रेष्ठ समजणाऱ्यांमध्ये उत्स्फूर्तता उरत नाही. नुकत्याच चित्रं काढायला लागलेल्या छोट्या मुलासमोर बसून, ते चित्र कसं काढतं हे तुम्ही कधी पाहिलंय? चित्र काढताना लहान मूल अतिशय उत्स्फूर्त असतं. काढता काढता एका क्षणात निर्णय घेतं आणि चित्रं, त्याचे अर्थ बदलतं. त्याला विचार शिकवणारे आपण कोण? त्याची विचार करायची पद्धत वेगळी आहे, ती समजून घेतली पाहिजे. त्याचा अभ्यास आपण केला पाहिजे.

मुलांना निसर्गापासून तोडून आपण वर्गात कोंबतो. निसर्ग ओरबाडून, फुलं पानं तोडून, प्राण्यांची तर चिरफाड करून, त्यांच्या संवेदना बोथट करत-करत आपण त्यांना निसर्ग कसा असतो याची थिअरी शिकवतो. मातीशी ज्यांचा संबंधच नाही आणि येण्याची शक्यताही नाही, त्यांना चांगलं शिक्षण कसं काय घेता येणार?

प्रत्येक पदार्थाची जन्मापासून मृत्यूपर्यंतची एक साखळी असते. एखादी वस्तू कुठून आली, कशी तयार झाली हेच जर आपल्याला माहीत नसेल तर मुळांपासून तुटलेल्या झाडासारखी अवस्था नाही का होणार? याची काही उदाहरणं आजही आपल्या अनुभवास येत असतील. संपूर्ण शहरी वातावरणात वाढणाऱ्या विद्यार्थ्याला वाटतं की दूध पिशवीतून येतं, तांदूळ पिशवीतूनच येतात आणि झाडाचं रोपही पिशवीतूनच. पण ते पिशवीत कसं आलं, हा प्रश्न त्याला पडणार नाही आणि उत्तर देण्याची इच्छा पालकांनाही होणार नाही. ज्या निसर्गाच्या पायावर आपण उभे आहोत तो पायाच शहरी जीवनात ओळखीचा नाही. मोठाल्या सोसायट्या बांधून जमीन आणि रस्ते कॉंक्रीटचे असले की तिथेच वाढलेल्या मुलामुलींना माती दिसली तरी घाणच वाटते. चिखलात खेळायचा, माती खाऊन बघायचा देखील अनुभव पालकांनाच नसला तर मुलांना मिळण्याची शक्यताच नाही. कारण मुलं त्या दिशेनं जाऊच नयेत अशी काळजी पालक घेणारच.

मुलांमध्ये स्वतःहून शिकण्याची क्षमता असते हे तर आपण जणू विसरूनच गेलो आहोत. नुकतंच पावसाळी सहलीसाठी महाडजवळ गेलो होतो. डोंगरावरच्या छोट्याशा डबक्यात मुलांनी बेडूकमासे पाहिले आणि त्यांना उत्स्फूर्तपणे वाटलं की ते पकडून जवळून पहावेत. मलाही ही कल्पना आवडली. त्यानंतर जवळजवळ तासभर मुलांनी ते बेडूकमासे पकडायचा प्रयत्न केला. ते करत असताना त्या पाण्यात त्यांनी वेगवेगळी छोटी झाडं पाहिली, शेवाळी पाहिली. त्यांना हात लावला. त्यांचा वास घेतला. कदाचित चवही पाहिली असेल. आपण काय केलं की पाणी गढूळ होतं आणि बेडूकमासे कसे लपायला पळून जातात, पाणी पुन्हा शांत व्हावं यासाठी किती वेळ थांबावं लागतं, बेडूकमासे केवढे चपळ असतात आणि कित्ती प्रयत्न करूनही ते कसे हातातून सुळकन निसटतात, त्या पाण्यात बेडूकमाशांखेरीज अजून कुठले मासे आहेत का आणि ते बेडूकमाशांहून वेगळे कसे आहेत - अशा एक ना अनेक गोष्टी मुलं शिकली. मनात आलं, की एक वर्षभर त्यांना असं मनसोक्त खेळायला मिळालं तर काय बहार येईल! स्वतःहून सुचून आणि निवडीचं पूर्ण स्वातंत्र्य मिळून, स्वतःच पद्धत ठरवत कितीकिती अनुभव ही मुलं घेऊ शकतील? आपण मोठी माणसं प्रत्येक गोष्ट मोजायला बघतो, वाढवायला बघतो, त्यातून निष्कर्ष काढायला बघतो. त्या नादात कित्येक अनुभूती गुळमुळीत होऊन

जातात याची आपल्याला जाणीवच नसते. मुलांना निवडीचं स्वातंत्र्य मिळालं की एकच गोष्ट त्यांना विविध अंगांनी समजू शकते; यावर पालक-शिक्षकांनी ठाम विश्वास ठेवायची गरज आहे. कदाचित ते शब्दात पकडणं मुलामुलींना जमणारही नाही.

आपण माहिती तंत्रज्ञानाच्या युगातील लोक केवळ माहितीला ज्ञान समजण्याची घोडचूक करतो. एक सुंदर वाक्य आठवतंय, How can I feel with my eyes and see with my skin? हे अनुभवण्यासाठी तंत्रज्ञानापासून लांब आणि निसर्गाच्या जवळ जायला हवं. निसर्गावर आणि मुलाच्या क्षमतेवर अपार विश्वास असणाऱ्या एका आईनं, मुलानं एका डोहातलं पाणी किती खोल असेल असं विचारल्यावर, उडी मारून बघ असं उत्तर दिल्याचं मला माहितेय. मुलांचे अंदाज, आत्मविश्वास आणि कुठल्याही परिस्थितीत तरून जाण्यासाठी उत्तरं शोधायचं कौशल्य आपल्याला समजतच नाही.

निसर्गात जेवढे फायदे आहेत तेवढेच तोटेही. निसर्ग कुणाला श्रेष्ठ-कनिष्ठ मानत नाही. तंत्रज्ञान माणसाच्या बाजूनं आहे म्हणून माणूस निसर्गावर अधिपत्य गाजवू शकतोय. मात्र निसर्गाशी सलोख्यानं राहिल्याशिवाय माणसाला जगता येणार नाही. आजच्या मुलामुलींना निसर्गवंचिततेच्या अस्वास्थ्याला (Nature Deficit Disorder) तोंड द्यावे लागते आहे, असं रिचर्ड लूव्ह यांनी Last Child in the Woods या पुस्तकात अतिशय समर्पकपणे म्हटलं आहे. उडी मारून डोहाच्या खोलीचा अनुभव घेण्याच्या शक्यतेचा विचार आपण



आपल्या मुलासंदर्भात करून पाहिला तर तशी शक्यता आज लोप पावते आहे असं जाणवेल. मुलांना संधी देऊनसुद्धा तसे घेण्याजोगे अनुभव मिळतील का, हाही प्रश्नच आहे.

परदेशी विद्यापीठात शिकणाऱ्या एका आईला बाळाला सांभाळायला कोणी न मिळाल्यामुळे बाळाला वर्गात आणावं लागलं. तिचा अभ्यास व्हावा म्हणून शिक्षकांनी बाळाला कडेवर घेऊन वर्ग शिकवला. हे बघितल्यावर माझ्या मनात आलं की हे खरं नैसर्गिक आहे! लहान मूल आपणहून स्वतंत्र होईपर्यंत आई-बाप जातील तिथे जाणं हा त्याचा अधिकारच आहे. पण शिक्षण, काम, नोकरी या ठिकाणी लहान मुलांच्या गरजांची पर्वा कोण करतं? आई किंवा बाबाबरोबर मुलांना प्रत्येक ठिकाणी जाता येणं हे सेंद्रीय जीवन आहे. असं सेंद्रीय आयुष्य जर मुलाला मिळावं अशी आपली कल्पना असेल, तर मुलांच्या गरजांचा विचार करून – तशा व्यवस्था कशा तयार करता येतील – याचा कदाचित नव्यानंच विचार केला पाहिजे. वेगवेगळ्या वयाच्या मुलांनी एकत्र शिकणं हेही मला सेंद्रीय वाटतं. पण सोयीसाठी एका वयाची मुलं एका वर्गात असणं, यात आपल्याला काही वावगं वाटूच नये इतकं ते अंगवळणी पडलं आहे.

कुठल्या भाषेतून शिक्षण हा प्रश्न पडताच कामा नये. मराठी माणूस मराठीतच शिकणार. स्पर्धा, बाजारीकरण यांच्या धुमश्चक्रीत इंग्रजीचं प्रस्थ एवढं वाढवून ठेवलं गेलं की मातृभाषेचं महत्त्वच आपण विसरलो. हळूहळू येणारा आपल्या मातृभाषेचा मृत्यू आता समोर उभा ठाकलेला दिसतो आहे. मातृभाषेत शिक्षण घेतलेल्याला एकेका शब्दाचा इतिहास, रचना, त्याची पाळंमुळं असे अनेक आयाम माहीत असतात. वेगळ्या भाषेतील शब्द समोर आला की प्रथम समजत नसला तरी शब्दांची खोली माहीत असल्यामुळे मातृभाषेत शिकलेला माणूस इतर भाषांतल्या शब्दांच्या मुळाशी जातो आणि दुसरी भाषाही समजून घेऊ शकतो. भाषेसारख्या मूलभूत संवाद-माध्यमाचा हा जणू आत्माच आहे. आत्माच न गवसलेल्यांकडून कुठल्याही प्रकारच्या खोल विचारांची अपेक्षा करता येऊ शकेल का?

एक प्रश्न तर मला नेहमीच पडत आलेला आहे. निसर्गतः मोठ्यांच्या आसपास बोलण्यावागण्यातून मातृभाषा शिकण्याची क्षमता प्रत्येक मुलात असते, तेव्हा त्याशिवायही अनेक गोष्टी त्याला आपणहून शिकता येणार नाहीत का? गणित न शिकता एखाद्या लहानग्या पिल्लाला आज जेवणाचं एक ताट कमी घेतलं गेलंय हे कळतं, खेडेगावामधली शाळेत न गेलेली आजी रानातून आंबे तोडून आणून विकू शकते, त्याचा भाव ठरवू शकते, पैसे मोजू शकते. मोजणीचा नैसर्गिक अंदाज आसपास बघणाऱ्या वागणाऱ्या व्यक्तीला अगदी सहज आणि बऱ्यापैकी अचूकही येऊ शकतो. खरं म्हणजे, संधी मिळाली ना तर प्रत्येक मूल स्वतःची मोजणीची संकल्पना शोधून काढू शकेल, पण आपणच अपुरे पडतो आणि जगाच्या सोईसाठी म्हणून एकच एक पद्धत सर्वच मुलांना शिकवतो. मूल समजून घेण्याच्या आपल्या क्षमता रुंदावल्या तरच मुलांच्या हजारो सुप्त गुणांना न्याय देता येईल. एक समर्पक श्लोक आहे –

**अमंत्रम् अक्षरं नास्ति,**
**नास्ति मूलम् अनौषधिं।**
**अयोग्यः पुरुषः नास्ति,**
**योजकस्तत्र दुर्लभः।।**

मंत्र होऊ शकत नाही असं कुठलंही अक्षर नाही. औषध होऊ शकत नाही असं कुठलंही मूळ नाही. माणूस कुठलाही अयोग्य नाही. फक्त ती योग्यता ओळखणारा योजक मिळणं कठीण असतं.

वनस्पतीशास्त्रात तणांचेही उपयोग आता संशोधक शोधून काढताहेत. आपल्या बाळांमधल्याही सुप्त गुणांची ओळख पालक-शिक्षकांना पटावी अशी युक्ती शोधणारे योजक आता आपल्याला निकडीनं हवे आहेत.

**आभा भागवत**
abha.bhagwat@gmail.com
9923440194

# चित्रामागचं चित्र

यशवंत देशमुख



यशवंत देशमुख हे व्यावसायिक चित्रकार आहेत. त्यांचे शिक्षण मुंबईतील जे जे स्कूल ऑफ आर्ट्स येथे झाले. १९८६ पासून देशभरात त्यांची अनेक चित्र-प्रदर्शने आयोजित झालेली आहेत. १९९३ मध्ये त्यांना बॉम्बे आर्ट सोसायटीतर्फे दर वर्षी दिली जाणारी प्रतिष्ठित बेंद्रे-हुसेन स्कॉलरशिप मिळाली. कला क्षेत्रातील इतरही अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

मी चित्र काढायला केव्हा सुरुवात केली ते नक्की आठवत नाही. मावशीकडे मालेगावला असतानाची एक आठवण आहे. माझी मामेबहीण शालूपण तिथेच असायची. माझ्यापेक्षा एक वर्षानं ती मोठी होती. अक्षरं गिरवायला तिला पाटी आणली. मावशी तिचा हात धरून पाटी गिरवायला शिकवायची. तिच्या पाटीवर मीपण कधी ती शिकवलेली अक्षरं लेखणीनं काढून बघत असे. तेव्हाची 'अ, ळ किंवा क्ष' अक्षरांची वळणं काढतानाची दृश्यं आणि लेखणी वळवण्यातला तेव्हाचा आनंद आजपण मला आठवतो. विशेषतः काळ्या पाटीवरच्या पांढऱ्या रेषा. ''हा बघ किती सहज लिहितो,'' मावशी कौतुक करायची. मी शाळेत जायला लागलो, तेव्हा पाटीवरचा गृहपाठ सजवण्याकडे माझा जास्त कल असायचा. पाटी पाण्यात स्वच्छ धुणं, वाळवणं, फूटपट्टीनं समांतर रेषा आखणं वगैरे. पाटी हातानं सहज पुसता येते यासारखा आनंद नाही. सगळ्यांनाच अभ्यासाची गोडी होती असं नव्हतं. पण पाटीवरचा गृहपाठ लिहिण्याचा उत्साह असायचा. नंतर वह्या आल्या. वहीवर नाव टाकणं हा सोहळा असायचा. स्वतःचं नाव पहिल्या पानावर लिहिताना त्याला सावल्या काढणं, भाज्यांच्या आकारातून, माणसांचे आकार वळवून नाव लिहायला मजा यायची. मित्रांच्या वह्यांवर अशी नक्षीदार नावं टाकणं हा माझा आवडता उद्योग होता. शिक्षकांनी यावर कधी आक्षेप घेतला नाही. पुढे पुस्तकातली चित्रं रंगवणं, नेत्यांच्या चित्रांना दाढी -मिशा काढणं वगैरे उद्योगही केले. एकदा इतिहासाचं पुस्तक सरांनी वर्गात फडफडवलं. ''हे बघा रे यानं कसं सगळ्यांना विद्रूप केलंय. उद्या तुमचे फोटो छापून येतील तेव्हा तुम्हालासुद्धा असं विद्रूप केलं तर?''

पुस्तकात आंबेडकरांचं एक मोठं चित्र होतं, काळ्या रंगातलं. नेत्यांची बहुतेक चित्रं ओके नावाचे चित्रकार काढत असत. हे चित्र मला खूप आवडायचं. काढायला देखील सोपं होतं. मी वहीच्या पुठ्ठ्यावर पेनानं ते काढलं. हुबेहूब आलं म्हणून आनंद झाला. घरात भिंतीवर लावलं. संध्याकाळी आई आली. म्हणाली, ''हे चित्र आपल्या घरात नसतात लावत.''

घरातल्या भिंतीवर चित्रं काढायला मला अटकाव नसे. एकदा पोथीवरचा बघून द्रोणागिरी नेणारा हनुमान मी मोठ्या आकारात कोळशानं काढला. त्यात हळद, चुना, कुंकू यांचे रंग भरले. आई-तात्यांना कौतुक होतं.

माझं बरंचसं शिक्षण अकोल्याला झालं. शाळेत चित्रकला विषय नव्हता. आठवीत सेमी इंग्लिश घेतल्यामुळे 'अ' वर्गाला सोडून बाकी वर्गांना चित्रकला विषय होता. त्यामुळे मी फक्त घरीच चित्रं काढत असे. कुठून कुठून मिळवलेली भेटकार्ड, वर्तमानपत्रातल्या ब्लॉक प्रिंटनं केलेल्या जाहिराती ह्या मुख्यतः चित्र काढण्याच्या प्रेरणा होत्या. त्यावेळी लेटरबुक्सवर टोपल्या विणणारे आदिवासी, नदीकिनारी होडीवाला अशी काल्पनिक चित्रं छापलेली असायची. ही चित्रं मी कॉपी करत असे. जलरंगात रंगवत असे. जलरंग पाण्यात खूप पातळ करून रंगवतात हे मला बरेच दिवस माहीत नव्हतं. मी



पांढरा रंग मिसळून घट्ट करून लावत असे.

आठवीत असताना माझ्या वर्गमित्रानं– गोविंदानं मला चित्रावर पट्टीनं चौकटी आखून ते चित्र मोठं कसं करायचं हे शिकवलं. या पद्धतीनं नटनट्यांची मोठी केलेली चित्रं आम्ही वर्गात सरांच्या लपवून एकमेकांना दाखवायचो. एकदा असंच फिरत असताना एक माणूस दारात बसून चित्र काढताना दिसला. पांढऱ्या कागदावर काढलेलं एका नटाचं ते चित्र होतं. पेन्सिल दगडावर घासून तो पावडर करायचा, ती पावडर, पेपरच्या पुंगळीनं चित्रात घासून शेडिंग करायचा. मी लगेच घरी येऊन तसंच पेन्सिल शेडिंगचं चित्र करायला घेतलं. असं काही नवीन सुचलं की अभ्यास गौण असायचा. फक्त चित्राचा ध्यास. वाचनालयातल्या फिल्मी मासिकांमधून फाडून आणलेली चित्रं, सिनेमा थिएटरसमोर मिळणारी छोटी–छोटी नटनट्यांची रंगीत चित्रं. अशी आठ–दहा पेन्सिल शेडिंगची चित्रं काढून झाली. प्राण, रेखा, राखी, धर्मेंद्र अशी चित्रं मी घरभर चिकटवली. वाड्यातले सोबती, त्यांच्या आया चित्रं बघून जायच्या.

अकोल्यात एकूण सात सिनेमा थिएटर्स होती. त्यातल्या रीगल सिनेमाच्या मागच्या बाजूला एक पेंटर मोठाली पोस्टर्स रंगवायचा. वीस फूट बाय तीस फूट वगैरे. एन. मेहरे असं नाव असलेला बारीक अंगकाठीचा हा पेंटर एका डोळ्यानं तिरळा होता. नट–नट्यांच्या ब्लॅक अँड व्हाईट फोटोवर सुईने चौकटी आखून तो ही मोठ्ठाली चित्रं काढायचा. त्याची रंगसंगती अफलातून असायची. मी तल्लीन होऊन तासन् तास त्याचं काम बघत रहायचो. नट्यांचे डोळे तो विशेष पद्धतीनं रंगवायचा. त्याच्या पद्धतीनं त्यांमध्ये तो काल्पनिक रंग भरायचा. प्रत्यक्षात मात्र फोटोमधले डोळे साधेच असायचे. डोळे काढताना त्याच्या मदतनिसाला तो तंबाखूची पुडी आणायला सांगायचा. महिना–दोन महिन्यातून एखाद्या वेळेसच तो चित्र रंगवायचा. अन्यथा तिथे कोणी नसायचं. त्यामुळे त्या भागात गेलं, की मी मुद्दामहून थिएटरमागे चक्कर टाकत असे. एकदा सुरू झालं की सात–आठ दिवस हे चित्राचं काम चालायचं.

आमच्या वाड्याजवळ दत्ता पेंटर नावाचा साईनबोर्ड पेंटर होता. रस्त्याच्या कडेला विजेच्या दिव्याखाली कधीकधी तो दिसायचा. खडू आणि कोळशाच्या साहाय्यानं चौकटी आखून नट–नट्यांची दोन–तीन फुटांची चित्रं तो काढायचा. सगळी मुलं भोवती जमा व्हायची. बोटानं खडू, कोळसा घासत तो शेडिंग करायचा. तो निघून गेल्यावरसुद्धा मी खूप वेळ ते चित्र बघत बसे. त्या दिवशी तो आमचा हिरो असायचा. अन्यथा दत्ता पेंटर खूप महत्त्वाचा माणूस म्हणून आदरानं कुणी त्याच्याकडे पाहिल्याचं आठवत नाही. पांढरा बनियन आणि पायजम्यावर तो असायचा. सार्वजनिक नळावर पाण्याची भांडी घेऊन किंवा पिठाच्या गिरणीतही तो दिसायचा. कधी मंदिरामागे बॅनर्स लिहीत असायचा. यामुळेच की काय आई म्हणायची पेंटर होऊ नकोस. सायन्स शीक.

अकोल्यात बाजारात लागून तीन फोटोफ्रेम्सची दुकानं होती. कुणा चित्रकाराची चित्रं तिथे लटकवलेली असायची. अगदी हातानं रंगवलेली. एखादं निसर्गदृश्य, एखादा दूरवर पाठमोरा जाणारा संन्यासी, राजेशाही पलंगावर बसून साश्रू नयनांनी तलवारीला कवटाळणारी राणी किंवा संथ पाण्यात होडी हाकणारा नावाडी वगैरे तासन तास दुकानाबाहेर उभं राहून ती दृश्यं मनात साठवण्याचा प्रयत्न करायचो. ढगातली सूर्यकिरणं कुठल्या रंगाची आहेत, ढगांचा रंग किंवा पाणी कसं काढलं आहे हे लक्षात ठेवायचो. बघून बघून ते चित्र पाठ करायचो. मग घरी जाऊन हे चित्र रंगवायचा प्रयत्न करायचा. नाही आठवलं की परत त्या फ्रेमच्या दुकानात जायचं, पुन्हा चित्र पाठ करायचं. धावत घरी जाऊन आठवून आठवून रंगवायचं. अशा पाच सहा फेऱ्यातरी व्हायच्या. गाण्यांच्या जुन्या काळ्या तबकड्यांवर चित्रं काढली जायची हा चित्रप्रकार मला कधी आवडला नाही.

चित्रातल्या निसर्गदृश्यात कल्पनेनं डोंगर काढावे लागत. कारण आमच्या भागात डोंगर नव्हते. दूरवर पसरलेली शेतं व नंतर क्षितिज–रेषा. सपाट प्रदेशामुळे आकाश जास्त दिसायचं मी फोटो किंवा सिनेमातच डोंगर पाहिलेले. सिनेमात जे उंच कातळाचे अवाढव्य डोंगर दिसत त्याची पहाड' म्हणून एक प्रतिमा माझ्या मनात होती. अकोल्यातल्या पुलाजवळ नदीतलं पाणी वाहून नेण्यासाठी एक षट्कोनी सिमेंटची खोली होती. या खोलीवर बऱ्याच जाहिराती रंगवलेल्या होत्या. एक भलीमोठी मोटर त्या खोलीत होती. या खोलीला मोठाले काळे पाईप जोडलेले होते. त्यावेळची माझी भावना अशी की या खोलीत एक पहाडाचा तुकडा आणून ठेवलाय. त्यातून सारखं पाणी वहात असतं. ते पाईपातून या नदीत सोडलं जातं.

श्याम देशपांडे नावाचा मुलगा माझ्या वर्गात होता. तो सुंदर चित्रं काढायचा. मधल्या सुटीत एखाद्याला समोर उभं करून त्याचा चेहरा आत्मविश्वासानं फळ्यावर काढायचा. एकदा त्याच्याकडे त्याची चित्रं बघायला गेलो. पोस्टर कलर्समधे तो चित्र रंगवायचा. रंग पक्के व्हावेत म्हणून त्यात डिंकाचं पाणी मिसळायचा. ही कल्पना त्याचीच असावी. आमच्या घरामागे देवीचं मंदीर होतं. प्रवेशद्वारावर कमळाच्या फुलात उभ्या राहून पाणी ओतणाऱ्या पऱ्या श्यामनं काढल्या. व्ही. शांताराम यांच्या सिनेमात दाखवतात तशा. लांब वेणीचा शेपटा असलेल्या. इनॅमल रंगसुद्धा तो छान वापरायचा. सध्या त्याची पुण्यात ब्लूम ॲडव्हर्टायझिंग नावाची एजन्सी आहे. त्याला स्पर्धांमधे बक्षिसं मिळाल्याचं मी ऐकलं होतं. मला ह्या स्पर्धा माहीत नव्हत्या. मी चित्रं काढतो हे वाड्याबाहेर कोणाला विशेष माहीत नव्हतं.

''अकरावीला कॉलेजात इंटर–मिजिएट ग्रेड परीक्षा दे,'' असं मला कोणीतरी सुचवलं. तोपर्यंत माझ्या शाळेत स्वतंत्र चित्रकलेचे शिक्षक आले होते. सांगडे सर. मी त्यांना परीक्षेबद्दल विचारलं. चित्रं दाखवली. परीक्षेत वेगळे वेगळे विषय असतात. ''तुला ट्यूशन लावावी लागेल'' असं ते म्हणाले. मी तयार झालो.

स्टिललाईफ, निसर्गचित्र, संकल्पचित्र वगैरे विषय मी आत्मसात केले. परीक्षेत 'ए' ग्रेड मिळाली. माझी २५-३० चित्रं सरांनी पुढच्या विद्यार्थ्यांना दाखवण्यासाठी ठेवून घेतली. चित्रकलाशिक्षणासाठी त्यांनी मला प्रोत्साहित केलं. विज्ञानशाखेतील ऐन बारावीच्या परीक्षेच्या काळात मी चित्रं काढायचो. आई म्हणायची, ''सांगडे मास्तरांनी मुलाला बिघडवलं.'' परिणाम तोच झाला. बारावीत वाऱ्या करायला लागल्या.

त्यातच कहर म्हणजे राज्य चित्रकला प्रदर्शनाचा एक भाग अकोल्यातल्या शाळेत आठ दिवसांसाठी आला. दुसऱ्या दिवसापासून सकाळ ते संध्याकाळ मी तिथे! दुपारच्या वेळेला प्रदर्शन अधिकारी म्हणायचे, ''अरे आम्हाला जेवायला जायचंय, तू पण जेवून ये.'' प्रदर्शनात हळदणकर, देऊसकर, आबालाल रहमान वगैरे चित्रकारांची मूळ चित्रं होती. शिवाय कला-विद्यार्थ्यांची पण चित्रं होती. शेवटच्या दिवसापर्यंत मी ही चित्रं डोळ्यात साठवली. आतापर्यंत बघितलेल्या चित्रांपेक्षा या चित्रांतले भाव वेगळे होते. एक निर्मळ साधेपणा होता. रंगांच्या फटकाऱ्यातून आलेल्या व्यक्तिचित्रणात जिवंतपणा होता. प्रत्यक्ष व्यक्ती किंवा वस्तू समोर ठेवून रंगवल्यामुळे त्याची खोली प्रथमच जाणवली, जी आधीच्या चित्रांमध्ये कधी नव्हती. भेटेल त्याला मी चित्रप्रदर्शनाबद्दल सांगत होतो. आपल्याला असं चित्र काढता आलं पाहिजे असं मनोमन वाटायचं. शेवटच्या दिवशी अधिकारी म्हणाले, ''तू जे.जे स्कूलला प्रवेशासाठी अर्ज कर.'' पण परगावी शिकण्याएवढी माझी आर्थिक स्थिती नव्हती. 'हा सारखी चित्रंच काढतो' अशी काळजीवजा तक्रार घरात होती. परिस्थिती आणि इच्छा या कोंडीत मी होतो. त्या वर्षी दुसऱ्या बहिणीला शासकीय रुग्णालयात नर्सची नोकरी मिळाली. तिनं शिकायला मुंबईत पाठवायची तयारी दाखवली.

आजूबाजूची गावं सोडली तर मी तसा प्रवास केला नव्हता. आणि आता मुंबईसारख्या मोठ्या शहरात आलो. एकटा. खूप उमेद होती. काहीही करण्याचा आत्मविश्वास होता. प्रवेश परीक्षेला मुलांसोबत त्यांचे पालक हातात सामान घेऊन लगबग करत होते. मला गंमत वाटली. मुलांसोबत एवढ्या प्रमाणात पालक कधी पाहिले नव्हते. इथल्या जगापेक्षा आपण वेगळे आहोत याची जाणीव झाली. माझ्यासारखे एकटेही होतेच. हुबेहूब चित्र काढता यावं या इच्छेनं सगळे शिकायला येत असावेत. मी पण तसाच. रिझल्ट लागायला आठ-पंधरा दिवस वेळ होता. तोपर्यंत मी स्वप्नात कल्पनेतलं कॉलेज, हॉस्टेल बघत असे. मला ॲडमिशन मिळाली. खूप हायसं वाटलं.

जे. जे. स्कूलला आल्यावर नवचित्रकलेची ओळख झाली. कलेच्या इतिहासातून घडलेली स्थित्यंतरं अभ्यासाला होती. युरोपियन कला होती. भारतीय चित्रकला पण होती. भरतमुनींचं सौंदर्यशास्त्र, लघुचित्रशैली, मंदीरशिल्प, स्वातंत्र्योत्तर काळातील नवकला वगैरे. युरोपियन चित्रकलेएवढीच भारतीय कला मला नवखी होती. त्यावेळी नवचित्रकला म्हणजे ॲबस्ट्रॅक्ट आर्ट असं समीकरण होतं. वातावरण नवकलेनं भारलेलं होतं. हुबेहूब चित्र काढणं मला जमत होतं, कळतही होतं. पण 'खरं चित्र यापेक्षा वेगळं असतं, तुमच्या अनुभवविश्वाशी ते जोडलेलं असावं लागतं. ते जास्तीत जास्त दृश्यरूप असतं'. असे विचार ऐकायला मिळायचे. मी गोंधळलो होतो. या सर्व प्रवाहांचा धागा माझ्या परीनं समजून घेत होतो. खूप चित्रं काढत होतो. समोरची व्यक्ती हुबेहूब काढणं म्हणजे क्राफ्ट. रंग, रेषा, पोत यांच्या वापरातून निव्वळ अभिव्यक्ती शोधणं म्हणजे खरी कला, असे ढोबळ दोन भाग होते. दोन्ही विषयांचे शिक्षक वेगळे असायचे. माझी ह्या नवविचारातून आलेली चित्रं इतरांना आवडायची. पण मला ती आपलीशी वाटत नसत. वस्तू जशाच्या तशा न रंगवता त्यात आपल्या अनुभवाच्या प्रेरणा शोधता येतील का, हया उद्देशानं मी स्वतंत्र चित्रं काढायला सुरुवात केली. बूट, बाटल्या, पेटीसारख्या वस्तू समोर मांडून हव्या त्या पद्धतीनं रंगवण्याचा मी प्रयत्न करत होतो. हे सगळं स्वतःसाठी होतं. ज्येष्ठ चित्रकार नक्की चित्रं कशी काढतात, हे समजून घेण्याचा प्रयत्न करत होतो. अगदी थोड्या चित्रकारांच्या विचारात स्पष्टता जाणवायची. माझं चित्र बदलायला लागलं होतं.

झिरपत गेलेल्या गतकाळातील दृश्यानुभूती, दूरवर पसरत गेलेल्या सपाट काळ्या शेतजमिनी, तुरळक झाडं, क्षितिज रेषेपासून अफाट पसरलेलं आकाश, त्या वातावरणातला रखरखीतपणा, बाभळीची जाळीदार बनं यातून आलेले अवकाशाचे संदर्भ चित्रात जाणवू लागले.

खोल गेलेल्या विहिरी, अंगणात मातीत गाडलेली रांजणं, भगभगीत उजेडात रांजणाच्या आत बघावं तर खोल गेलेला काळोख, तळाशी असलेलं पाणी - आकाशाच्या प्रतिबिंबानं उजळलेलं. त्या अफाट अवकाशाच्या जाणिवांमुळे जाणवणारं आपलं थिटेपण, पांढऱ्या मातीची घरं, त्याच मातीचे अंगणात वरखाली असलेले ओबड-धोबड चौथरे, गोल फिरणाऱ्या वावटळीत डोळे बंद करून उभं राहिलं की अंगाला वाऱ्यामुळे जाणवणारा भोवरा, मुख्यतः पांढरा सदरा, धोतर, फेटे नेसलेले गाव-बाजारातील माणसांचे घोळके, स्वच्छ, मळक्या कपड्यांतून डोकावणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या विविध छटा उन्हात विशेष जाणवायच्या. लख्ख प्रकाशात वस्तूंचा करकरीतपणा विशेष जाणवायचा.

या सगळ्या जाणिवा माझ्या चित्राच्या प्रेरणा ठरल्या. याचा अर्थ जुन्या आठवणी रंगवत होतो असा नव्हता. हे दृश्यानुभव अबोध मनाच्या पातळीवर नवीन दृश्यरूपं शोधायला वाट करून देत राहिले. ह्या भौगोलिक, सामाजिक प्रेरणांमधून चित्र होत गेल्यामुळे ते आपलंसं वाटायला लागलं.

**यशवंत देशमुख**
deshmukh.yashwant@gmail.com
9869212439

## मनोपनिषद

मानसिक आजार हा आपल्याकडे आलेला आगंतुक पाहुणा. त्याचा योग्य आदर-सत्कार करून आपल्याला त्याची बोळवण करायची आहे.
ह्या सकारात्मक विचारांच्या 'मनोपनिषद'चे दीप यदा दिवाळीत घरोघरी लावायचे आहेत.
यासाठी लेखन सहकार्य लाभले आहे,
सुजला बाटवे, डॉ. वासुदेव परळीकर, डॉ. हिमानी कुलकर्णी, श्यामला वनारसे, डॉ. अनिल वर्तक, अंजली जोशी, चंद्रशेखर देशपांडे, गुरुदत्त कुंदापूरकर, शिरीषा साठे, हरिश सदानी, मधू नेने, प्रदीप गोखले, राजीव साने, प्राची बर्वे, कादंबरी कुलकर्णी, सुषमा दातार, नीलम ओसवाल इ.

८१४, शुक्रवार पेठ, गाडीखाना दवाखान्याजवळ, पुणे २.
भ्रमणध्वनी : ९८९०५०८०९१
ई मेल - vishrantimagazine24@yahoo.com

# विश्रांती

साहित्यिक आणि वैचारिक संस्कृती जपणारं वार्षिक

दिवाळी विशेषांक २०१५




संपादक : नीलिमा शिकारखाने
अतिथी संपादक : नीलिमा बापट

*With Best Compliments From*



**SWAMI & FAMILY**

Ruikar Colony,
Kolhapur

'सबका मालिक एक' चा नारा देत सर्व दूर पसरलेल्या
**या अवलिया संतावरचा प्रासादिक ग्रंथ**

विश्वस्वधर्माची ध्वजा उंचावणारा

# सर्वात्मका सर्वेश्वरा श्रीसाई



साई कृपांकित
(कै.) विजय हरि वाडेकर
यांच्या आध्यात्मिक बैठकीतून आणि
विविध धर्म-पंथ-संप्रदायाच्या ३० मान्यवर अभ्यासकांच्या लेखणीतून साकारलेली, साईमय काव्यांनी बहरलेली
वैविध्यपूर्ण 'आध्यात्मिक ठेव'
सुख दु:खाच्या लौकिक सीमा
उल्लंघून संपन्नतेच्या अलौकिक प्रदेशात नेणारा
हा प्रासादिक ग्रंथ संग्रही हवाच
कि.-रु.४५०/- **फक्त**
प्रकाशक : श्री. ज्ञानेश विजय वाडेकर
ग्रंथासाठी संपर्क-९९२२४४२७२७

# बैदा

## वसीम मणेर



वसीम मणेर हे प्रशिक्षित सिनेछायाचित्रकार, लेखक, दिग्दर्शक आहेत. ते बिरोबा फिल्म्स प्रा. लि. हे चित्रपटनिर्मिती गृह चालवतात. वन्यजीव, शेती, शिक्षण, प्रशिक्षण अशा सर्व प्रकारच्या तांत्रिक फिल्म्सची निर्मिती करतात. त्यांनी २०१३ मध्ये 'होऊ दे जरासा उशीर' हा चित्रपट दिग्दर्शित केला. स्त्री पुरुष समानता आणि पुरुषांच्या सोबत समानतेचं काम करण्यात त्यांचा सहभाग आहे. प्रगत शिक्षण संस्था फलटण येथे ते कोऑर्डिनेटिंग ऑफिसर म्हणून काम करतात. तसेच 'पालकनीती' च्या संपादक मंडळाचे ते सदस्य आहेत.

इलियास मुसाभाईंचा तर रहीमतुल्ला बिल्किसचा. रहीमतुल्ला आणि इलियास आत्तेमामेभाऊ. दोघांचं वय सारखंच. वय साडेचार-पाच वर्षं. मुसाभाईंच्या घरी धार्मिक कामांचं पौरोहित्य करायला एक मौलवी यायचे. ते होते उत्तरप्रदेशचे. त्यांनी या दोन लहान मुलांची नावं ठेवली रहीमतुल्ला आणि इलियास. आता भोकरेवस्तीसारख्या ग्रामीण भागात तुरळक मुसलमान कुटुंबं आणि त्यांची मोजकी घरं. त्यामुळं आसपासच्या हिंदूच काय पण ग्रामीण मुसलमान लोकांनासुद्धा ही नावं उच्चारायला जड जायचं. त्यामुळं सोयीस्कररित्या घरामध्ये रहीमतुल्लाचं



चित्र : रमाकांत धनोकर

रहीम आणि इलियासचं इल्लू झालं. इल्लूचं पुढे टिल्लू झालं आणि त्याला कुणाची हरकतही नव्हती. पुढे जाऊन त्याहूनही सोयीस्कररित्या गल्लीमध्ये रहीमतुल्लाचं रमेश आणि इलियासच विलास झालं. त्यालाही कुणाची हरकत नव्हती. या दोन्ही नावांनिशी ही मुलं वाढू लागली. हिंदूंमध्ये असो वा मुसलमानांत, शेवटी 'मुसाभईचं पोरगं' आणि 'मुसाभईचा भाच्चा' हीच त्या मुलांची ओळख सर्व लोकांना पुरेशी होती.

आता आत्तेमामेभाऊ एकत्र कसे वाढत होते? तर मुसाभाईची बहीण बिल्किस हिला तिचा नवरा नांदवत नव्हता. रहीमतुल्लाच्या जन्माच्या वेळी तो जे इथं तिला सोडून गेला ते परत घ्यायला आलाच नाही. आज पाच वर्षं झाली. पहिल्या दोन वर्षात मुसाभाई आणि नातेवाईकांनी जावयाला खूप विनवण्याचा प्रयत्न केला. 'उने अच्छी नैना' याच्या पलीकडे त्याचं बिल्किसला परत न नेण्याचं स्पष्टीकरण जाईना तेव्हा मुसाभाई रागावले आणि माजी भैन मला काय जड नाय' म्हणत बिल्किसला त्यांनी सासरी पाठवण्याचा विषय सोडून दिला. तेव्हा पासून इलियास आणि रहीमतुल्ला उर्फ टिल्लू आणि रहीम किंवा विलास आणि रमेश मुसाभाईकडेच राहत होते, वाढत होते. मुसाभाईची बायको सईदा फार चांगली आणि सुस्वभावी होती. तिनं बिल्किसचा कधी दुस्वास केला नाही.

रहीम आणि टिल्लू आज आंघोळ नाश्ता करून खेळायला तयार होते. उन्हाळ्याचे दिवस होते. लगीनसराईचा सीझन असल्यामुळं मुसाभाई, सईदा आणि बिल्किस तिघंही त्यांच्या बांगड्यांच्या दुकानात गिऱ्हाईक सांभाळत होते. दोन गुंठे जागेत त्यांचं तीन खोल्यांचं घर होतं आणि

बाहेर रस्त्यालगत पत्र्याच्या शेडचं बांगड्याचं दुकान होतं. घरामागं जी जागा होती जिथं बिल्किसनं काही कोंबड्या पाळल्या होत्या. मुसाभाईनं स्वतः खपून त्या कोंबड्यासाठी एक खुराडं बांधलं होतं आणि बुरुडाकडून एक डालगं आणलं होतं.

रहीम आणि टिल्लूची कोंबड्यांच्या या खुराड्याजवळ पुष्कळ करमणूक होत असे. आजही आंघोळ-पांघोळ नाश्ता-बिश्ता असे आयांसाठीचे महत्त्वाचे सोपस्कार त्यांनी अजिबात विरोध न करता पार पाडले होते. कारण त्यांनी कालच ठरवलं होतं की आज काय खेळायचंय ते. आंघोळी नाश्त्यात जर कुरबुरी केल्या तर आया आणखी वेळ घालवणार आणि सकाळचा वेळ गेला तर आख्खा दिवस फुकट जाणार, म्हणून आज सगळं बिनबोभाट पार पडलं होतं. लगीनसराईच्या गडबडीत मोठ्या माणसांमध्ये कुणाच्याही लक्षात हा बदल आला नाही. टिल्लूचे अम्मी-फुफ्फू-अब्बा आणि रहीमचे अम्मी-मुमानी-मामू दुकानावर गेल्याचं बघून दोघंही खुराड्याजवळ आले आणि विचार करू लागले. मार्चमधल्या छान सकाळी, कडक होऊ पाहणाऱ्या उन्हात दोघं गुटगुटीत दिसत होते. टिल्लूच्या तुलनेत रहीम जरा जास्त गुटगुटीत होता. तोंडाला पावडर, स्वच्छ कपडे, डोक्याला तेल-चप्प भांग अशा अवतारात रहीम आणि टिल्लू खुराड्याजवळ खेळायला तयार होते.

''किशे पकडींगे?'' रहीम.

''खर्डी कू?'' टिल्लू.

''नको उने खुडूक है...तांबी पकड्नीकीक्या?''

''तूच पकड!!! उने लई टोचा मरती बाबा!!'' टिल्लू.

''फिर...पतली?'' रहीम.

''अरे उने बैदा देनेकू लई टाइम लगाती. अब्बा आय कतो रट्टे पडींगे.'' टिल्लूचं बरोबर होतं. मुसाभाईनं मागच्याच आठवड्यात ''खुराडेमे कायकू मरनेकू जाते रे?'' म्हणत दोघांच्या पाठीत रट्टे लगावले होते. राखाड्या रंगाची आणि तांबूस बारीक ठिपके असणारी- खर्डी, तांबड्या रंगाची- तांबी, किरकोळ शरीरयष्टीची- पतली आणि नेहमी यशस्वी भरपूर पिल्ले काढणारी जाडजूड पिवळट पांढुरक्या रंगाची-बच्चेवाली अशी आपली नावं पोक्त कोंबड्यांना या पोरांनी दिली होती. गेले तीन आठवडे कोंबडी अंडं नक्की कसं घालते? ते कुठून कोंबडीच्या शरीराबाहेर येतं? की ते कोंबडी शरीराबाहेर तयार करते, या विचारांनी त्या दोघांना ग्रासलं होतं. तीन व्यक्तींत विभागलेल्या आणि आई वडील मामा मामी आत्त्या या पाच नात्यांच्या वडिलधाऱ्यांपासून लपवून ते दर वेळी वेगळ्या कोंबडीला खुराड्यात जबरदस्ती डांबून ठेवत आणि निरीक्षण करीत. आत्तापर्यंत तांबी त्यांना टोच्या मारून पळून गेली होती, पतली नुसतीच बसून राहिली होती, तर खर्डी खुडूक आहे असं मोठ्यांकडून ऐकल्यामुळं तिला पकडण्यात त्यांनी वेळ घालवला नव्हता. एवढा खटाटोप करूनही अंडं कसं घातलं जातं हे काही अजून उलगडलं नव्हतं. त्यांचा एक मोठा चुलत भाऊ होता आरिफ. तो गाडीवर ड्रायव्हर होता. टिल्लू आणि रहीमसाठी आरिफभाईनं सांगितलेलं सगळं अंतिम सत्य असे. आरिफभाईला हे दोघे सापडेल तेव्हा प्रश्न विचारीत आणि तोही न कंटाळता यांना उत्तरं देई. पण आरिफभाईला सुद्धा नेमकं या प्रश्नाचं उत्तर देता आलं नव्हतं.

''क्या तलंग पकडनिकी फिर?'' रहीमनं पुन्हा प्रश्न वाढवला.

''अरे आरीपभाई कू मिलती नै तलंग...अप्लेकू कैशी मिलिंगी?'' टिल्लू मुद्द्याचं बोलला.

''उप्परशे मैने सुन्याय आरीपभाई कू बोलताना.. तलंगा बैदा नै देते.'' म्हणत टिल्लूनं आपली चड्डी वर ओढली आणि म्हणाला, ''चल.''

कोणती कोंबडी अंडं घालेल यावर दोघांनी विचार करून ठरवलं की ठेवलेल्या अंड्यांतून हमखास पिल्लं काढणाऱ्या बच्चेवालीला पकडावी. सकाळ चांगली तापली होती. कोंबड्या सकाळची लगबग आटोपून गारवेलीच्या आडोश्याला चोची उघड्या टाकून डोळे मिटून माना हलवत पडल्या होत्या. सगळ्यांचं भरपूर खाऊन झालं होतं. टिल्लू आणि रहीमला येताना बघून तलंगा पटकन पळून गेल्या, पोक्त कोंबड्या निरीच्छेनं उठल्या. बच्चेवालीचा आज उठून पळून जाण्याचा अजिबात इरादा दिसत नव्हता. सीताफळाच्या झाडाला मुसाभाईनं शेणखत घातलं होतं. त्याच्यातले पाच मोठ्ठे गांडूळ तिनं वेचून खाल्ले होते. ती चांगलीच सुस्तावली होती आज. तिची सुस्ती ओळखून चपळ टिल्लू पटकन जाऊन तिच्या पाठीवरच बसला. तिनंही फारसा प्रतिकार न करता शरणागती पत्करली. बाळसेदार रहीम ''वा वा वा'' करत मागून पळत आला आणि टिल्लूच्या मागं उभा राहिला.

''इदर कायकू खडाय... जा तो खुराडेका झक्कन खोल,'' टिल्लू ओरडला.

जबाबदारीची जाणीव झाल्याचा गंभीर चेहरा करून रहीम गरकन वळून पळत खुराड्याकडे गेला. आंब्याच्या पेटीच्या फळ्यांचं मामानं चौकोनी खुराडं केलं होतं. त्याला फळ्यांचंच एक आयताकार झाकण केलं होतं. रहीमनं ते झाकण पूर्ण शक्तीनिशी ओढलं. तशी त्यातून फर्रकन एक तलंग उडाली...

''मा गे!! मऱ्या मै!'' म्हणत रहीम धडपडला. चांगलाच दचकला तो.

टिल्लू तोपर्यंत बच्चेवालीला घेऊन तिथं पोहोचला होता. उघडलेल्या फटीतून त्यानं बच्चेवालीला खुराड्यात कोंबलं आणि दोघांनी पटकन झाकण लावलं.

''क्यात्ता डरतया!'' म्हणत टिल्लूनं खुराड्याजवळ फतकल मांडलं. रहीमनं एक श्वास घेतला आणि तोही टिल्लूजवळ मांडी घालून बसला. जवळजवळ लागलेल्या एरंडाच्या दोन, लिंबाच्या एक आणि शेवग्याच्या एक अशा झाडांनी मिळून एक सलग सावली धरली होती. त्या सावलीच्या पट्ट्यात मुसाभाईनं खुराडा मांडला होता. उन्हाळी सकाळच्या थंडगार मातीत दोघं ऐसपैस मांडी घालून बसले आणि फळ्यांच्या फटीतून खुराड्यात पाहू लागले.

बच्चेवाली आता नीट फुगून बसली होती. चोच उघडी ठेवून ती धापा टाकल्यासारखं करत होती. ते बघून ''इने आज पक्का बैदा देनेवाली!'' रहीम म्हणाला.

''आईसा?.. तुने कब देक्या?''

''मेरेकू लगताय आईसा... हुईंगा करके.''

''पिचले टाईम खर्डी बैटी थी ना... तो उने आईसाच करती थी, पन फिर उने तीन

टॅम गोल फिरी... अन बैदा नै दी...''

''आज दिकिंगे बच्चेवाली कित्ते टॅम फिरती...''

''अबी चूप बैटिंगे,''म्हणत रहीमनं पुन्हा खुराड्याच्या फटीला नाक लावलं... बच्चेवाली आता बसल्या बसल्या हळू हळू फिरू लागली...

''स्सऽऽऽ फिरने लगी... फिरने लगी. अबी बैदा दिंगी!'' टिल्लू चित्कारला.

गोंधळ ऐकून बच्चेवाली फिरायची थांबली आणि खुराड्याबाहेर काय चाललं आहे याचा अंदाज घेऊ लागली... चोच उघडी ठेवून धापा टाकणं तिनं बंद केलं आणि एकदा कॉक असा आवाज केला.

ते ऐकून दोघं एकदम मागे झाले.

''आपन उसकू बिच्का पाडतेय... कैसा दिंगी बैदा फिर उने?'' रहीम.

''चल आपन रंजन रंजन खिलींगे तबतक बैदा हुया कतो उने कुक करने वाली हैच!! फिर अपुन जाइंगे.'' टिल्लू म्हणाला. अंड्यामध्ये खरंतर रहीमला जास्त रस होता. टिल्लूला रांजणात खेळायला आवडे.

मुसाभाईंच्या पडकात त्यांनी एक रांजण गाडला होता. अर्धा जमिनीत आणि अर्धा जमिनीवर होता. जमिनीवरचा भाग डोंगर उतारासारखा मातीनं झाकलेला होता. टिल्लूला त्या मातीच्या उतारावर आडवं पडून, रांजणात डोकं घालून, ओठांचा चंबू करून पाणी शोषून घ्यायला फार आवडतं हे रहीमला ठाऊक होतं. रहीमला हे करायची भीती वाटायची. पाणी खाली गेल्यावर आतल्या अंधाराची तर त्याला आणखीच भीती वाटायची. नेमकी हीच गोष्ट टिल्लूला आकर्षित करे. सकाळ ढळू लागली असताना रांजणात उन्हाचा शिरकाव होई. रांजणाच्या पाण्यात पडलेलं तिरकं उन टिल्लूला आवडायचं. त्या उन्हातून पाण्यात डोकं घालून उलटं वर बघणे असा त्याचा उद्योग असे. रहीम या सगळ्यापासून दूर राही. त्याच्या शरीरयष्टीला हे न मानवणारं होतं आणि त्याला 'बैद्या' मध्ये जास्त रस होता.

''तू खेल, मै बच्चेवाली कू देक्ताव ह्या दुरशे,'' म्हणत रहीम खुराड्यापासून थोडा दूर सावलीत मांडी घालून बसला आणि टिल्लूनं पळत जाऊन रांजणात डोकं घातलं. ''आ डर डर डर, आ डर डर डर आ डर डर डर... ई देक मै बिंडकुली हुया!!! आऽऽऽ डर डर डर...'' इलियासचा बेडूक राग सुरू झाला.

''बैदे कू टोक काय्शे आता रहिंगारे?'' रहीमनं नजर खुराड्याकडेच ठेवून विचारलं.

''आरीपभाई बोल्या मुर्गी पाच टाईम फिरी तो बैदेकू टोक आता...'' तोंड रांजणात ठेवूनच टिल्लू बोलला. आत तोंड ठेवून बोलल्यामुळे घुमणारा आवाज त्याला फार आवडे. त्यानं पुन्हा आपला बेडूक राग धरला आणि आ डर डर डर करू लागला.

''आन दो पिल्ले एक बैदे मे कैशे आते....?''

''ऊ नै बोल्या आरीपभाईने... आऽऽऽ डर डर डर...''

''कबी कबी मुर्गी की संडास बी चिकटीली असती बैदे कू...''

''खुराडे मे तलंगा संडास करते रे... उ छोटेय ना अजून... आऽऽऽ डर डर डर...''

''तुजे लई रे मालूम... बैट चूप! बैदा दालंदे बच्चेवाली कू चैनशे!'' रहीम टिल्लूच्या तज्ञ उत्तरांना वैतागला.

वीस मिनिटं गेली. टिल्लूचंही आऽऽऽ डर डर डर बंद झालं. दोघं थकून बच्चेवाली अंडं घातल्यानंतर कधी कॉक करते ही वाट बघत बसले. उन्हात उष्मा जरी वाढू लागला होता तरी सावल्या अजूनही गारच होत्या. हलकी जरी झुळूक आली तरी अंगाला सुखद गार वाटत होतं. गावचे सरपंच भोकरे तात्या आणि त्यांचा जावई झांझुर्णे वकील त्यांच्या वाड्याच्या मागच्या बाजूनं निघून मुसाभाईच्या पडकाजवळ आले.

''रमेशऽऽ जेवलास कारं बाळा?'' भोकरे तात्यांनी चालता चालता विचारलं.

''काय तात्या तुमीपन!'' म्हणत जावई झांझुर्णे जोरात हसला. ''बरं त्यालाच इचारलं जेवलास का म्हणून? जरा बगा त्याच्याकडं... जेवल्याबिगर त्यो ऱ्हायील का? ऑ?''

तात्या ही हसले.

''बर्का जावयबाप्पू.. .ह्योच त्यो मुसाभाईचा भाच्चा ज्याची ष्टोरी मी तुमाला सांगितली...रमेश!''

''बर बर...पन रमेश?'' जावई गोंधळात पडला.

हा हा हा करत तात्या हसले. ''नावाची तर त्याच्यावनं म्होट्टी ष्टोरीय! सांगतो चला...'' म्हणत ते मुसाभाईच्या दुकानाच्या दिशेने चालू लागले.

भोकरे तात्या आणि जावई झांझुर्णे वकील दुकानात आले तेव्हा मुसाभाई झटकणीनं फुटल्या बांगड्यांचा चुरा झटकून गिऱ्हाइकांना बसायची जागा साफ करत होते. एक गिऱ्हाईक नुकतच गेलं होतं. सईदानं हातातले पैसे पत्र्याच्या छोट्या डब्यात टाकून तो डबा बांगड्यांच्या थडीमागं ठेवला आणि त्यावर बसल्या सतरंजीचा कोपरा टाकला.

''राम राम भै!''

''राम राम!! आरं वा जावयबाप्पू कवा आलं? या या या बसा...''

जावई झांझुर्णेला आश्चर्य वाटलं.

''आपली कुटं गाट पडली हुती बरं?'' जावई झांझुर्णेनं विचारलं.

''तुमी नाय वळकत अमाला जावायबाप्पू! पन अमी वळकतो तुमाला...'' लग्नात होतो अमी तुमच्या!

''भैंकडं तर जेवनाची वेवस्था हुती सगळी... भै असलं की काळजी नसती बगा... कसं वेवस्तीत झाल्तं एकदम... नाय का?''

''हो हो...'' जावई झांझुर्णेनं मान डोलावली.

''तात्यांचाच आशीर्वादय!'' म्हणत मुसाभाई बिल्किसकडे वळले. ''जा चा रख!''

बिल्किस उठू लागली.

''तुमे बैटो बिल्किसआप्पा मै जातीव, रोट्या बी दालने के है,'' म्हणत सईदा उठली आणि आत गेली.

''बरं भै दोन मिंट काम बाजूला ठेवा. पोरी तू पन जा आत,'' तात्या म्हणाले तशी बिल्किसही उठून घरात गेली.

''जावयबाप्पू वकील हायेत तुमाला तर म्हयतय, त्यांला मी आज बिल्किसची ष्टोरी सांगितली... म्हनलं बगा तुमच्या ह्यानी.''

मुसाभाईंना कळेना काय बोलावं.

''तात्या पन फी नाय की वो परवडायची.''

''फीचं कोन बोल्लंय का हितं?'' तात्या रागावले. ''भै रमेश चार वर्षाचा झालाय... माज्या फुडं रांगत रांगत उभं ऱ्हायलंय ते पोरगं... उद्या पोरगं इचारल बाप कुटाय माजा... काय सांगनार तुमी?... जावयबाप्पू हुशार हायेत... त्यांचा वट हाये... काढतील तोडगा कायतरी.''

मुसाभाईंच्या मनात कालवाकालव झाली. ''तुमी कशाला वाट वाकडी केली तात्या... मला बोलवायचं, मी आलो अस्तो वाड्याव. ''

''तुमी चार म्हैनं झालं येताय...'' तात्या.

मुसाभाई मान खाली घालून बसले. त्यांना काय बोलावं कळेना.

कूकूक-कूक कूक-कूक कूी असा आवाज खुराड्यातून येताच मांडी घालून बसलेले टिल्लू आणि रहीम टाणकन उठून उभे राहिले. दोघांनी जोर लावून झाकण बाजूला केलं तशी बच्चेवाली सावकाश खुराड्याच्या काठावर उडी मारून चढली... तीनदा पंख फडफडवले. मग शांतपणे एक उडी मारून बाहेर जमिनीवर आली आणि चालत चालत निघून गेली. तीनदा पंख फडफडवले म्हणजे अंडं घातलं की नाही असा प्रश्न टिल्लू आणि रहीमला पडला. त्यांनी एकमेकांकडे बघितलं आणि आत डोकावलं... तांबूस पांढुरक्या रंगाची दोन अंडी एका कोपऱ्यात होती!

दोन अंडी बघून दोघांच्या चेहऱ्यावर आनंद मावेना.

''एक झटके मे दो बैदे?'' रहीमला कळेना असं कसं झालं.

''बच्चेवाली ढूली है करके!'' टिल्लूनं तर्क लावला.

''कैशे दाली रहिंगी? एक के पिच्चे एक?'' रहीम.

''हो अचींगा!'' टिल्लू दोन्ही अंडी शेजारी शेजारी हातात घेऊन अगदी जवळून न्याहळू लागला.

''फिर दो टॅम कूऽकूक-कूक कूक-कूक, कूऽ क्यु नै करी उने? एक बैदे कू एक टॅम.'' रहीमनं एक अंडं हातात घेतलं आणि सहज विचारलं. टिल्लूनं गरकन मान वळवली.

''फिर क्या सातमे दोनो दाली?'' टिल्लूचं आश्चर्य टोकाला पोहोचलं. तो उड्याच मारू लागला.

''क्या पयले अंदर बैटीली थी उ तलंग ने दाली?'' रहीमनं टिल्लूच्या आनंदात पाणी ओतलं तसा टिल्लू उड्या मारायचा थांबला.

''आरे आरीपभाईने क्या बोल्या, तलंग नै देती बैदा!..फिर कैसा? बच्चेवालीनेच दो दाली एक टॅम.''

त्यानंतर बराच वेळ टिल्लू आणि रहीम ती दोन अंडी हातात घेऊन वरपासून खालपर्यंत न्याहाळत होती आणि बच्चेवालीनं एकावेळी दोन अंडी कशी घातली असतील याचा विचार करत होती.

''सैदा...'' मुसाभाईनी दुकानातून हाक मारली तसा रहीम टिल्लूसमोर दोन्ही अंडी धरून नाचवू लागला, त्याच्या डोळ्यात एक चमक आली. इलियासला कळेना...

मुसाभाईची पुन्हा हाक आली,

''सैदा...''

तशी रहीम पुन्हा अंडी नाचवू लागला आणि त्याच्या डोळ्यातली चमक बघून टिल्लू म्हणाला,

''बैदा???''

आणि दोघे खो खो खो करत हसत घराकडे पळत सुटले.

स्वयंपाकघरात जेवायला बसले तरी दोघे खी खी खुखू करत होते.

''सैदा... कायकू हसतेयगे बच्चे?'' मुसाभाईनी प्लेट स्वतःसमोर ओढत म्हटलं.

''किशे मालूम? आयकन्शे खीखी खुखू करतेय...जान्देव, तुमना तलू क्या मै बैदा?''

खीखी खुखू करणारे रहीम आणि टिल्लू लाह्या फुटल्यासारखे हसू लागले... तोंडात घास असल्यामुळे दोघांना ठसका लागला...

''तुमरीतो मै....बैटते क्या गच्चीप अबी?'' सईदानं गरम उलातनं उगारलं.

''सैदा ये सैदा... आगे जांदे बच्चेय... तू दाल मजे खाने... अप्लेकू गिराईक करनेकाय... बिल्किस यकलीच हय दुकानमे चल.''

मामा जेवायला लागल्याचं बघून रहीम हळूच टिल्लूच्या कानात कुजबुजला,

''सैदा ये सैदा...''

''खी खी खी सैदा अन बैदा...'' करत टिल्लूही पुन्हा खुखुखू करू लागला.

सईदानं हताश मान हलवली आणि बच्चेवालीचं अंडं उचललं. गरम तव्याच्या कडेवर टचकन फोडून तव्यातल्या तेलात सोडलं.

चर्रर वाजलं आणि बघता बघता फुगून आम्लेट तयार झालं. सईदानं उलतान्यानं ते पालटवून दोन्हीकडून तळून मुसाभाईच्या ताटात टाकलं. मुसाभाई मिटक्या मारत खाऊ लागले. खाता खाता त्यांना भोकरे तात्याचं बोलणं आठवलं आणि त्यांचा चेहरा चिंतातूर झाला. ते म्हणाले,

''आगे सैदा...''

पोरं पुन्हा पोट धरून हसू लागली...

हसत्या पोरांकडं बघून मुसाभाईंना तापल्या उन्हात गार हवेची झुळूक आल्यासारखं वाटलं. 'काय जड नाय भैन आपल्याला... खुशीतंय रहीम. कुटं वकील करून ह्या हसऱ्या लेकराला फुफाट्यात घालू?' जिथं हा विचार करण्यात मुसाभाई गढले होते, तिथं रहीम आणि टिल्लू तोंडातून फुटून बाहेर पडणारं हसू कसंबसं रोखून मुसाभाई कधी पुन्हा 'सैदा' म्हणतायेत याकडे कान देऊन होते. त्यांना फक्त ती खूण हवी होती पुन्हा लाह्यांसारखं फुटून हसण्यासाठी.

**वसीम मणेर**
wasim@biroba.com
8888826275



# माझ्या जन्माचं चित्र



संजीवनी कुलकर्णी

संजीवनी कुलकर्णी शिक्षण व पालकत्त्वाच्या क्षेत्रात २५ वर्षांहून अधिक काळ कार्यरत आहेत. त्या 'पालकनीती परिवारा'च्या संस्थापिका, विश्वस्त व संपादक आहेत. भारतात पालकत्त्वासारखा विषय मुख्य सामाजिक प्रवाहात आणण्यात पालकनीतीची महत्त्वाची भूमिका आहे. १९९४ मध्ये एच. आय. व्ही., एड्स आणि लैंगिकता या विषयांवर काम करण्यासाठी त्यांनी प्रयास या संस्थेची स्थापना केली. त्यांच्या एच. आय. व्ही. व पालकत्त्वामधील कामासाठी त्यांना २०११ मध्ये प्रतिष्ठेचा हिरकणी पुरस्कार देण्यात आला. त्यांनी वर्तमानपत्रे, मासिके, टी. व्ही. व रेडिओ या माध्यमांतून पालकत्त्व व एच. आय. व्ही. व एड्सबद्दल मोठ्या प्रमाणात लेखन व सादरीकरण केले आहे.

शाळेत चित्रकलेच्या तासाला स्मरणचित्र काढायला देतात. मुलांमुलींच्या आठवणीतली दृश्यं त्यांनी चित्रभाषेतून मांडावीत, त्यांची दृश्यमाध्यमाशी जवळीक वाढावी, स्मृतीचित्रांना कागदावर व्यक्त करता येतं, चित्रकर्ता आणि आस्वादकाचा निशब्द तरीही सविस्तर संवाद होऊ शकतो हे विद्यार्थ्यांना थेटपणे उमजावं, अशी त्यामागची अपेक्षा असते.

रंगपंचमीचा रंगीत हल्लागुल्ला, होळी, पतंग उडवणारा मुलगा (मुलगी नाही!!) नागपंचमीला नाग-गारुडी-बायका व मुली, क्वचित रस्त्यावर कोसळणारा पाऊस असे विषय या स्मरणचित्रांसाठी शिक्षक निवडतात.

मुलामुलींच्या मनातल्या आठवणी कधीकधी यापेक्षा वेगळ्याही असतात.

लहानपणी मैत्रिणी एकमेकींच्या घरांपर्यंत पोचवायला जातात, आणि एकदा ही तिला- मग ती हिला मग पुन्हा... अशा दोनतीन फेऱ्या झाल्यावर घरात आल्यावर दिसणारा वडलांचा कृद्ध चेहरा!

महाकष्टानं मिळवलेलं आईस्क्रूट खाताखाता खाली मातीत पडतं आणि तसंच तोंडात टाकायला उचलावं तर विरघळून सांडतं तेव्हा आपण कसे दिसत असतो?

शिक्षक शिकवत असताना खिश्यातून हळूच भोवरा काढून दाखवणारा मित्र! सच्याने सिक्सर हाणल्यावर टीव्हीला डोळे लावून बसलेल्यांचा ये ऽऽऽ!

असं काही खरंखुरं स्मरणचित्र का काढायला देत नाहीत?

चित्र काढणं ही स्वत:ला व्यक्त करण्यासाठीची विलक्षण भाषा आहे. लहान मुलं ती अगदी सहज आणि जिवंतपणानं वापरतात. सर्वच लहान मुलं सुंदर चित्रं काढू शकतात. त्या चित्रांमधून त्यांची कल्पनाशक्ती, जगाबद्दलची समजही व्यक्त होते... हे सगळं मी मोठी झाल्यावर पुस्तकातूनच वाचलं. एकदा मात्र- म्हणजे मोठेपणीच- मुलांमुलींनी काढलेली काही वेगळीच स्मरणचित्रं मला बघायला मिळाली. ही चित्रं सुंदर होती, मुख्य म्हणजे बोलकी होती. मात्र चित्रकलेच्या तासाला ती काढलेली नसली तरी या चित्रांनाही शिक्षकांनी विषय दिलेला होता... आणि तो विषयच फार रोचक होता.

माझ्या जन्माचं चित्र !

वाढवयातल्या प्रश्नशंकांना समोर ठेऊन आखलेल्या एका कार्यशाळेत किशोरकिशोरींना हे चित्र काढायला सांगितलं होतं. आईच्या पोटात होणारी गर्भाची वाढ आणि मुलींच्या व मुलग्यांच्या वाढविकासाचे टप्पे अशा शाळेच्या पुस्तकात असणाऱ्या आणि तरीही प्रत्यक्ष शिकवल्या न जाणाऱ्या विषयाची सुरुवात ह्या शिक्षकांनी जन्माच्या चित्रापासूनच केली होती. तिथपासून शिबीरसोबत्यांना सोबतीला घेऊन ते मागे-मागे-मागे जाणार होते. एरवी ह्या चर्चेत दिसणाऱ्या वाह्यात फिदीफिदी हसण्याला इथे जागाच नव्हती. मुलं इतकी रमलेली होती की दुर्लक्षाचीही

**जन्माच्या चित्राची जन्मकहाणी**

१९९९ साली बासवाडा (राजस्थान) येथे एका शिबिरात मानवी शरीर रेखाटायला सांगितले होते. तर तिथल्या लीलावती नावाच्या एका गर्भवती स्त्रीने तिच्या चित्रात ओटीपोटात, पिशवीत एक हसणारे बाळ दाखवले होते! माझी दिवटी एकदम पेटली! मी त्याचेच लगेच एक्स्टेन्शन केले. आणि सर्वांना सांगितले की आपल्या जन्माचे चित्र काढा! आपला जन्म झाला त्याचे चित्र. कुठे झाला, कोण होते आसपास.. वगैरे. मला तो एक भेदी साक्षात्कारच वाटला. काय अफलातून चित्रे काढली त्या सर्वांनी! हे तेव्हा नुसती गंमत म्हणून केले होते.

मग नंतर काही महिन्यांनी लक्षात आले की मानवी प्रजनन या विषयाची सुरुवात आपण इथून करायची! एक प्रकारचा फ्लॅशबॅक!! म्हणजे सुरुवात बाळ जन्मापासून करायची. मग मागे जायचे. आईच्या पोटात नऊ महिने मग त्याच्याही मागे जायचे. आईच्या ओटीपोटात निसर्गाने केलेली तयारी (मासिक पाळी), मग वडील (त्यांच्या शरीरात काय काय झाले), मग स्त्री बीज आणि शुक्राणू कसे एकत्र आले वगैरे असा एक क्रम तयार झाला. तो माझ्या सहकाऱ्यांनासुद्धा एकदम पटला.

या क्रमामुळे 'आभा' च्या कोणत्याही शिबिरात मुला-मुलींच्या माना कधीही खाली गेल्या नाहीत.

**डॉ. मोहन देस**



खरंखुरं वाटणारं एक चित्र या मुलामुलींच्या मनात उमटलं असेल. असा विचार शिक्षकांच्या मनात असणार. चित्र काढताना कायकाय विचार केला असेल या मुलांमुलींनी?

आई थकलेली असेल, पण आपल्या जन्मानं आनंदलेली असेल. तिच्या डोळ्यात पाणी असेल, की ओठांवर हसू की दोन्ही? आणि आपण कसे दिसत असू? गोड गोजिरे गुलाबी, मुठी चोखणारे, टॅन्हा-टॅन्हा रडणारे?

आपल्या जन्माच्या वेळेस, आजूबाजूला काय असेल?

झोपडीबाहेर आकाशात ढग, त्यातून सर्वत्र येणारा पाऊस आणि त्या पावसाच्याच प्रमाणात घरात सर्वत्र मेणबत्त्या आणि आत खाटेवर बाळंत होत असलेली शक्यता नव्हती. आरोग्यभान (आभा) नावाचा एक गट नावाप्रमाणे आरोग्याचं भान वाढवण्याचा प्रयत्न करतो, त्यांनी आयोजलेलं हे शिबीर होतं.

प्रत्येक चित्रामधून मुलांच्या मनातल्या जन्म-कल्पनांचं अद्भूत रूप व्यक्त होत होतं. प्रत्येक चित्र वेगळं होतं तरी अतिशय नम्र आणि सभ्यतेनं चितारलेलं होतं. म्हणजे उदाहरणार्थ सर्वच्या सर्व आया आनंदी होत्या. त्यांच्या अंगभर साडी किंवा पांघरूण होतं. एका चित्रात मागे काहीसा अपराधी बाबा उभा होता. बऱ्याच ठिकाणी डॉक्टर होते. ते डॉक्टर आहेत हे पाहाणाऱ्याला कळावं म्हणून त्यांनी एप्रन घातला होता, किंवा निदान त्यांच्या गळ्याभोवती स्टेथोस्कोप होता. पाळण्यात ठेवलेल्या पांघरूण घातलेल्या बाळाचं चित्र अनेक चित्रात दिसत होतं. हे काही रुढार्थानं स्मरणचित्र नव्हतं. आपला जन्म कुणाला कधीच आठवत नाही. त्याबद्दलच्या आपल्या कल्पना काय असतील, असा विचारही सहसा आपल्या मनात येत नाही. पण कदाचित वडीलधाऱ्या कुणी काही आठवण सांगितली असेल, कदाचित नकळत काही कानावर पडलं असेल, न पाहिलेलं पण जणू स्वप्नात पाहिल्यासारखं

**'आभा' च्या शिबिरामध्ये मुलामुलींनी काढलेल्या काही चित्रांबद्दल:**

एका मुलीने चित्रात आपले वडील डोक्याला हात लावून बसलेले दाखवले होते. साहजिकच होते ते! ती तिसरी मुलगी होती. चित्रात उरलेल्या दोन मुलीही आईजवळच उभ्या होत्या. विमनस्क. चिंताक्रांत.

काही चित्रांमध्ये (माझ्या जन्मा'मुळे?) अंगणातल्या झाडाला खूप फुले आलेली असतात. फळेही लगडलेली असतात! तर कधी कधी पाऊससुद्धा असतो. नदीला पूर आलेला असतो! तर कधी दिवाळीच्या फुलबाज्या, भुइनळे असेही दाखवले जाते.

एकदा तर बैल पोळ्याचेच चित्र होते सारे! बाजूला, कागदाच्या कोपऱ्यात एका घरात माझा जन्म' होत होता! बारीकसा!

दवाखान्यात जन्म होताना तिथले कॅलेंडर आणि भिंतीवरचे मोठे घड्याळ तारीख आणि वेळ दाखवणारे अनेक चित्रांमध्ये असतेच असते.

एकदा दोन मुली माझ्याकडे आल्या आणि म्हणाल्या, काका, आम्हाला दोघींना एकच कागद द्या. आम्ही जुळ्या आहोत! आणि त्यांनी तसे चित्र काढले.

आणखी एक कन्याजन्माचे चित्र होते. मुलगी अजून अर्धी आईच्या पोटात आहे. पण फ्रॉक घातलेला. मस्त फुलाफुलांचा.

एका मुलाने आपला जन्म झाडाच्या विवरातून होताना दाखवला होता. बाळाचे लिंग पानांनी मस्त झाकलेले. एखाद्या ग्रीक पुतळ्याचे कसे झाकलेले असते तसे!

नवजात बाळ एका दगडाजवळ ठेवले आहे. थोडे कुठे खुरटे गवत आहे आसपास. वर काळेभोर आकाश आणि चंद्र आणि चांदण्या! बापूस पाठमोरा. मुंडासे घातलेला. बिडीचा धूर काढत. शेजारी ट्रांझिस्टर. माय उकिडवी बसलेली. डोळ्यातून पाणी थेट जमिनीपर्यंत. हातात एक दगड नाळ तोडण्यासाठी. मागे पाले पडलेली. असेही चित्र!

आपापला जन्म म्हणजे आपापले एक काव्यचित्रच असते.

**डॉ. मोहन देस**



आई आणि तिच्या पायांजवळ काहीसं तिरपं ठेवलेलं बाळ असं ते एक संपूर्ण चित्र होतं.

हॉस्पिटलातल्या मोठ्ठ्या दिव्यांच्या खोलीत झोपलेली आई आणि शेजारच्या पाळण्यात बाळ आणि हसरे डॉक्टर अशी अनेक स्वतंत्र चित्रं होती.

एक चित्र तर भलतंच भारी होतं. त्यात मोठं भावंड होतं. ही गोष्ट चित्रकारानं ऐकलेली असणार पण जन्मचित्रासोबतीनं ती आली होती. ते भावंड म्हणत होतं, ''आई तू बाळाला पोटातून बाहेर का काढलंस? माझं बाळाशी खेळून झाल्यावर पुन्हा पोटात ठेवणार?''

**डॉ. संजीवनी कुलकर्णी**
sanjeevani@prayaspune.org
9822001477



शिक्षणाचा ध्यास घेऊन गेली ३० वर्षे
शास्त्रशुद्ध शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या
ग्राममंगल या संस्थेचे वैशिष्ट्यपूर्ण मासिक

ग्राममंगल
**शिक्षणवेध**

**दिवाळी २०१५**

संपादक : प्रा. रमेश पानसे
मूल्य : रु. ८० मात्र

**वैद्यकीय शिक्षण : संधी आणि आव्हाने**

**अतिथी संपादक : डॉ. रवी बापट**

**वैद्यकीय क्षेत्राला पूरक ठरणाऱ्या शैक्षणिक व व्यावसायिक संधी आणि वैद्यक शास्त्राचे शिक्षणक्षेत्रात होणारे उपयोजन या दोन्ही दृष्टिकोनातून विचार मांडणार आहेत. डॉ. अविनाश भोंडवे, डॉ. संजय ओक, डॉ. अविनाश सुपे, डॉ. विकास आबनावे, डॉ. प्रमोद लेले, डॉ. प्राची साठे आणि इतर मान्यवर... अवश्य वाचा !**

**वार्षिक वर्गणी**
**रु. ४००/-**
**त्रैवार्षिक वर्गणी**
**रु. १०००/-**

ग्राममंगलला देणगी देऊन सामाजिक परिवर्तनात सामील होऊ या!
आपण दिलेल्या सर्व देणग्यांमधून ८० जी कलमान्वये सूट मिळेल.



# नकाश्ा

## समीरा कुरेशी

समीरा कुरेशी गेली १० वर्षे बालवाडी मुख्य-शिक्षिका म्हणून कमला निंबकर बालभवनमध्ये कार्यरत आहेत. बालशिक्षणाचा त्यांचा सखोल अभ्यास आहे. त्यांनी बालशिक्षणावरची काही प्रशिक्षणेही घेतली आहेत. लहान मुलांसाठी लिहिलेली त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत.




रेणूच्या शाळेला सुट्टी लागली. ती घरीच होती. पप्पांबरोबर ती रोज संध्याकाळी घरासमोरील बागेत फिरावयास जाई.




एक दिवस तिला ताईंनी वर्गात शिकवलेली गंमत आठवली. तिने ती संध्याकाळी करायची ठरवली.




रेणू नेहमीसारखी पप्पांबरोबर बागेत फिरायला गेली. पण आज तिच्यापाशी एक कॅरिबॅग होती.




गेटमधून आत गेल्यावर तिने पप्पांना विचारले, ''पप्पा आपण सरळ जात आहोत. आता कुठे वळायचे?'' पप्पा म्हणाले, ''आता आपण डावीकडे वळणार आहोत. पण का गं? तू असे का विचारतेस?'' रेणू म्हणाली, ''ती माझी गंमत आहे.''




रेणूने स्वतःजवळील पिशवीत रस्त्यावर पडलेले अशोकाचे पान घेऊन ठेवले. थोडे पुढे गेल्यावर शिरिषाची शेंग पडली होती, ती घेतली.




मग पप्पा व ती डावीकडे वळले. तेथे सुरेख गुलाबाची फुले होती. त्याच्या एक-दोन पाकळ्या रेणूने घेतल्या.



पुढे झेंडूची फुले होती. त्यातले एक फूलही रेणूने घेतले.



थोडे अंतर चालल्यावर ते दोघे पुन्हा डावीकडे वळले.
तेथे रेणूला फुलपाखराचा एक पंख सापडला.



पुढे परत डावीकडे वळताना तिने गवताचे एक पाते घेतले.






घरी गेल्यावर रेणूने सुई-दोरा, फेव्हिकॉल घेतले व
घराच्या एका कोपऱ्यात जाऊन बसली.



गोळा केलेल्या सर्व गमती-जमती एका दोऱ्यात ओवू लागली.
मध्येच थांबून विचार करू लागली.



तिच्या आईला कुतूहल वाटू लागले. तिने जवळ येऊन रेणूला विचारले,
''तू हे काय करतेस गं?''



# टिंबाकडून अक्षराकडे




मंजिरी निंबकर

नीलिमा गोखले




मूळच्या एम् .बी. बी. एस. असलेल्या मंजिरी निंबकर १९९९ पासून पूर्ण वेळ शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. शिक्षणातील गुणवत्तेसाठी काम करणाऱ्या प्रगत शिक्षण संस्थेच्या त्या संचालिका आहेत. २००८ मध्ये त्यांनी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मधून एम. ए. इन एलेमेंटरी एज्युकेशन सुवर्णपदकासहित पूर्ण केले. त्यांनी अनेक मराठी तसेच इंग्रजी मासिके व वर्तमानपत्रांमधून शिक्षणविषयक लेख लिहिले आहेत. २०१० मध्ये त्यांचे 'मुलांचे सृजनात्मक लिखाण' हे पुस्तकही प्रकाशित झाले आहे. 'पालकनीती'च्या संपादक मंडळाच्या त्या सदस्य आहेत. बालशिक्षणात त्यांचा विशेष रस व अभ्यास आहे.

नीलिमा गोखले यांनी बालवाडी शिक्षिका म्हणून मुंबई, हाँगकाँग व सिंगापूरमध्ये २० वर्षांहून अधिक काळ काम केले आहे. सिंगापूरमध्ये काम करताना त्यांनी युनिव्हर्सिटी ऑफ साऊथ ऑस्ट्रेलिया मधून बी. एड. व पी. एच. डी. पूर्ण केली व सिंगापूरच्याच एका शिक्षक प्रशिक्षण संस्थेत काम सुरू केले. २००८ मध्ये भारतात परतल्यापासून त्या प्रगत शिक्षण संस्थेच्या बालवाडी शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे काम करत आहेत. मुलांच्या पुढच्या आयुष्यातील यशासाठी गुणवत्तापूर्ण बालशिक्षण आत्यंतिक महत्त्वाचे आहे असे त्या मानतात.

श्रवण, भाषण, वाचन, लेखन व विचार ही भाषेची ५ अंगे आहेत. मूल ही अंगे क्रमाने शिकते असा साधारणतः आपला समज असतो. आता मुलांच्या शिकण्याबद्दल झालेले नवीन संशोधन लक्षात घेऊन आपण पुन्हा एकदा हा समज तपासून पाहूया. हे संशोधन सांगते की मूल जन्मतःच शिकण्यास सक्षम असते. ते परिसरातील घटना समजून घेते आणि प्रतिसाद देते. त्यामुळे आकलन होणे आणि व्यक्त होणे हे दोन्ही एकाच वेळी घडत असते. पुढे दिलेल्या अनेक उदाहरणांमधून हे स्पष्ट होईल.

लिहिणे ही क्रिया अभिव्यक्तीची असल्यामुळे नैसर्गिक आहे. आपल्या गरजा आई-बाबांकडे व्यक्त करण्यासाठी नुकते जन्मलेले मूलही रडते. तसेच खडू हातात धरण्याइतका कारक विकास झाल्यावर व्यक्त होण्याचे काम मूल चित्रातून किंवा स्वलिपीतून करीत असते. मुलांचे हे व्यक्त होणे समजून घेण्यासाठी आपल्याला त्यांच्याशी संवाद साधावा लागतो. त्यांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकून घ्यावे लागते. आपल्याला नीट समजेपर्यंत प्रश्न विचारायला लागतात. कधी कधी त्यांचेच उत्तर त्यांनाच पुन्हा ऐकवून 'हे असेच ना?' म्हणून खात्री करून घ्यावी लागते. पेन, पेन्सिल किंवा खडूच्या साहाय्याने कागदावर पहिली खूण केल्यापासून विचारपूर्वक आपले म्हणणे मांडण्यापर्यंत मुलांचा जो प्रवास होतो तो समजून घेण्याचा येथे आपण थोडा प्रयत्न करणार आहोत.

दोन-सव्वादोन वर्षांची मुले प्रथम खडूच्या साहाय्याने कागदावर काहीतरी खूण करू लागतात. कधी ते एखादे टिंब असते तर कधी एखादी रेष. हळूहळू जसजसे त्यांचे आपल्या हाताच्या स्नायूंवर नियंत्रण येऊ लागते, तसतसे आपण काढलेल्या या खुणांवरही नियंत्रण येऊ लागते. कागदावर खूण कशी करायची यावर आपले नियंत्रण आहे हे जेव्हा मुलांच्या लक्षात येते तेव्हा ती खूष होतात. तेथून त्यांच्या लेखनाची सुरुवात होते. वाचनापासून ती अजून कोसो दूर असतात. मात्र आपल्याला व्यक्त होण्यासाठी आपण हे करू शकतो हे त्यांना समजू लागते.

हातात खडू धरून ती तो कागदावर उठवतात. त्याकडे बघतात. मग पुन्हा खडू कागदावर ठेवून दुसऱ्या प्रकारे उठवतात. हळूहळू आपण काढलेल्या या खुणांमध्ये मुलांना काहीतरी दिसू लागते. मग त्यांना वाटते 'मला पुन्हा तसेच काढायचे आहे. पण कसे?' आणि या 'कसे' च्या शोधात मुले जाणीवपूर्वक कागदावर चिन्हे उमटवू लागतात. नवनिर्मितीचा आनंद यात सर्वात प्रबळ असतो. त्यामुळे मुले फारसा विचार वगैरे न करता कागदावर चिन्हे उमटवत राहतात. कित्येकदा आपल्याकडे येऊन विचारतात, मी काय लिहिलंय?

वयाच्या तिसऱ्या वर्षापासून मात्र काहीतरी हेतू मनात ठेवून लिहिण्याचे प्रमाण वाढू लागते. एखादी रेष विशिष्ट प्रकारे दिसावी म्हणून मूल प्रयत्न करते. त्यासाठी ते जाणीवपूर्वक आपल्या हातांच्या स्नायूंवर नियंत्रण ठेवू लागते. याच सुमारास चित्र आणि लेखन यात मुले निश्चित फरक करू लागतात.

साडेतीन वर्षांच्या वृंदाने कागदावर फूल, सूर्य आणि इतर काही आकार काढले आहेत. चित्राच्या वर गोष्ट लिहिली आहे. वृंदापेक्षा ३-४ महिन्यांनी लहान असणाऱ्या स्वरानेही एक चित्र काढले आहे. खालील



**सूर्य सकाळी उगवला. त्याला फूल दिसलं.**
**ते फूल तो राजाकडे घेऊन गेला.**
**राजा म्हणाला, फूल तोडायचं नाही.**
**तुला शिक्षा देईन.**
**आपला नियम– फुलं तोडायची नाहीत.**

**वृंदा, ३.५ वर्षे**



**शाळेत येताना मला कौलात घुबड दिसलं.**
**शाळेत येताना बघितलेलं.**

**स्वरा, ३ वर्षे**

बाजूस एक पक्षी दिसतो आहे. चित्राच्या वर उजव्या कोपऱ्यात इंग्रजी ६, २, ३ असे काही आकडे काढले आहेत. तिला काय लिहिले आहे ते वाचायला सांगितले तर ती वाचते, ''शाळेत येताना मला कौलात घुबड दिसलं.'' हे वाक्य तिने चित्रापासून थोडे अलग लिहिले आहे. त्यासाठी वेगळ्या रंगाचा स्केचपेन वापरला आहे. इंग्रजी आकड्यांच्या उजवीकडे एक उभी रेष आहे. कागद आडवा धरला तर ती शिरोरेष आहे हे लक्षात येते.

दोघींच्याही लिखाणात एखादा विशिष्ट आकार पुन्हा पुन्हा आलेला दिसतो (वृंदाच्या लेखनात 'द' सारखे दिसणारे तर स्वराच्या लेखनात २ सारखे दिसणारे चिन्ह.) चित्रांमध्ये मात्र एखाद्या आकाराची तशी पुनरावृत्ती दिसत नाही. या सर्व पुराव्यांवरून मुले चित्र आणि लेखन वेगवेगळे असतात हे जाणतात असेच म्हणावे लागते. एवढेच नव्हे तर लेखनात काही विशिष्ट चिन्हेच असतात, ती पुन्हा पुन्हा येतात व त्यांची मांडणी विशिष्ट प्रकारे असते असेही मुलांच्या लक्षात आले आहे असे दिसते. शाळेच्या लेखन समृद्ध परिसरामुळे आणि मोठ्या माणसांना लिहिताना–वाचताना पाहून मुलांची ही जाणीव विकसित झालेली असते.

एकदा लेखन आणि चित्र हे वेगळे वेगळे आहे ही जाणीव निर्माण झाली की लेखन म्हणजे काय असते याविषयी मुलांच्या मनात धारणा निर्माण होऊ लागतात. चिन्हांची काही विशिष्ट मांडणी केली तर ते लेखन होते ही कल्पना त्यांना प्रथम समजते असे वाटते व त्यांच्या कामातील काही चिन्हांच्या अशा मांडणीमुळे मुलांचे 'लेखन' त्यांच्या चित्रांपेक्षा वेगळे दिसते. सव्वातीन वर्षांच्या तन्मयने आपण गावाला गेलेले असताना पडलेला पाऊस व चमकणाऱ्या विजांबद्दल लिहिले आहे. लेखन म्हणून कागदाच्या डावीकडे व वर काही गोल गोल आकार दिसतात. तपशिलाच्या बाबतीत बोलायचे झाले तर हे लेखन अगदी सुरुवातीचे लेखन आहे.

आता साडेचार वर्षांच्या आयुक्तीचे लेखन पाहू. परिसर भेटीला जाऊन आल्यावर आपल्याला काय काय दिसले ते तिने चित्र काढून लिहिले आहे. तिच्या लेखनात आपल्याला शिरोरेषा असणारे आणि एकमेकांपासून अलग असणारे असे शब्द दिसतात. प्रत्येक शब्दातील अक्षरे सुटी



**आम्ही गावाला गेलो होतो तेव्हा पाऊस पडायला लागला. विजा चमकत होत्या.**

**तन्मय, सव्वातीन वर्षे**



**परिसर भेटीला गेल्यावर झाड दिसलं. झाडाला फुलं होती. मग मला अजून एक सूर्यफूल पण दिसलं.**

**आयुक्ती, ४.५ वर्षे**

सुटी आहेत. तिच्या चिन्हांमध्ये मराठी न, ग, उ, ठ यासारख्या देवनागरी लिपीतील अक्षरांसारखी वळणे दिसतात.

मुलांच्या चित्र काढणे व लिहिणे या दोन्ही क्रिया जशा उस्फूर्त आहेत तशाच अत्यंत विचारपूर्वक केलेल्या कृती आहेत असे लक्षात येते. आयुक्तीने बराच वेळ विचार करून चित्र काढले आणि त्याविषयी लिहिले. नंतर जरा वेळ थांबून तिने आपल्या कामाचे निरीक्षण केले. आपण काहीतरी विसरलो असल्याचे तिच्या लक्षात आले. तिने पुन्हा स्केचपेन घेऊन चित्राच्या उजवीकडे एक सूर्यफूल काढले व लिहिलेल्या ओळीच्या उजवीकडे वेगळ्या रंगात लिहिले, मला अजून एक सूर्यफूलपण दिसले.

मुले जेव्हा आपणहून विचार करून काहीतरी काम करतात तेव्हा आकलन व अभिव्यक्ती या दोन्ही गोष्टी ती एकाच वेळी शिकतात. म्हणूनच मुले विचार करताना दिसतात तेव्हा त्यांना मुक्तपणे व्यक्त होण्याचा अवकाश द्यायला हवा. कित्येकदा मुलांनी पहिला प्रयत्न केलेला दिसला की आपण लगेच त्यात दुरुस्त्या सुचवू लागतो. परंतु आपण लक्षात घ्यायला हवे की या त्यांच्या प्रयत्नात आपली भूमिका आहे निरीक्षणकर्त्याची व सुलभकाची. एक पालक किंवा शिक्षक म्हणून मुलांना योग्य तो फीडबॅक देऊन आपण त्यांची साक्षरतेची जाण वाढवू शकतो. मुलीने एखादे चित्र काढून त्याची गोष्ट लिहून आणली तर 'वा छान!' असे म्हणून सोडून न देता आपण त्याला का छान म्हणतो आहे ते स्पष्ट करायला हवे. 'इथे तू लिहिलेले अगदी अक्षरासारखे दिसते आहे.' किंवा 'तुझ्या दोन शब्दांमध्ये जागा सोडली आहेस.' अशासारखे फीडबॅक मुलांना उपयुक्त ठरतात व त्यांना लेखनाविषयी काही महत्त्वाचे संकेत मिळतात.

मुलांच्या या लेखन प्रक्रियेचा एक सलग आलेख असतो असे आपण म्हणू शकतो. मी मुद्दामच 'टप्पा' हा शब्द टाळते आहे कारण टप्पा म्हटले की पहिल्या नंतर दुसरा टप्पा असा क्रम असला पाहिजे असे वाटते. मात्र या वयातील मुलांचे लेखन ही एक वैकासिक प्रक्रिया आहे. कोळ्याच्या जाळे विणण्याच्या पद्धतीप्रमाणे ती पुढे-मागे



**एक मुलगा खेळत होता. फुगे उडवत होता. त्याला तेव्हा वर बघताना विमान दिसलं. फुगे उडवायचा फेस सांडून गेला. मग त्याच्या भावाने फेस परत भरून दिला. त्या मुलाचं नाव होतं आदित्य.**

**स्वदीप, ५.५ वर्षे**
**२४ जुलै २०१५**

पुढे-मागे होत असते. त्यामुळे ते लेखन औपचारिक लेखनाच्या पट्टीवर तपासले जाऊ नये व त्यातून प्रगत-अप्रगत असे निष्कर्षही काढू नयेत. याची सत्यता आपल्याला स्वदीपच्या लेखनातून पटेल.

साडेपाच वर्षांच्या स्वदीपने गोष्ट लिहिताना वर-खाली झिग-झॅग जाणाऱ्या ओळी लिहिल्या आहेत. या रेषांचा चढ-उतार सुरुवातीला तीव्र व दाट आहे. ओळीच्या शेवटी-शेवटी त्यातील वळणे कमी होउन रेष सरळ होत जाते. पुढच्या ओळीच्या सुरुवातीला पुन्हा रेषांचा चढ-उतार वाढतो. यावरून स्वदीपच्या डोक्यात काही विशिष्ट कल्पना व नियोजन असले पाहिजे हे निश्चित. साधारण आठवडाभर आधी स्वदीपने केलेले लेखन पाहिले तर त्या लेखनात देवनागरीतील ळ, क, ब, द, र यांसारखी अनेक अक्षरे दिसतात. देवनागरी लिपीत नसणारी अनेक अक्षरेही त्याने लिहिली आहेत. या अक्षरांमध्ये सरळ रेषा, तिरप्या रेषा, अर्ध गोल, पूर्ण गोल यासारखे प्रचलित अक्षरांतील घटक वापरलेले दिसतात. म्हणून स्वदीपची स्वलिपीतील अक्षरेही वरवर पाहता प्रचलित अक्षरे असल्यासारखी दिसतात.



**भिडे आसमंती**
**ध्वजा वैष्णवांची**
**उभी पंढरी आज नादावली**
**जरी बाप साऱ्या जगाचा**
**परी तू**
**आम्हा लेकरांची विठू माउली**
**माउली माउली रूप तुझे**
**विठ्ठल विठ्ठल विठ्ठल**

**स्वदीप, ५.५ वर्षे**
**१७ जुलै २०१५**

आठवड्याआधीचे लेखन अधिक प्रगल्भ म्हटले तर स्वदीप पुढे जाण्याऐवजी मागे आला असे म्हणावे लागेल. मात्र सुटी सुटी अक्षरसदृश चिन्हे काढता येणे हे अधिक प्रगत लेखनाचे लक्षण आहे का लेखनाची ओळीत मांडणी, डावीकडून उजवीकडे लिहीत जाणे व पुन्हा खालच्या ओळीत डावीकडे सुरुवात करणे हे अधिक प्रगत म्हणता येईल? या प्रश्नाचे 'हो' किंवा 'नाही' असे उत्तर देणे अवघड आहे. म्हणूनच मुलांच्या लेखनाकडे टप्पे म्हणून न बघता एक सलग, सातत्यपूर्ण प्रक्रिया (continuum) म्हणून बघावे.

लिहिणे हे आपले विचार व कल्पना व्यक्त करण्यासाठी वापरण्याचे एक साधन आहे हे लक्षात आल्यावर मुले विविध प्रकारचे लेखन करतात. गोष्टी लिहितात, पत्र लिहितात, याद्या करतात, प्रयोग व कविता लिहितात. सिद्धार्थने सहलीच्या वस्तूंच्या यादीत एकेका वस्तूसाठी एकएक शब्द लिहिलेला दिसतो. वस्तूच्या नावासमोर प्रत्येक वस्तूचे चित्रही काढलेले दिसते.



सहलीचे साहित्य, सिद्धार्थ, ५.५ वर्षे



वाढ होणाऱ्या गोष्टी, मानसी, ४.५ वर्षे



भिंगाचा प्रयोग – जाळीदार पान, भिंग, झाडाची साल, कुंभार माशीचे घर.

भिंग जवळ धरल्यावर मोठं दिसलं. कुंभार माशीच्या घरावर नक्षी दिसली.
पानावर रेषा रेषा दिसल्या.
खुशी, ४.५ वर्षे

मानसीने 'वाढ होणाऱ्या गोष्टी' या प्रकल्पात वाढ होणाऱ्या गोष्टींची यादी केली आहे. आपले नाव लिहिण्यासाठी तिने म, र, व, क अशा अक्षरांचा वापर केलेला दिसतो. परंतु यादीतील तिच्या लिपीत मात्र कुठलाच आकार अक्षरसदृश दिसत नाही. तिने यादीचा आकृतीबंध वापरला आहे आणि यादीतील गोष्टींची संख्या दर्शविण्यासाठी १ ते ५ अंक चिन्हांचा वापर केला आहे. कोंबडी, बेडूक, साप, चिमणी, बाळ, अळी या तिच्या सहा गोष्टींच्या यादीसाठी तिने दोन वेळा १ ते ५ या संख्या वापरल्या आहेत. तिला १ ते ५ संख्याचिन्हे माहीत आहेत व काढता येतात. (३ हा आकडा उलटा काढल्यामुळे ६ दिसतो आहे.) ५ पेक्षा अधिक वस्तू असतील तर आणखी काही लिहायला हवे हेही माहीत असावे. फक्त काय ते निश्चित माहीत नसल्याने तिने पुन्हा १ ते ५ अंक लिहिले आहेत.



माझे हात, संपदा, ४.५ वर्षे

खुशीने भिंगातून अनेक गोष्टींचे निरीक्षण केले आहे. त्यानंतर तिने चित्रे काढून आपली निरीक्षणे लिहून काढली. तिने सरळ सरळ कागदाचे दोन भाग केले आहेत. डावीकडे आकृत्या आणि उजवीकडे लेखन. हे असे का केले आहे असे विचारल्यावर पुस्तकात असेच असते असे तिचे उत्तर होते. या साऱ्यावरून मुले खूप विचारपूर्वक आपले काम करतात असे दिसते.

४ ते ५ वर्षे वयाच्या मुलांच्या गटात ताईंनी 'माझे हात' हे पुस्तक वाचून दाखवले. अनेक मुलांनी कलेच्या कोपऱ्यात ठेवलेल्या रंगात हात बुडवून कागदावर उठवले. संपदानेही शेजारी शेजारी दोन्ही हात उठवून त्याखाली ५ ओळीत आपले हात काय काय करतात ते लिहिले. तिने वापरलेल्या वाक्यांच्या आकृतीबंधामुळे व रंगांमुळे तिने ३ स्तंभांमध्ये लिहिल्यासारखे दिसते. पहिल्या स्तंभात 'माझे हात' असे लिहिले आहे. त्या स्तंभातील सर्व शब्दांमध्ये कमालीचा सारखेपणा आढळतो. तिसऱ्या स्तंभात 'करतात' हा शब्द लिहिला



वृंदाने आजीचे चित्र काढून लिहिले आहे,

आजी मी तुझ्याशी खेळेन गं
हंड्यावरती तपेलं चुलीवरती पातेलं
तुझं माझं घरकुल मांडेन गं
ए आजी मी तुझ्याशी खेळेन गं

**वृंदा, ३.५ वर्षे**

आहे. तेथेही हा सारखेपणा आढळतो. मधल्या स्तंभात मात्र भांडी घासतात, धुणं धुतात, स्वयंपाक करतात, उप्पीट करतात, पोळ्या करतात अशा कृती लिहिल्या आहेत. प्रत्येक वाक्याची सुरुवात 'माझे हात' या शब्दसमूहाने होते व शेवट करतात' या शब्दाने होते हा वाक्याचा पॅटर्न संपदाच्या लक्षात आला आहे.

अक्षरांची योग्य वळणे मुलांना अवघड वाटतात. तसेच नक्की कुठे सुरुवात करून कसे लिहिले म्हणजे आजूबाजूला दिसते तसे लेखन दिसेल याची खात्री नसते. अक्षरे समोर पाहून जशीच्या तशी उतरवून काढणेही लहान मुलांना अवघड वाटते. मी माझा खडू कुठे ठेवू आणि कुठून कसा हलवू म्हणजे म्हणजे समोर आहे तसे दिसेल ही मुलांना मोठी समस्या वाटते. पुढील ३ नमुन्यांकडे बघताना लक्षात येईल की जसजसा मुलांचा कारक व बोधात्मक विकास होत जातो तसतशी त्यांची अक्षरे बोर्डवर लावलेल्या नमुन्यातील अक्षरांसारखी दिसू लागतात. या सर्वांनी बोर्डवर लावलेल्या कविता बघून लिहून काढल्या आहेत.



दोन होती अंडी
त्यांना वाजली थंडी
दात लागले वाजायला
अंडी लागली नाचायला
नाचता नाचता टक्कर झाली
दोन्ही अंडी फुटून गेली
आईने केले ऑम्लेट मस्त
मुलांनी केले खाऊन फस्त

**प्रियांशु, ४.५ वर्षे**

स्वदीपने आपल्या नावातील 'स' काढण्याचा केलेला प्रयत्न पाहू. सर्वात वरच्या ओळीत 'स' व्यवस्थित दिसतो. त्याखालील दोन ओळींमध्ये 'स' ची मधली रेष हरवलेली दिसते. त्याखालील 'स' ची रेष खूपच लांबवलेली दिसते. शिवाय ती उभ्या रेषेला जिथे मिळते तेथेच न थांबता



**स्वदीप, ५.५ वर्षे**



मच्छली का बच्चा
अंडे से निकला
पानी में फिसला
बडा मजा आया

**प्रथमेश, ५.५ वर्षे**

थोडी पुढे वाढवली गेलेली दिसते. शेवटच्या ओळीत त्याने आपल्या नावातील 'स्व' हे जोडाक्षर काढण्याचा प्रयत्न केला आहे.

अक्षरे न शिकवितासुद्धा मुले बघून बघून शिकतात. सर्व अक्षरे जरी आजूबाजूला दिसत असली तरी जी अक्षरे मुले सर्वात प्रथम शिकतात ती त्यांच्या नावात असतात. नव्हे असे निश्चित म्हणता येईल की आपल्या नावाकडे बघून बघूनच मुले अक्षरे, शब्द व लेखन यांचा विचार करू लागतात. यामुळे असे दिसते की अक्षरे शिकणे ही एक यांत्रिक बाब नसून त्यातील भावनिक घटक समजून घ्यायला हवा. शिवाय मुले अक्षरांकडे सुटे सुटे भाग म्हणून न बघता एखाद्या अर्थपूर्ण रचनेचा भाग म्हणून बघतात. म्हणून एकाच अक्षराचा उपयोग ती विविध उच्चारांसाठी करतात. येथे चुकीचे अक्षर चुकीच्या ठिकाणी वापरले ही लक्षात घेण्याची बाब नसून एकच अक्षर आपण अनेक ठिकाणी वापरू शकतो ही मुलांची समज महत्त्वाची आहे. एका विशिष्ट अक्षराचा संबंध एका विशिष्ट आवाजाशी लावायचा असतो हे समजायला मुलांना वेळ लागतो. येथे शिक्षिकेने दररोज मुलांना उच्चारांची जाणीव करून देत देत अक्षरे लिहिणे किंवा वाचून दाखवणे यामुळे ही समज तयार होते.

बोलण्यापासून कागदावर केलेल्या पहिल्या खुणेपर्यंत, टिंबापासून चित्रापर्यंत आणि चित्रापासून अक्षरापर्यंतचा मुलांचा हा प्रवास म्हणजे साक्षरतेकडे जाणारा माणसाचा प्रवास आहे. मुलांचा पुरेसा कारक व बोधात्मक विकास होण्याआधीच जर अक्षरे, अंक गिरवण्यावर भर दिला तर हा प्रवास नैसर्गिक क्रमाने होत नाही. त्यामुळे तो रुजत नाही. मग शाळेमध्ये मुलावर अप्रगत म्हणून ठप्पा लागतो. शिवाय मुलालाही वाटते की मला काही येत नाही. मुलांना जर प्रचलित अक्षर ओळख करून देण्यापूर्वी लेखन-वाचनाबद्दल विचार करण्याची, स्वलिपीत लेखन करण्याची शाळेत येताच संधी दिली तर या प्रक्रियेबद्दलची भीती मुलांच्या मनातून कायमची नाहीशी होईल. मुले जेव्हा प्रथम शाळेत प्रवेश घेतात तेव्हा त्यांच्याबरोबर गाणी, गोष्टी, गप्पा अशा अनेक कृती तोंडी भाषेच्या विकासासाठी केल्या जातात. त्याबरोबर एका कोपऱ्यात पुस्तके, खडू, स्केच पेन, पाण्याचे रंग, ब्रश, कागद, शाडू माती, टिकल्या, चमचम, रांगोळी असे विविध प्रकारचे कलेचे व लेखनाचे साहित्य ठेवावे व मुलांना हवे तेव्हा हवे तितका वेळ या कोपऱ्याचा फायदा घेऊ द्यावा. शिवाय शिक्षकांनीही मुलांसमोर कॅटलॉग लिहावेत, उपस्थिती मांडवी, पालकांसाठी सभेची सूचना लिहावी, कॅल्क्युलेटर वापरावा, कॅलेंडरवर खुणा कराव्यात. शिक्षकांना अशा प्रकारे लेखन-वाचन करताना पाहून मुलेही अनुकरण करू लागतात. शिवाय शाळेच्या भिंतींवरही थोडके, ठळक लेखन दिसले व ते वारंवार वाचले गेले तर मुलांना लिहिते व्हायला वेळ लागणार नाही.


**डॉ. मंजिरी निंबकर**
manjunimbkar@gmail.com
9822040586

**डॉ. नीलिमा गोखले**
neelima.gokhale@gmail.com
9823053272






*With best compliments from*

**Rahul, Varsha and Siddhant Choudhari**

Flat No. 48, Bld No. 3,S. No 61-21B,
Gopinath Nagar, Near Gandhi Bhavan.
Kothrud, Pune - 38

*Best Wishes From*

# SANTOOL

211/4, Navi Peth, Pune : 411 030.
Ph. : +91-20-24336764, 2433 5867
email : santool@vsnl.com



# निसर्गाची शाळा

## सुनील करकरे

निसर्ग अभ्यासक व वन्यजीव छायाचित्रकार सुनील करकरे गेल्या तीन दशकांहून अधिक काळ निसर्ग संरक्षण, संवर्धन व शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. ते माजी मानद वन्यजीव रक्षक आहेत तसेच विश्व प्रकृति निधी– भारत च्या कोल्हापूर विभागाचे विभाग प्रमुख म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. सध्या ते 'वाइल्ड आयकॉन' चे संचालक तर 'निसर्ग' या संस्थेचे कार्यकारी संचालक म्हणून काम करीत आहेत.

मध्यंतरी पश्चिम घाटातील एका निसर्गरम्य परिसरात फुलपाखरांचे छायाचित्रण करत मी भटकत होतो. या घाटातूनच वळणावळणाचा एक रस्ता गोव्यास जातो. या नागमोडी मार्गावरून सायंसाय करत गाड्यांचे जाणे येणे सुरू होते. अचानक एक मोठी कार करकचून ब्रेक मारत माझ्या पुढ्यात येऊन थांबली.

गाडीतून एक मध्यमवयीन व्यक्ती खाली उतरली.

माझ्याजवळ येत ''ओळखले का सर?'' असा प्रश्न करत वाकून नमस्कार करती झाली.

मी थोडा विचारात पडलो.

पाठोपाठ खुलासा आला. ''मी शंतनू. तुमच्याबरोबर १९९५ साली मेळघाटाच्या जंगलात निसर्ग शिबिराला आलो होतो. तेव्हा मी शाळेत शिकत होतो. आता गोव्यात माझा कारखाना आहे.''

पुढची १०-१५ मिनिटे शंतनू भरभरून बोलत होता. शिबिरातील त्या मंतरलेल्या दिवसांची आठवण करत होता. त्या एकाच शिबिरानंतर त्याचे आयुष्य कसे बदलले, निसर्गासाठी आता काय काय करतो, असे खूप काही सांगत होता. आता मुलांना शिबिराला पाठवतो, असेही म्हणाला.

असे अनेकजण कोठेना कोठे सतत भेटत असतात.

कधी नंदिता भेटते. शिबिराला आली तेव्हा ती पाचवीत असते. आता डॉक्टर झालेली असते. तिला तिच्या मुलीला आता शिबिराला पाठवायचे असते.

कधी नितेश भेटतो. आता तो



मोठा चित्रकार झालेला असतो. परंतु त्याचे निसर्गगान अजूनही संपलेले नसते.

यातील आता कोणी नोकरदार तर कोणी व्यावसायिक झालेले असतात, कोणी गृहिणी तर कोणी आणिक काही. कोणाला एकदाच निसर्गात येता आलेले असते, कोणी सातत्य राखून असतात. अनेकांची दुसरी तर काहींची तिसरी पिढीही माझ्याबरोबर जंगलात भटकंती करत आहे.

आजतागायत असंख्य विद्यार्थी, युवक, प्रौढ आणि परिवार माझ्या समवेत वेगवेगळ्या जंगलांत आलेत. त्यातील अनेकांच्या मनात थोड्याश्या निसर्गसहवासातून निसर्गवेडाचे बीज रुजले. अनेक विद्यार्थी-युवकांच्या तर आयुष्याचे ध्येयच निसर्गकेंद्रित झाले. त्यातील आता कोणी वन्यजीव छायाचित्रकार, तर कोणी निसर्ग चित्रकार, अनेकजण निसर्गातील विविध पैलूंवर काम करणारे अभ्यासक झालेत. निसर्गसंवर्धनावर आधारित जीवनशैली अंगिकारून निसर्गवळण जोपासणारे अनेक परिवार निर्माण झालेत.

अशा अनेकांच्या मनात, हृदयात आणि जीवनात हा निसर्ग रुजला. याला मी कारणीभूत जरी झालो असलो, तरी मी केवळ माध्यम होतो.

हे साध्य कसे होऊ शकले?

आजकाल कधीतरी मी एकटाच निवांत बसतो. मग हळूच भूतकाळात डोकावतो.

माझी आई ही मनस्वी निसर्गवेडी होती. झाडे-पाने-फुले-प्राणी-पक्षी अशांची तिला फार आवड होती. ती बागकामात खूप रमे. साहजिकच, माझ्यातील निसर्गवेड तिच्याकडून वारसाहक्काने मिळाले यात शंकाच नाही. त्यातच बालपणापासून शालेय शिक्षण पूर्ण होईपर्यंत अधूनमधून नितांत सुंदर अशा

निसर्गाचा सहवास लाभला. निसर्गाचे संस्कार माझ्यावर बालपणापासूनच होत आहेत. आणि ही प्रक्रिया अजूनही चालूच आहे.

माझी सर्वात जुनी आठवण मला अंदाजे पन्नासएक वर्ष मागे नेते. मी ५-६ वर्षांचा असेन. आम्ही तेव्हा चांद्याला (आताचे चंद्रपूर), गावाबाहेरील बाबूपेठच्या सरकारी वसाहतीत राहात होतो. आमच्या या वसाहतीमागे चांगले मोठे जंगल होते. साहजिकच वसाहतीत वेगवेगळया वन्यजीवांचा मुक्त संचार असे. त्यात विंचू-इंगळीसारखी विषारी मंडळी असत. साप-सरड्यांसारखी सरपटणारी मंडळी असत. वानरांचा तर नुसता उच्छाद असे. कधी रानडुकरांची सरच्या सर वसाहतीत शिरून नुसती धमाल उडवी. रात्रीच्या अंधारात अधून मधून अस्वल-बिबट्यांचीही फेरी होई.

बाबूपेठच्या मुक्कामातील वन्यप्राण्यांच्या अनेक गमतीजमती पुसटश्या का होईना, मला अजूनही आठवतात.

नंतरची २-३ वर्षे नागपुरात गेली. माझी दुसरीची परीक्षा संपली. आमचा नागपुरातील मुक्कामही संपला.

वडिलांची बदली झाली. आता ठिकाण होते, भंडारा जिल्ह्यातील सिरपूर. महाराष्ट्र आणि तेव्हाच्या मध्यप्रदेशच्या - आताच्या छत्तीसगढच्या - सीमेवरून वाहणाऱ्या बाघ नदीवर धरण बांधण्याचे काम चालू होते. वडील या धरणाच्या तांत्रिक विभागाचे प्रमुख अभियंता होते.

अजूनही स्पष्ट आठवते.

भर उन्हाळ्यातील रणरणत्या उन्हात वडिलांच्या सरकारी जीपमधून नागपूरहून ६-७ तासांचा प्रवास करून बाघ धरणाच्या आमच्या वसाहतीत पोहचलो, तेव्हा अंधारून आले होते. स्वागताला आपापसातील बोलणेही ऐकू जाणार नाही अशा मोठ्या आवाजात कोणतेतरी यंत्र सुरू होते. मग समजले, संपूर्ण वसाहतीला वीज पुरवठा करणाऱ्या जनरेटरचा तो आवाज होता. दररोज रात्री ७ ते १० पर्यंत हा जनरेटर चालू असे, तेवढाच विजेचा संबंध. त्यातही अधूनमधून जनरेटरमध्ये बिघाड होई. मग कंदिलाचा मंद प्रकाश हेच उजेडाचे साधन.

दुसऱ्या दिवशी सकाळी घराबाहेर डोकावलो आणि गडबडलो. शेजारचे आणखी एक क्वार्टर सोडले तर आजूबाजूला कोणतीही वस्ती नाही. कोणाचाही शेजार नाही. घरासमोर धुळीचा कच्चा आडवा रस्ता. रस्त्यापलीकडे मोठमोठाल्या वृक्षांची राई आणि त्याखाली उंचच उंच वारुळे. घरामागे चांगलेच घनदाट जंगल होते.



वसाहतीतील इतर कर्मचाऱ्यांची घरे तर नजरेच्या टप्प्यातही नव्हती.

जंगल तोडून नुकतीच ही वसाहत बांधली होती.

मोठ्या शहरातून एकदम अशा जंगलात रहायला जाणे तसे अवघडच होते. हळू हळू जनरेटरच्या आवाजाची, तो बंद झाल्यावरच्या भयाण शांततेची, मिट्ट काळोखाची आणि एकलकोंडेपणाची सवय झाली.

त्या वातावरणात रमल्यावर लवकरच लक्षात आले की जंगलातील मूलवासींनी या परिसरावरील आपला हक्क आणि ताबा काही सोडला नव्हता. घरीदारी त्यांचा मुक्त वावर होता.

घराच्या कोणत्याही सांदी-सपाटीतून विंचू-इंगळ्या बाहेर पडत. घराच्या कौलारू छपरातून मोठमोठ्या पालींसोबत घोरपडींचाही वावर असे. घराच्या आवारात अधूनमधून सापही नजरेस पडत. पावसाळा सुरू होताच असंख्य जातींच्या कीटकांचे थवेच्या थवे घरात शिरू लागत.

घरामागच्या जंगलातून नेहमीच लेकुरवाळ्या वानरांची मोठी फौज वसाहतीत येई. मग घरासमोरच्या वृक्षराजीतील मोह, बेहडा, आंबा, चिंच अशा पुराणवृक्षांवर त्यांचा नुसता धुडगूस चालू राही. बऱ्याचदा रात्रीचा त्यांचा मुक्काम या झाडांच्या उंच शेंड्यावर असे. कधी अवचितच रात्रीच्या किर्र अंधारात विशिष्ट आवाजात त्यांचा कोलाहल सुरु होई.

आई अंदाज करी, कोणतातरी शिकारी प्राणी आला वाटतं.

आमचा घरगडी लक्ष्मण जंगलाचा चांगलाच जाणकार होता. दुसऱ्या दिवशी कामावर आल्याआल्या तो सांगे, बिबट येऊन गेला बगा. घरासमोरच्या धुळीच्या रस्त्यावर बिबटचे पंजे उमटलेले असत. ते लक्ष्मण आम्हाला दाखवी. कधी समोरचे वारूळ फोडलेले दिसे. ''हे असोलीचे काम व्हय'', लक्ष्मण खुलासा करी.

अशाच एका सायंकाळी वसाहतीत एक बिबट्या शिरला. जंगलाला लागूनच एका चौकीदाराचे घर होते. दारातील त्याच्या गाईच्या वासराला या बिबट्याने धरले. मी माझ्या तीनचाकी सायकलवर बसून हा सारा प्रकार पाहिला. बिबट्याने वासराला धरल्याचे लक्षात येताच चौकीदारिणीने जी काही बोंब ठोकली, सारी वसाहत धावून आली. या गडबडीत सायकलसकट कोणीतरी माझी तेथून उचलबांगडी केली.

मी बिबट्याला पहिल्यांदाच पाहात होतो. त्यामुळे त्यातील धोका मला जाणवलाच नाही.

वाघालाही मी वसाहतीतच पाहिले. रात्रीच्या वेळी आम्ही जीपमधून कोठूनतरी घरी परतत होतो. जंगलरस्ता सोडून जीप वसाहतीत शिरली, तोच जीपच्या प्रकाशझोतात वाघ आडवा आला. तोंडात बकरी उचलून धरली होती. वाघ काही क्षण गाडीसमोर थांबला. मग गाडीकडे बघत बघत रस्ता ओलांडून जंगलातील अंधारात नाहीसा झाला.

यावेळी मात्र गाडीतील सर्वांचीच भीतीने चांगलीच गाळण उडाली होती.

घरामागच्या झाडीत दिवसा उजेडी असेच एकदा अस्वलही पाहिले होते. कोल्ह्यांना बघणे आणि कोल्हेकुई ऐकणे हे नित्याचेच होते.

तिसरीची माझी शाळा तर खासच होती. शाळा वसाहतीपासून ३-४ मैलावरील कुंभारटोला या लहानशा खेड्यात होती. चौथीपर्यंतची ती एकशिक्षकी शाळा होती. सुतार गुरुजी हेच शाळेचे सर्वेसर्वा. मुळात ते भडभुंजे. चणे-मुरमुरे विकणारे. शिवाय शाळेजवळच त्यांची भातशेतीपण होती. त्यातून उरलेल्या वेळेत ते शाळा चालवायचे. तेच शाळा उघडायचे, झाडलोट-सडा सारवण करायचे, घंटा वाजवायचे, जमेल तसे - तेव्हा शिकवायचे. शाळा सुटल्यावर शाळेला कुलूप घालायचे.

आमच्या या शाळेला सुट्ट्यापण मोठ्या मजेशीर असत. नियमित सुट्ट्यांखेरीज गुरुजींच्या शेतात पेरणी-रोवणी-कापणी करायची, गुरुजी खरेदीसाठी तालुक्याला गेले, यापासून शाळेत अजगर शिरला म्हणून, कधी गावाच्या आसपास वाघाचा वावर वाढला अशा कोणत्याही कारणासाठी कितीही दिवस सुट्टी असे.

वसाहतीतून आम्ही ८-१० मुले-मुली या शाळेत जात असू. शाळेत सोडायला आम्हाला कोणते ना कोणते सरकारी वाहन असे. परंतु बऱ्याचदा शाळा लवकर सुटे. अशा वेळी जंगलातील पायवाटेने रमत गमत, हे बघ- ते बघ, याच्या मागे लाग- त्याच्या मागे लाग असे करत आम्ही घरी जात असू.

सुरुवातीस या वाटेवरून चालताना मनात सतत भीती असे. जरा खुट्ट झाले, पायाखाली जरा काही वाजले तरी जीव दडपून जाई. हळूहळू मी या जंगल वाटेला सरावलो. तशी मनातील भीतीही संपली. याच वाटेवर मी वन्यप्राण्यांच्या असंख्य खाणाखुणा पाहिल्या. वेगवेगळे वन्यप्राणी पाहिले.

या वाटचालीतच मला निसर्गाच्या अनादी अनंत अशा मुळाक्षरांची ओळख झाली. इतर कशाहीपेक्षा निसर्गातच रमायला मला आवडू लागले. या काळात माझे सखेसोबती, सवंगडी हे फुलपाखरे, वेगवेगळे किडे-मकोडे, चतुर, विंचू-इंगळी, पाली, सरडे, खेकडे, बेडूक, मासे, पक्षी, प्रसंगी साप असे कोणीही असत. या सहवासातूनच माझ्या बालमनात निसर्ग पुरता रुजला.

गाव बदलले, सवंगडी बदलले. परंतु ही वाटचाल पुढेही अशीच सुरू राहिली. पुढे शालेय जीवन संपेपर्यंत माझ्यातील निसर्गप्रेमाचे रूपांतर निसर्गवेडात झाले होते.

कालांतराने महाविद्यालयीन शिक्षण घेता घेता मी आमच्या गावालगतच्या - परतवाड्यालगतच्या - मेळघाटातील वाघांच्या जंगलात फिरू लागलो. वाघांचा माग काढू लागलो. याच काळात माझ्या वाचनाला दिशा मिळाली. जिम कॉर्बेट, केनेथ अ‍ॅन्डरसन, जॉय अ‍ॅडमसन, जॉर्ज शेल्लार यांच्यापासून मारुती चितमपल्ली, व्यंकटेश माडगूळकरपर्यंत अनेकांच्या पुस्तकांचे पारायण सुरू झाले. त्यातच भारतीय वन्यजीवांवरचे चांगले संदर्भग्रंथ हाती आले. माझे ज्ञान अधिक शास्त्रीय होऊ लागले. माझ्या निसर्ग-ज्ञानाच्या कक्षा अधिक रुंद झाल्या. अधिक खोल झाल्या. कालांतराने याच क्षेत्रात मी नोकरी केली, याच क्षेत्रात आता पूर्णवेळ कार्यरत आहे. पुढेही राहीन!

प्रख्यात निसर्गलेखक मा. तात्या उर्फ व्यंकटेश माडगूळकर एकवार मला म्हणाले होते, ''आपल्या आवडत्या क्षेत्रात पूर्णवेळ काम करायला मिळणं, याला भाग्य लागतं. तू महाभाग्यवंतांपैकी एक आहेस.''

हे खरे आहे!

लहानपणापासूनच मला अद्वितीय, अद्भुत, अप्रतिम आणि अनमोल अशा निसर्गाचा सहवास लाभला. प्रदीर्घ सहवासातून निसर्गाबद्दल आत्यंतिक आपुलकी निर्माण झाली. या आपुलकीचे रूपांतर मैत्रीत झाले. मैत्रीतूनच निसर्गाला खऱ्या अर्थाने मी समजून घेऊ शकलो. त्याचे महत्त्व जाणून घेऊ शकलो. आणि निसर्गाची माहिती समजली म्हणूनच मी निसर्ग संरक्षण, संवर्धन आणि शिक्षणासाठी कृतिशील होऊ शकलो.

प्रचलित शिक्षणामुळे नव्हे, तर निसर्गामुळेच मी जगायला शिकलो.

**सुनील करकरे**
sunil.karkare@yahoo.co.in
9422044397

छायाचित्रे- सुनील करकरे



*With Best Compliments From*

**Interior Decorators**

# Abhi - Om Engineers

**ADDRESS :**

**3C / A2 / 8, Nav Ajantha Avenue Society, Paud Road, Kothrud**
**Pune - 411 029. Mobile - 98230 11116**



# गजरा

## मालविका झा

इंग्रजी विषयात एम. ए. असलेल्या मालविका झा यांनी बरीच वर्षे इंग्रजीचे अध्यापन केले. गेल्या ५ वर्षांपासून त्या सेंटर फॉर लर्निंग रिसोर्सेस, पुणे या संस्थेबरोबर बालशिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. महाराष्ट्रातील मेळघाट येथील धरणी जिल्ह्यात अंगणवाड्यांच्या सबलीकरण प्रकल्पात त्यांनी काम केले आहे. सध्या छत्तीसगढ व उत्तर प्रदेश सरकारच्या महिला व बालविकास विभागाच्या आय सी डी एस लीडरशिप कार्यक्रमात प्रशिक्षक म्हणून काम पाहात आहेत.

जंगली महाराज रोड रोजचाच. बालगंधर्व रंगमंदिराच्या बाहेरची संध्याकाळी सहा दरम्यानची गर्दी. ती त्या झाशीच्या राणीलासुद्धा रस्त्यावरील वाहनांचा भाग बनवून टाकते. या सगळ्यामधून रोज बस किंवा रिक्षामधून जाताना – या गर्दीतून बाहेर कसं पडता येईल – केवळ यासाठी अधून मधून ट्रॅफिक किती आहे हे बघताना, बालगंधर्वच्या शेजारची बाग, झाडं यांकडे लक्ष जाण्याचं काय कारण?

पण त्या दिवशी झालं असं की मी माझ्या भाचीला भेटायला गेले. साडेतीन वर्षांची आहे पोट्टी. ५ वाजायच्या दरम्यान ती मला म्हणाली, ''मालूमावशी, चल आपण ना फुलं गोळा करू.''

मी म्हटलं, ''कोणती फुलं?''

ती म्हणाली, ''आहेत खाली, सडा आहे जांभळ्या फुलांचा.'' तिला आणलेली परडी घेतली आणि माझा हात धरून खाली आली. फुलं बघून पळत सुटली. बिल्डिंगच्या गेटपाशी अर्ध्या सेकंदात सुकून जातील अशा फुलांचा सडा पडला होता. गेटपाशी पोहोचल्यावर म्हणाली, ''याच्या बाहेर नाही जायचं, काय?'' मी मानेनं हो म्हटलं. मग मी तिथं ठोंब्यासारखी उभी आहे म्हटल्यावर म्हणाली, ''अगं आपण दोघी मिळून गोळा करूया फुलं, बघ छान आहेत की नाहीत?'' मला बराच वेळ त्या फुलांकडे बघून वाटत राहिलं, अरे, का ही उगाच फालतू फुलं गोळा करतीय? ही काय गजरा बनवायची फुलं थोडीच आहेत? मोगरा, जुई जाई अशी असती तर ठीक. काय, आता करा गोळा! म्हणून मी आपली अधूनमधून एखादं फूल तिच्याखातर उचलून टाकत होते.

''अगं, ते बघ ना तिथे किती छान आहेत की नाही, उचल ना मालू मावशी, आपण वर गेल्यावर हार करूया काय गणपतीसाठी! तुला येतो का हार बनवता? मी शिकवते तुला... माझा फोटो आहे ना बाबीनं काढलेला, त्यात आहेत बघ ही फुलं. ही कर गोळा मग आपण हार बनवू.'' मी म्हटलं, ''तुझ्यासाठी बनवूया का गजरा? छान दिसेल.'' असं तिचं ऐकत, गप्पा मारत मी नकळत तिच्याबरोबर खूप फुलं गोळा केली. आम्ही न राहवून थोडं गेटच्या बाहेर जाऊनदेखील काही फुलं गोळा केली. वर आलो आणि मस्त 'न टोचणाऱ्या सुई'नी हार तयार केला आणि शेवटी तिच्याच डोक्यावर तिनं तो लावूनही घेतला, फोटो काढून घेतले. तो फुलांचा गजरा बनवतानादेखील तिचं चालू होतं, ''तू दोन फुलं ओव आणि मी दोन ओवते, काय?'' तिनं मला खूप सहजपणे तिच्या फुलं वेचणं आणि गजरा बनवणं या गोष्टींमध्ये गुंफून टाकलं. आम्ही नंतर जेवलो, खूप गप्पा मारल्या आणि मला वाटलं ती फुलं आणि गजरा माझ्या डोक्यातून निघून गेले. पण काल बालगंधर्व रंगमंदिराच्या बाहेरच्या कर्कश गर्दीत बस ताटकळत उभी असताना, खिडकीतून बाहेर मला अर्ध्या सेकंदात सुकणाऱ्या त्याच फुलांचा सडा क्षणार्धात सगळा रस्ताभर दिसून गेला. ही त्याच प्रकारची पण पांढऱ्या रंगाची फुलं. जणू काही गाड्यांमधून, गर्दीत माणसांच्या डोळ्यांवरच पडलेली. त्या फुलांकडे याआधी कधीच लक्ष गेलं नव्हतं. आता त्या फुलांकडे पाहून वाटलं, किती मस्त गजरा होईल यांचा!



**मालविका झा**
malavikajha@gmail.com
9420318180

# आनंदाने शिकण्याच्या दिशेने

## खेळघर हस्तपुस्तिका

१९९६ पासून पुण्यात लक्ष्मीनगर या झोपडवस्तीतील मुलांसाठी, शाळेला पूरक असे खेळघराचे काम चालू आहे. मुलांना आनंदाचे बालपण मिळावे, मोकळेपणाने व्यक्त होता यावे, त्यांनी स्वत:च्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा विचारपूर्वक प्रयत्न करावा, यासाठी पूरक वातावरण जोपासायचा खेळघरात प्रयत्न केला जातो. परिस्थितीने निर्माण केलेल्या प्रश्नांचे आव्हान पेलून त्यातून मार्ग काढून, स्वत:चा विकास साधण्यासाठी खेळघराचे कार्यकर्ते या मुलांना सहृदयतेने मदत करतात. पालकनीती परिवाराच्या खेळघराच्या या वर्षांच्या कामाच्या आधारावर हे पुस्तक साकारले आहे.

खेळघराच्या धर्तीवर मुलांसमवेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना या पुस्तकाची निश्चितच मदत होईल. आज काही वैशिष्ट्यपूर्ण, प्रयोगशील शाळांतील मुले सोडता इतर अनेक मुले आनंददायी, सर्जनशील शिक्षणापासून वंचितच आहेत. म्हणूनच मुलांपर्यंत आनंददायी शिक्षण पोहचवण्याची तळमळ असणाऱ्या सर्व शिक्षक-पालकांनाही हे पुस्तक तेवढेच उपयोगी पडेल. संवेदनशीलतेनं शिकण्या-शिकवण्याच्या प्रक्रियेचा विचार करणाऱ्या प्रत्येकाला या पुस्तकाचा उपयोग होईल असा विश्वास आहे.



पालकनीती परिवाराचे प्र का श न

### काय आहे या पुस्तकात ?

- शिक्षणाविषयी वैचारिक बैठक तयार होण्याची दिशा
- भाषा, गणित आणि जीवनकौशल्ये यासंदर्भातले भरपूर उपक्रम आणि शैक्षणिक साधने
- सातत्यपूर्ण आणि सर्वंकष मूल्यमापन पद्धती
- जाणिवांचा, विचारांचा विकास साधण्यासाठीचे खास प्रयोग आणि असे भरपूर काही

संपर्क : खेळघर : ०२०-२५४५७३२८, ९८२२८७८०९६ • Email : khelghar@gmail.com • www.palakneeti.org



# चंदूच्या मेंदू आणि शंभर शक्यता

**सुबोध केंभावी**

सुबोध केंभावी हे प्रयोगशील, पर्यायी शिक्षणपद्धतींचे अभ्यासक आहेत. अशा पद्धती प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये रुजाव्यात यासाठी ते शिक्षकांना मदत व मार्गदर्शन करतात. त्यांना गणित, विज्ञान व भाषा हे विषय शिकायला व शिकवायला आवडतात. शिक्षण-क्षेत्रातील संस्था, व्यक्तींचे एक कार्यक्षम नेटवर्क महाराष्ट्रात विकसित व्हावे यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

'शिकण्याच्या, शिकवण्याच्या वेगवेगळ्या पद्धतींची गरज आहे काय?'

या प्रश्नाचे एक उत्तर असे असू शकेल: वेगवेगळ्या पद्धतींची गरज नाही. एकच पद्धत पुरेशी आहे, पण भरपूर सराव करून घ्यावा. मग सगळी मुले नीट शिकतात. कितीतरी कोचिंग क्लासेस हेच तर करून घेतात.

पण या प्रश्नाचे अजून एक उत्तर आहे. ते उत्तर अनेक शिक्षकांच्या अनुभवांच्या मदतीने आपल्याला समजू शकेल. समजा इयत्ता पाचवीचा वर्ग आहे आणि वर्गात वीस मुले आहेत. अशा वेळी किमान दोन-तीन पद्धती वापरल्याशिवाय सगळी (किंवा निदान वीसपैकी अठरा) मुले शिकत नाहीत हा अनेक शिक्षकांचा अनुभव आहे.

भरपूर सराव करून घेऊनही शिकत नाहीत. काही मुले तात्पुरती शिकतात पण सराव बंद झाला की शिकलेले (!) सगळे आठवड्याभरात विसरतात.

मनाविरुद्ध भरपूर सराव करवून घेतला तर? अशावेळी अनेक मुले शिकत तर नाहीतच पण काहीजण शाळेत येणेच बंद करतात.

गणित विषयाचे उदाहरण घेऊया. गणित शिकवायची रुढ पद्धत काय आहे? शिक्षकांनी एक गणित फळ्यावर सोडवायचे, सोडवताना स्पष्टीकरण द्यायचे मग मुलांनी तशीच काही उदाहरणे सोडवायची. या पद्धतीने किती मुले शिकतात? जी शिकत नाहीत त्यांचे काय? त्या विद्यार्थ्यांसाठी दुसरी पद्धत हवी. अनुभव असा आहे की तीन-चार पद्धती शिक्षकांना माहीत असतील तर किमान नव्वद टक्के मुले नीट शिकली हे उद्दिष्ट गाठणे सोपे होते.

वरील उत्तर हे शिक्षकांच्या अनुभवातून आलेले उत्तर आहे. शिकवण्याच्या पद्धतींबद्दलचे उत्तर आहे हे. शिकवण्याची पद्धत कशी ठरते? एखादा विषय शिकण्याची मुलाची स्वतःची अशी जी काही पद्धत असते ती नीट वापरली जावी, विकसित व्हावी म्हणून शाळेत शिकवण्याची पद्धत वापरावी लागते. शिकवण्याच्या पद्धती या शिकण्याच्या पद्धतींवरून ठरायला पाहिजेत. शिकण्याच्या पद्धती समजून घेणे जास्त महत्त्वाचे आहे.

विद्यार्थ्यांचे अनुभव समजून घेतले तर शिकण्याच्या पद्धतींबद्दल काय लक्षात येते? हे समजून घ्यायला वरच्या उदाहरणातील इयत्ता पाचवीच्या वर्गातील वीस विद्यार्थी लक्षात न घेता एकाच मुलीचा, मानसीचा अनुभव बघूया. ही मानसी कशी आहे? ती शाळेत बहुतेकवेळा परीक्षेत पास होते, काही वेळा नापास होते. हुशार वगैरे मानली जात नाही.

शाळेत येण्यापूर्वीच मानसी एक भाषा नीट बोलायला शिकली होती. आता ती मित्रमैत्रिणींबरोबर कितीतरी खेळ खेळायला शिकली आहे. आपण फुटबॉल इतरांपेक्षा चांगला खेळू शकतो हे मानसीच्या लक्षात येते आहे. तिला कुठली भाजी आवडते ते तिला माहीत आहे आणि न आवडणारी भाजीसुद्धा बरेचदा कशीतरी खावी लागते हे ती शिकली आहे. आमटीची चव घेऊन त्यात काय जमलेय आणि काय हवे आहे हे ती चटकन सांगते. पाळलेल्या आणि न पाळलेल्या कुत्र्यांशी कसे वागायचे हे तिला हळूहळू समजतेय. पावसाळ्यात आपण व आपले दप्तर भिजू नये म्हणून कायकाय करता येते हे तिला ठाऊक आहे आणि एखादा मोबाईल फोन वापरायला मिळाला की त्यातले खेळ कसे शोधायचे आणि कसे खेळायचे हे तर तिला छानच जमतेय.

यातले काहीच ती शाळेच्या वर्गात बसून, पाठ्यपुस्तकातून शिकलेली नाही. हे खास आहेच पण याशिवाय एक महत्त्वाचा मुद्दा आहे इथे.

मोबाइलवरचे गेम्स खेळायला शिकण्यासाठी आणि फुटबॉल खेळायला शिकण्यासाठी दोन वेगळ्या पद्धती, कुवती लागतात. पाळलेल्या कुत्र्यांशी कसे वागायचे हे शिकायला आणि आमटीत काय हवे-नको हे शिकायला दोन वेगळ्या पद्धती, कुवती लागतात. मानसीचा मेंदू पहा कसा योग्य वेळी योग्य पद्धत, कुवत वापरत हे सगळे बरोबर शिकतोय.

ही 'शिकण्याच्या पद्धतींमधील विविधता' मानसीला फारशी नीट जाणवलेलीही नाहीय. तिला हे सगळे खेळता खेळता, जगता जगता जमून गेले आहे.

अशी ही मानसीसारखी मुलगी इयत्ता नववीत गेल्यावर बहुदा काय होते? तिला बहुपदींचा गुणाकार-भागाकार तसेच भूमितीतील सिद्धता अजिबात समजत नाही. ती सिद्धता पाठ करते. तिला भौतिकशास्त्र कठीण वाटते, विज्ञान-गणितात नापास होऊ अशी भीती वाटू लागते.

असे कसे होते?

योग्य वेळी योग्य पद्धत वापरत बरोबर शिकणारा मेंदू आहे ना मानसीकडे? मग हाच मेंदू आता भूमितीतील सिद्धतेबाबत काम करेनासा कसा होतो?

की बहुपदींचा गुणाकार-भागाकार हे विषयघटक अशा मानसीसारख्या सर्वसामान्य मुलांबाबत 'मेंदूच्या पलीकडले' असतात ?

काहीतरी भानगड दिसतेय इथे आणि ती जरा नीट समजून घ्यायचा प्रयत्न करू.

माझ्या अनुभवानुसार वरील भानगडीबद्दलची माझी मते, विचार खाली दिले आहेत. वाचकांनी, पालकांनी पुढील भाग वाचताना आपले अनुभव आठवावेत व आपण सहमत आहोत का ते ठरवत वाचावे.

मानसीने शाळेत इतकी वर्षे कायकाय केले हे बघितले तर शाळेत वापरली जाणारी, वेगवेगळे विषय शिकण्याची, सामाईक अशी एक पद्धत लक्षात येईल. त्या पद्धतीचे दोन मुख्य पैलू असे आहेत-

वर्गात शांत बसून नीट ऐक. पाठ्यपुस्तकही वाच. समजत नाही? गाईड वाच किंवा कोचिंग क्लासला जा.

पाठ्यपुस्तक वाचताना सर्व समजले पाहिजेच असे नाही. परीक्षेतील उत्तरे मात्र पाठ्यपुस्तकातील भाषेतच हवीत. परीक्षेपुरता तरी धड्यातला मजकूर लक्षात ठेव.

विषय अनेक पण शिकायची पद्धत साधारणपणे एकच असा शाळेतला प्रकार आणि वेगवेगळ्या पद्धती वापरत हवे ते शिकणारा शाळेबाहेरचा मेंदू यांचे जमत नसावे असे मला वाटते.

हवे ते शिकू दे आणि ते शिकण्याची पद्धतही 'माझी मलाच' ठरवू दे, अशी मेंदूची ठाम मागणीच आहे बहुतेक.

ही मागणी पूर्ण झाली नाही तर मेंदू नीट शिकत नसणार.

हा अंदाज कसा वाटतोय? तुमचा अनुभव काय सांगतोय?

विद्यार्थी असतानाचा तुमचा अनुभव आठवा. पालक/ शिक्षक/ मुलांचा हितचिंतक या नात्याने तुमचा अलीकडचा अनुभव काय आहे ते तपासा. तुमचे अनुभव जर या अंदाजाला आधार देणारे असतील तर आपण हा अंदाज तपासून बघू.

वैज्ञानिक पद्धत वापरून असे अंदाज तपासता येतात. त्यासाठी 'शिकण्याचे प्रयोग' विचारपूर्वक करायला पाहिजेत. शाळेतील पारंपरिक पद्धतींशी हे प्रयोग बहुदा जुळणार नाहीत. त्याची चिंता करू नये. मात्र, मुलांच्या शारीरिक, मानसिक आरोग्याबाबत किंवा सुरक्षिततेबाबत तडजोड न करता हे प्रयोग करावेत. प्रयोगशील शिक्षणाचा अनुभव असलेल्या लोकांशी चर्चा करून प्रयोगाचा तपशील ठरवावा.

काही पालकांना वरचा अंदाज मान्य नसेल तर? त्यांची बाजूही समजून घेऊ. वरील अंदाज मान्य नाही असे एक पालक व प्रयोगशील शिक्षणात आस्था असलेला एक शिक्षक यांच्यात होऊ शकेल असा एक संवाद खाली दिला आहे. या पालकांच्या मुलाचे नाव चंदू आहे असे समजू. चंदू पाचवीतच आहे व पालकांच्या चिंतेचा विषय आहे. (आधीच कारटे हूड, त्यात धावे दुडदुड...)

पालक- मुलाला हवं ते शिकू द्या हा सगळा मूर्खपणा आहे. या चंद्याला असा मोकळा सोडला तर गावभर उंडारत फिरेल. शिकणार काहीही नाही.

शिक्षक- शाळेत नीट शिकतोय का?

पालक- अहो, तेच तर सांगतोय. शाळेत शिकत नाही म्हणून क्लासला घातला. तरी गणितात काठावर पास होतो कसाबसा. अशात तुम्ही म्हणताय तसा मोकळा सोडला तर हात तरी लावेल काय गणिताला?

शिक्षक- बरोबर आहे. गणित तर शिकायला पाहिजेच. त्यावर थोड्या वेळाने नक्की बोलूया. पण मगाशी तुम्ही म्हणालात की मोकळा सोडल्यावर उंडारत फिरेल म्हणून... म्हणजे कायकाय करेल?

पालक- काय वाटेल ते करेल. एकदा एका शेळीच्या मागे मागे हिंडत होता भर उन्हात. एकदा एका प्रेतयात्रेची तयारी होत होती तिथे उभा होता. एकदा कोणीतरी झाडाच्या फांद्या कापत होतं रस्त्याच्या कडेला ते बघत बसला आणि मग त्या फांद्या घरी घेऊन आला.

शिक्षक- काय केलं मग चंदूनं त्या फांद्यांचं?

पालक- त्यातली एक फांदी लावली तर झाड तयार होईल का हे त्याला बघायचं होतं आणि दुसऱ्या फांदीची त्याने बेचकी बनवली.

शिक्षक- पण हे सगळं करताना शिकतोय ना तो काहीतरी? तुम्हाला काय वाटतं ?

पालक- ठीक आहे. झाडाची फांदी तोडून बेचकी बनवायला शिकला असणार कोणाकडून तरी... पण याचा परीक्षेत काय उपयोग? आणि पाचवीचं गणित कसा शिकेल हे सगळं करत बसला तर?

'शिकेल का नाही' यावरील सर्व चर्चा शेवटी गणित, इंग्रजी अशाच विषयांपर्यंत येतात. (मराठी हा विषय 'घर की मुर्गी' असतो.) पालकांना परिसर-अभ्यास वगैरे विषयांची फारशी चिंता वाटत नसते. आणि तसे पाहिले तर तोडलेल्या फांद्या घरी आणणाऱ्या आणि प्रेतयात्रेची तयारी बघणाऱ्या चंदूचा परिसर-अभ्यास तर जोरातच चालू आहे.

चंदू शाळेत न जाता उंडारत फिरला तर गणित कसा शिकेल हा पालकांनी विचारलेला प्रश्न महत्त्वाचा आहे. आधीच्या उदाहरणातली मानसीसुद्धा शाळेबाहेर खूप काही शिकत होती पण नववीत गेल्यावर बीजगणित, भूमिती मात्र शिकत नव्हती. या भानगडीबाबत आपण केलेला अंदाज काय आहे ते आठवतंय का?

'विषय अनेक पण शिकायची पद्धत साधारणपणे एकच असा शाळेतला प्रकार आणि वेगवेगळ्या पद्धती वापरत हवं ते शिकणारा शाळेबाहेरचा मेंदू यांचे जमत नाही. मला हवे ते शिकू दे आणि ते शिकण्याची पद्धतही मलाच ठरवू दे अशी मेंदूची ठाम मागणीच आहे बहुतेक. ही

मागणी पूर्ण झाली नाही तर मेंदू शिकत नसणार.'

आता या अंदाजावर आधारित प्रयोग करायचा तर कायकाय करावे लागेल?

आपल्या अंदाजाचा एक भाग 'मला हवे ते शिकू दे' हा आहे. मग यानुसार चंदूला विचारावे लागेल की शाळेत किंवा क्लासमध्ये जे गणित तुला शिकवतात ते तुला आता, या महिन्याभरात शिकायचे आहे का?

'मित्राच्या मुलाचा वाढदिवस आहे म्हणून खरोखरच आनंदित झालेला माणूस मी कधीच पाहिला नाही' अशा अर्थाचे पु.लं.चे एक वाक्य आहे. 'उंडारत फिरण्यापेक्षा' शाळेत किंवा क्लासमध्ये गणित शिकूया, असे आवडीने म्हणणारे मूलही फारसे कोणी पाहिले नसेल.

म्हणजे गणित शिकायचे नाही असेच बहुदा चंदू सांगेल. काहीही शिकायचे नाही असेही तो सांगेल. कदाचित त्याच्या त्यावेळच्या लहरीनुसार इतर काहीतरी बोलेल. तायक्वांदो/ कराटे शिकायला आवडेल किंवा ट्रक चालवायला शिकायचे आहे असे तो म्हणेल. टीव्हीवरच्या मालिकेत काम करायचे आहे असेही कदाचित तो सांगेल. आपण सुरुवात त्याच्या आवडीप्रमाणेच करायची आहे. त्याला हवे ते शिकू द्यायचे आहे.

ठीक आहे, तू गणित शिकू नकोस, अभिनय शीक. असे चंदूला सांगून हा 'शिकण्याचा प्रयोग' करून पहावा. (शाळा बुडवायची नसेल तर हा प्रयोग दिवाळीच्या किंवा मे महिन्याच्या सुटीत करावा. सुटीत अभ्यास न देणारी शाळा असेल तर उत्तम, नाहीतर सुटीतल्या गृहपाठासाठी थोडा वेळ काढून उरलेल्या वेळात हा प्रयोग करता येईल. )

टीव्हीवरच्या मालिकेत काम करायला शिकायचे ठरलेय असे समजू. समजा चंदूला शिक्षकांनी असे सांगितले की टीव्हीवरील मालिकांमध्ये काम नाही मिळू शकणार, पण एखाद्या एकांकिकेमध्ये मिळेल आणि गावातल्या एखाद्या साध्या रंगमंचावरून ती प्रेक्षकांसमोर सादरही करायला मिळेल. एवढी तडजोड स्वीकारायला चंदू बहुतेक तयार होईल. एकांकिकेत फालतू छोटया भूमिका नको आहेत, हीरोची भूमिकाच करायची आहे अशी अट मात्र तो घालेल, ही शक्यता आहे. म्हणजे केवळ हवे ते शिकायला मिळतेय असे नव्हे तर थोडी तडजोड करून का होईना चंदूला हव्या त्या प्रकारेही अभिनय शिकायला मिळतो आहे.

आपल्या या प्रयोगात काय घडेल याचे भाकीत आधी केले पाहिजे आणि मग ते तपासून पाहिले पाहिजे. त्या भाकितानुसार घडले नाही तर कदाचित आपला अंदाज चुकीचा होता असे मानून तो अंदाज दुरुस्त करायचा का यावर विचार केला पाहिजे. नेमके भाकीत ठरवणे कठीण आहे, पण प्रयत्न करूया. या प्रयोगात काय घडेल?

चंदूला अभिनय शिकायचा आहे. त्याला हवे त्या प्रकारे अभिनय शिकू दिला तर त्यामुळेच तो गणितही शिकेल. हे विधान जरा विचित्रच वाटतेय का? थोडा खुलासा करतो.

चंदूला हवे त्या प्रकारे अभिनय शिकू दिला तर व्यक्तिमत्त्व घडवणारे एक उपयुक्त कौशल्य तर तो शिकेलच पण अभिनय शिकत असतानाच गणित शिक्षणासाठी उपयुक्त असे काही नेमके अनुभवही मिळाले तर चंदू नकळत गणितही आवडीने शिकू लागेल, निदान त्याला गणित सोपे तरी वाटू लागेल.

पटतेय का हे ? शक्य आहे असे वाटतेय का?

अजिबातच पटत नसेल तर मी सुचवतोय त्या एका साध्या शक्यतेचा विचार करून बघा. शिकण्याच्या शंभर शक्यतांपैकी एक शक्यता मी सांगतोय. मुलांचा मेंदू जगता जगता, खेळता खेळता, रमतगमत शिकत असतो. नेमके काय घडेल हे प्रयोगातूनच समजेल पण गणित शिकायच्या शंभर शक्यतांपैकी अभिनयातून गणिताकडे जाणारी ही एक शक्यता पटते का बघा.

चंदूने एकांकिकेत काम करायचे ठरवले आहे. कोणत्या एकांकिका निवडायच्या हे ठरवणे सुरू आहे. इथे शिक्षक सुचवतो की बिरबलाच्या चातुर्यकथांवर एकांकिका करूया. हिरो म्हणजे बिरबल, अर्थातच चंदू असेल.

शिक्षकाचा एक मित्रच इथे लेखक व दिग्दर्शकाचे काम करणार आहे. त्याची चंदूबरोबर भेट होते. तो चंदूला म्हणतो,

''तू बिरबलाचे काम छानच करू शकशील पण त्यासाठी थोडी तयारी कर. बिरबलाची युक्ती काय होती, त्याने नेमकी काय आयडिया वापरली हे तुला नीट कळले नाही तर अभिनय करताना तुझ्या चेहऱ्यावर ते दिसणार नाही. अभिनय खरा, सहज वाटणार नाही. म्हणून बिरबलाच्या चार-पाच गोष्टी वाच. त्यातली बिरबलाची आयडिया नीट समजली का ते बघ. मग जी कोणती गोष्ट तुला आवडली असेल त्यावर आपण एकांकिका बसवूया.''

पुस्तके वाचायची फारशी आवड नसलेला चंदू आता हीरो होण्यासाठी आणि त्यासाठी स्क्रिप्ट निवडण्यासाठी बिरबलाच्या चार-पाच चातुर्यकथा वाचतो. अभिनय चांगला जमला पाहिजे म्हणून बिरबलाने केलेली 'आयडिया' आपल्याला नीट समजली आहे ना हे स्वतःच तपासून बघतो. हे सगळे 'स्वतःलाच पडली आहे' म्हणून झालेले आहे. खूप उत्साहात, आपण हीरो झाल्याची स्वप्ने रंगवत घडले आहे. चंदूचा मेंदू कसा शंभर पद्धतींपैकी बरोबर योग्य ती पद्धत वापरत शिकायला लागला आहे.

बिरबलाच्या किंवा तेनालीरामच्या किंवा पंचतंत्रातल्या गोष्टींमध्ये कोणकोणत्या 'आयडिया' असतात?

उदा. रेषेला हात न लावता रेषा लहानमोठी करण्याची गोष्ट घ्या. इथे रेषेची लांबी, लहानमोठेपणा आहेच पण मोठेपणाची सापेक्षताही आहे. अठरावा उंट ही गोष्ट तर नियमानुसार वाटप करणे आणि अपूर्णांक या संकल्पनांवरच आधारित आहे. अशा प्रत्येक गोष्टीत तर्क आहे आणि तो कोणतीतरी समस्या सोडवायला वापरला आहे. समस्या सोडवणारा हीरो आहे आणि

ही हीरोगिरी समजली तर नेमका विचार कसा केला ही गंमतही वाचकाला समजते आहे.

बिरबलाच्या गोष्टी वाचून उत्साहात अभिनयाची तयारी करतानाच चंदूची तर्काची समजही विकसित होऊ लागली आहे. आता गणिताचा गाव काही फार दूर राहिलेला नाही.

वाचनाची आवड असती तर वाचता वाचताच हे घडू शकले असते. घरी गोष्टी सांगणारी आजी असती तर बिरबलाच्या गोष्टी ऐकता ऐकताही हे होऊ शकले असते. चंदूसारख्या काहीजणांच्या बाबत अभिनय करताना हे घडेल, इतर काहीजणांना सायकल दुरुस्त करताना विचार करून समस्या सोडवायची गंमत कळेल तर काहीजणांना गॅलरीतली शेती करताना गणित-विज्ञानाची समज येईल.

शंभर शक्यता असू शकतील. शाळेत शिकत नाही अशा एका मुलाबरोबर यातली एक तरी शक्यता तपासणारा प्रयोग करणार का तुम्ही? असा काही प्रयोग आधीच केला आहे का? तर कळवा त्याबद्दल आम्हाला.

'शिकण्याचे प्रयोग' करूया. 'शिकण्याच्या शंभर शक्यतांचा' अनुभव घेऊया.

**सुबोध केंभावी**
subkem@gmail.com
9819144898



*With Best Compliments From*

**Aarti Industries**

**K. D. Paygude**

**Ph. : 020-24394829, Mob.: 9822029565, aarti.industries1995@gmail.com**

**Engineering & Fabrication Precision Job Works,**

**Sr. No. 36/1/1, Sinhagad Road, Near Lokmat, Opp. Mixing Concrete Plant,**
**Beside Maruti Services Station, Wadgaon Kh., Pune-41.**

*With Best Compliments from*

**Kumbhar Sudhir Dinkar**

'Rutugandh'
Samata Nagar, Sr. No. 23/2/4 Ambegaon Bk.,
Pune - 411 046



# हत्तीचं वजन

**मधुरा राजवंशी**

मधुरा राजवंशी गेली सात वर्षे प्रगत शिक्षण संस्थेमध्ये काम करत आहेत. इंग्रजी व गणित विषयाच्या अध्यापनासोबतच संस्थेच्या व्यवस्थापनात त्यांचा महत्त्वाचा सहभाग आहे. तसेच 'पालकनीती'च्या संपादक मंडळाच्या त्या सदस्य आहेत. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस येथून त्यांनी एलेमेंटरी एज्युकेशन मध्ये एम ए केले आहे.



*कोणे एके काळी एक राजा होता. एकदा दूरच्या एका राज्याकडून त्याला एक भेट मिळाली- एक हत्ती. राजानं आणि त्याच्या प्रजेनं पूर्वी कधीच हत्ती पाहिलेला नव्हता. ते भलमोठं अवाढव्य धूड बघून सगळेच अचंबित झाले. या विचित्र प्राण्याचं वजन किती असेल असा प्रश्न राजाला पडला. त्यानं दरबाऱ्यांना विचारलं, याचं वजन कसं करायचं ते सांगा. सगळे एकमेकांकडे बघायला लागले. कुणालाच माहीत नव्हतं काय करायचं ते. हत्तीचं वजन करता येईल एवढे मोठे तराजूच राज्यात नव्हते. शेवटी राजाचा छोटा मुलगा पुढे आला आणि म्हणाला,*

*''बाबा, मी करू शकतो हत्तीचं वजन.''*

*''तराजूविना?'' प्रधानानं विचारलं.*

*''हो, तराजूविना,'' राजपुत्र म्हणाला.*

*राजानं आपल्या छोट्या मुलाकडे पाहिलं, ''कसं करणार आहेस बाळा तू वजन?''*

ताई वाचायच्या थांबल्या. अकरा–बारा वर्षं वयाची पस्तीसेक टाळकी त्यांच्याकडे उत्सुकतेनं बघत होती. ''तुम्हाला काय वाटतं, कसं केलं असेल त्यानं वजन हत्तीचं?'' धडाधडा हात वर झाले.

''मोठ्या वजनकाट्यावर ठेवायचं, ताई.'' ''अरे पण गोष्टीत सांगितलंय ना की त्या काळी इतके मोठे वजनकाटे नव्हते म्हणून.''

''ताई, मी सांगतो'', प्रसाद म्हणाला. ''एका मजबूत दोरखंडाला हत्ती बांधायचा. तो दोरखंड एका लोखंडी सळईवरून पलीकडे टाकायचा. दुसऱ्या बाजूला पोतं बांधायचं आणि त्याच्यात दगड टाकत राहायचे.''

''पण इतकी मजबूत सळई त्यांना कुठून मिळणार? त्यापेक्षा डोंगराचा असा बाहेर आलेला सुळका असतो ना, तिथे हे करायचं'', बुशरानी शक्कल लढवली.

''सी–सॉ!'' आर्याला सुचलं. ''एका बाजूला हत्ती आणि दुसऱ्या बाजूला माणसं किंवा दगड.''

''ताई, अंदाजे सांगायचं वजन.'' अपर्णा म्हणाली. सगळ्यांना हसू आलं. हा विचार कुणाच्याच डोक्यात आला नव्हता. ''चांगली कल्पना आहे ही, अपर्णा!'' ताई म्हणाल्या.

सानिकाचं म्हणणं होतं की हत्तीच्या







पाठीवर माणसं बसवत जायची, त्यांच्या वजनानं हत्ती खाली बसेपर्यंत. ताईंच्या डोळ्यासमोर हत्तीच्या पाठीवर एकावर एक टाकलेल्या माणसांचा ढीग उभा राहिला. (ओंकारनं मात्र चित्र काढताना छान दहीहंडीच्या मनोऱ्यासारखी एकावर एक उभी असलेली माणसं काढली.)

''हत्तीला रस्सी बांधायची आणि त्याला ओढायला किती माणसं लागतायत ते बघायचं,'' सिद्धेश म्हणाला.

मघापासून गप्प बसलेला परीक्षित एकदम कळवळून म्हणाला, ''अरे त्या बिचाऱ्या हत्तीचं काय होत असेल याचा कुणी विचारच करत नाहीये.'' ''थँक यू परीक्षित, हा विचार केल्याबद्दल!'' ताईंनी त्याच्याकडे कौतुकानं पाहात म्हटलं.



पण याचनंतर श्रुतीनं सुचवलेला उपाय तर आणखीनच क्रूर होता. हत्तीचे तुकडे तुकडे करून त्यांचं वजन करायचं म्हणे! पण ठीक आहे. तिच्या कल्पनेलाही क्रेडिट देणं भाग होतं. जिवंत हत्तीचंच वजन केलं पाहिजे असं कुठेच म्हटलं नव्हतं.

''वा! फारच भारी भारी कल्पना आहेत तुमच्या! पण राजपुत्रानं यातली कुठलीच नाही वापरली. त्यानं वेगळंच काहीतरी केलं,'' असं म्हणून ताईंनी पुढे वाचायला सुरुवात केली.

*''सोपं आहे,'' राजपुत्र म्हणाला, ''हत्तीला एका मोठ्या नावेत बसवा आणि नाव पाण्यात किती खोल बुडते ते बघा. जिथपर्यंत बुडेल तिथे खूण करा. मग हत्तीला किनाऱ्यावर आणा. आता त्या नावेवर जिथं खूण केली आहे तिथपर्यंत ती बुडेपर्यंत तिच्यात मोठे दगड भरा. मग त्या एकेका दगडाचं वजन करा. जे दगडांचं एकूण वजन तेच हत्तीचं वजन!''*

मुलांचे डोळे विस्फारले होते. मस्तच आयडिया! दगडांचा उपयोग करून घ्यायचा हे त्यांना सुचलं होतं मात्र पाण्याच्या वापराबद्दल कुणाच्या डोक्यातच नव्हतं आलं. पण त्यांना याची कसली खंत? आपल्याला कसं काय हे सुचलं नाही, अशा फुटकळ गोष्टींचा त्रास करून घेत नाहीत पोरं. उलट आमची डोकी कसली भन्नाट चालली, असं म्हणून ती दिवसभर खुश होती!



**मधुरा राजवंशी**
rmadhuraa@gmail.com
8275369702

रेखाटने: ओंकार राऊत, इ. ६ वी, कमला निंबकर बालभवन

WITH BEST COMPLIMENTS FROM

# ENPRO INDUSTRIES PVT. LTD.

**DESIGNERS & MANUFACTURERS OF :-**

**Water Wash Units**
**Air Processing Units**
**Lube Oil Consoles**
**Fuel Forwarding & Filtering Units**
**Chemical Injection Packages**
**Heat Exchangers**

**ADDRESS :**

UNIT-1
12/4. D-l Block, M.I.D.C.,
Chinchwad, Pune, Maharashtra, India, PIN - 411 019.

UNIT - 2 (100% EOU )
A-17, H-Block M.I.D.C,
Pimpri, Pune, Maharashtra, India, PIN - 411 018.

TELEPHONE : **(020) 56113666,27472157** FAX : **(020) 27470909**
EMAIL : enpro@vsnl.com. enproind@eth.net Visit us at: www.enproindia.com

PRESTIGEOUS CUSTOMERS
**GE POWER SYSTEMS, USA & EUROPE**
**NUOVO PIGNONE, ITALY,**
**ALSTOM POWER, EBARA, SHIN NIPPON & HITACHI, JAPAN; SULZER PUMPS, GERMANY**
**BHEL, T. D. POWER SYSTEMS, LARSEN & TOUBRO, KSB, RELIANCE**

*ENERGY AND PROCESS ENGINEERS*



# वंचित समाजातील मुलांच्या ऊर्जांना वाव हवा

**राजन इंदुलकर**

राजन इंदुलकर, यांचे राज्य व राष्ट्रीय स्तरातील 'शोषित जन आंदोलन', 'जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय', 'विकास सहयोग प्रतिष्ठान', 'राष्ट्रीय निवारा अधिकार अभियान', 'आम्ही चिपळूणकर' इ. लोक चळवळींत योगदान राहिले आहे. १९८४ साली राष्ट्रीय सेवादलाच्या प्रेरणेतून त्यांनी श्रमिक सहयोग संस्थेची सुरुवात केली. शिक्षण पद्धतीमध्ये त्या त्या समाजांच्या सांस्कृतिक सामर्थ्याचा तसेच मुलांतील उपजत क्षमतांचा उपयोग करण्यावर श्रमिक सहयोगचा भर आहे. संस्थेच्या माध्यमातून कातकरी- आदिवासी व गवळी- धनगर समाजांच्या वस्त्यांवर अनौपचारिक शिक्षण केंद्रे चालवली जातात.

आ आपल्याकडील शाळांमध्ये मुलांना व्यक्त होण्याची संधी मिळणे हे एक मोठे आव्हान असते. त्यासाठी तशी मोकळीक मिळणे गरजेचे असते. शाळांतून तसे घडत नाही. तेथे शिस्तीच्या, एकसारखेपणाच्या वातावरणात मुले कोंडलेली असतात. शिवाय शाळा ही गर्दीची जागा असते. शाळेत, वर्गात मुलांची संख्या कमी असणे ही बाब शासनाला, शाळा-चालकांना पटणारी, परवडणारी नसते. त्यामुळे गर्दीला आवरण्यासाठी निर्माण केलेली कडेकोट बंदोबस्तातील सैनिकी शिस्त, एकसारखेपणाचा हट्टाग्रह (युनिफॉर्म, टाय घालणे, रांगेत बसणे, उठणे इ.) अशा कृत्रिम वातावरणात बरीचशी मुले भांबावलेली असतात, दडपणाखाली राहतात. त्यातही शाळेतील अशा प्रकारच्या औपचारिक वातावरणाला सरावल्या नसलेल्या मुलांचे काय होत असेल त्याचा विचारच न केलेला बरा. आपण येथे नैसर्गिक वातावरणात वाढणाऱ्या वनस्पतीचे उदाहरण घेऊ. ही वनस्पती तिच्या स्वतःच्या वातावरणात असेल तर 'बी' च्या रूपापासून तिचे अंकुरणे अगदी सहज घडू शकते. वादळ, प्रलय, दुष्काळ अशा आपत्तीतून बचाव झाला तर हे अंकुरणे, पसरणे, फुलारणे सारे काही विना अडथळा घडते. तीच वनस्पती निसर्ग राखणे परवडणारे, पटणारे नसल्याने लोक घरात आणून कुंडीत वाढवितात आणि तिचे संगोपन केल्याचा आनंद मिळवू पाहतात. तेव्हा त्या अनैसर्गिक कुंडीत, वातावरणात वनस्पतीचे काय होत असेल? ती फुलल्यासारखी दिसत असली तरी तशा फुलण्यात नैसर्गिकता नसते, तिच्या अंगीभूत क्षमताना वाव मिळालेला नसतो. आपल्या शाळातून मुलांबाबत नेमके असेच घडत असते.

अर्थात शाळा ही समाजाच्या अपेक्षा, नको ती रिस्क नको असे त्यांना सतत वाटत असते. मुलांनी चाकोरीने, मळलेल्या वाटेने मोठे व्हावे असा हा विचार-प्रवाह असतो. शिवाय आपल्या मुलांनी मोठे व्हायचे म्हणजे आर्थिक स्थैर्य प्राप्त करायचे अशी



आशा-आकांक्षाचे प्रतिबिंब असते. आपल्या समाजालाही मुलांनी मुक्तपणे, नैसर्गिकपणे वाढण्या-फुलण्याची कल्पना मंजूर नसते. व्यवस्थेच्या बंदिस्तपणात, विकासाच्या फेऱ्यात समाजाचा, पालकांचा भर मुलांना बोन्साय करण्यावर, चाकोरीत बांधून ठेवण्यावर असतो. मुलांच्या स्वतःच्या कलाने फुलण्याकडे ही मोठी मंडळी एक मोठा धोका म्हणून पाहतात. एक मजबूत धारणा पालकांची असते. अशा धारणेमागे आपल्या समाजातील अस्थैर्य कारणीभूत आहे हेही तितकेच खरे आहे. पण त्यामुळे आर्थिक स्थैर्याला पर्याय नाही आणि ते मळलेल्या वाटेनेच प्राप्त होते अशी चाकोरी तयार होते. ही मळलेली वाट सोडून आपले मूल आडवाटेने जाऊ लागले तर ते खड्‌ड्यातच जाणार अशी भीती पालकांच्यात निर्माण झालेली असते.



शिवाय जोडीला संस्कार ही एक आणखी मोठी चकवा देणारी बाब असते. मुलांच्या मनात चिरंतन मानवी मूल्यांची रुजवात करणे, त्यांना भल्या-बुऱ्यातील योग्य निवड करण्याची समज येऊ देणे म्हणजे संस्कार हे खरे तर अपेक्षित आहे. पण संस्काराच्या नावाखाली जे काही चालते ते भयंकर असते. ज्यात धार्मिक, वांशिक, लिंगाधारित भेदा-भेदाची, अंधानुकरणाची रुजवातच अधिक असते. मुलांवर शाश्वत जीवन मूल्यांचे संस्कार करण्याऐवजी रूढी-परंपरेने जे काही चालत आले असते ते जसेच्या तसे पाळणे म्हणजे संस्कारित होणे अशी चौकटबद्ध व्यवस्था स्वीकारली जाते. जेथे केवळ अनुकरणावर भर असतो. प्रश्न निर्माण होणे, विचारणे याला बंदी असते. आम्ही म्हणतो तेच अंतिम अशी लक्ष्मणरेषा आखून दिलेली असते. अशा बोन्साय अवस्थेत मुलांचे, विशेषतः मुलींचे काय होत असेल याचा अतिशय गांभीर्याने विचार व्हायला हवा. असे पिंजरे मध्यमवर्गीय घराघरात बसविलेले असतात. शाळा हा तर एक खूप मोठा पिंजरा असतो ज्यात कोंडल्यावर मुलांची चेंगरा-चेंगरीच शक्य असते जी आजपर्यंत आपण अनुभवत आलो आहोत.

### वंचित समूहातील मुले

या पार्श्वभूमीवर आपण वंचित, शोषित, सर्वहारा समाज-समूहातील मुलांच्या अभिव्यक्तीचा विचार करणार आहोत. हा विचार अर्थात आम्ही गेली २५ वर्षांपासून करीत असलेल्या कामाच्या अनुभवावर आधारलेला आहे. ही मुले मध्यमवर्गापेक्षा खूपच वेगळ्या वातावरणात वाढत असतात. रोजचे पोट हातावर असते. या जगण्याच्या संघर्षामुळे मुलांमध्ये कणखरपणा निर्माण झालेला असतो. शिवाय संस्कारांचे ओझे डोक्यावर नसते. अर्थात ही स्थिती विविध वंचित समाजांमध्ये कमी-अधिक प्रमाणात वेगवेगळी असते. ज्यांना आपण आदिम समजतो अशा कातकरी समाजात संस्काराचा बंदिस्तपणा मूलतः नसतोच. जो काही असतो तो भोवतालच्या तथाकथित पुढारलेल्या समाजाकडून प्रवाहित झालेला असतो. या समाजातील मुलांचे वाढणे मोकळे-ढाकळे असते. अगदी निसर्गातील घटकांसारखे. मनात येईल ते करावे, आपल्या आवडी-निवडीप्रमाणे जगावे अशी मोकळीक त्यांच्या रोजच्या जगण्यातून साकारलेली असते. आई-वडील, भावंड, वाडीसमूह यांच्या वागणुकीचे कळत-नकळतचे जे काही परिणाम या मुलांवर होत असतात त्याला आपण संस्कार म्हणू शकतो. या पलीकडे स्वतंत्रपणे संस्कार केले जात नाहीत. अशा मोकळ्या वातावरणात असुरक्षिततेचा, वाईट वळणाचा धोका असतोच. पण तो सामूहिक जीवन-पद्धतीपासून तुटले गेल्याचा दर्शक असतो. या आदिम समाजाच्या मूळ जीवनशैलीत भल्या-बुऱ्याच्या नियमनाची व्यवस्था आहे. जी अलीकडे लोप पावत चालली आहे. त्यामुळेच असे धोके वाढत चालले आहेत.

अशा वाढण्यात पुढे पुढे मर्यादा येतात त्या परिस्थितीमुळेच. कारण अशा मोकळ्या वाढण्याला बाह्य समाजात फारसा वाव नसतो. त्यामुळे बाह्य सामाजिक वातावरणाची बंधने या मोकळेपणावर प्रभाव टाकतात. शिवाय अनेक वर्षांपासून वाट्याला आलेले वंचितपण, मागासलेपण या मोकळेपणाला वेसण घालीत जाते. त्यातून भरकटलेपण, शोषण माथ्यावर येऊन बसते. व्यसने, गुन्हेगारी हे शत्रू बस्तान बसवितात. हे जरी खरे असले तरी मुलांना व्यक्त व्हायला, आपल्यातील मूलभूत प्रेरणांना बाहेर काढायला पुढारलेल्या, पांढरपेशा समाजापेक्षा या समाजात अधिकचा वाव असतो हे मात्र खरे. पण हे झाले शाळेबाहेरचे वाढणे. शाळेतील शिक्षण अनिवार्य झाल्यामुळे या मुलांच्या मोकळ्या वातावरणातील वाढण्यावर मर्यादा येतात. कारण ही शाळा त्यांची नसते. शाळा ही व्यवस्था पांढरपेशी, मध्यम, उच्च मध्यम-वर्गीयांच्या अनुभवांवर, गरजांवर, आशा-आकांक्षांवर बेतलेली असते. अशा शाळेत गेल्यावर एक तर तेथील व्यवस्थेत आपल्यातील उपजत ऊर्जांना वेसण घालून सामील व्हावे लागते. नाही जमले तर बाहेर पडावे लागते. म्हणून गरज आहे ती शाळा नावाच्या व्यवस्थेतील आमूलाग्र सुधारणेची. शाळा ही जर मुलांच्या अभिव्यक्तीचे स्थान असेल तर त्याची रचना मुलांच्या गरजांवर, मूलभूत प्रेरणांवर बेतलेली असायला हवी. पालकांच्या किंवा समाजाच्या नाही. अर्थात ही बाब विचार म्हणून सोपी वाटत असली तरी प्रत्यक्ष अंमलात आणण्यास कठीण आहे, तरीसुद्धा महत्त्वाची आहे, म्हणून त्या दिशेने केल्या जाणाऱ्या प्रयोगांना महत्त्व आहे.

### प्रयोगभूमीतील अनुभव

कोकणातील 'श्रमिक सहयोग' हा गट अशा शाळेचा, शिक्षणाचा वेध घेण्याचे काम गेली २० वर्षे करीत आहे. या कामाच्या पहिल्या टप्प्यात संस्थेने चिपळूण तालुक्यातील सह्याद्रीच्या शिखर रांगांवर

विखुरलेपणाने राहणाऱ्या गवळी-धनगर या समाजाच्या वस्त्यांवर अनौपचारिक शाळा चालविल्या. या शाळांमार्फत या समाजातील पहिली पिढी शिक्षणाशी जोडली गेली. त्यानंतर अलीकडील दहा वर्षांपासून संस्थेने कोळकेवाडी या सह्याद्री पर्वताच्या कुशीतील गावात एक अनौपचारिक निवासी शिक्षण केंद्र चालविले आहे. येथे भोवतालच्या कातकरी-आदिवासी आणि गवळी-धनगर या दोन वंचित समाजातील ३०-३५ मुले-मुली या 'प्रयोगभूमी' शिक्षण केंद्रात राहून शिकतात. ही जागा म्हणजे या निसर्गात राहणाऱ्या, वावरणाऱ्या मुलांना आपले स्वतःचे असे वातावरण आहे. भोवताली डोंगर-दऱ्या, जंगल, नदी असे निसर्गसंपन्न घटक आहेत. येथे मुलांनी मोकळेपणाने वावरावे, वाढावे असे वातावरण आहे. परिसर, शाळेचे स्वरूप या सगळ्यात हे मोकळेपण पसरलेले आहे.

या प्रयोगभूमीला शाळा म्हटले जात असले तरी ही काही औपचारिक शाळा नाही. या शाळेला अपौचारिक स्वरूप द्यावे की न द्यावे याबाबत निर्णय घेण्यापूर्वी भोवतालच्या शासनमान्य, शासकीय आश्रमशाळांची पाहणी करण्यात आली. या पाहणीतून असे लक्षात आले की, या आश्रमशाळात नियमित शाळांसारखाच बंदिस्तपणा असतो. प्रत्यक्ष काम करणाऱ्यांना, राहणाऱ्या मुलांना स्वातंत्र्य नसते. मग स्वतःचे असे नियम ठरवून, विना-तडजोडीची मूल्ये ठरवून प्रयोगभूमीचे स्वरूप ठरविण्यात आले. अर्थात असे नियम आधी न ठरविता दैनंदिन अनुभवातून विकसित होत गेले. आणि महत्त्वाचे म्हणजे नियम ठरविताना या चर्चेत, निर्णयप्रक्रियेत मुलांचा मुख्य सहभाग होता, आहे. नियमित होणाऱ्या दैनिक बैठकीत प्रयोगभूमीच्या कारभाराचा आढावा घेतला जातो. ही बैठक अर्थात शिक्षक- कार्यकर्ते, मुले या सर्वांची मिळून असते. शाळेच्या व्यवस्थापनात आणि निर्णयात मुलांचा सहभाग ही बाब येथे महत्त्वाची आहे. त्यामुळे मुलांमध्ये जबाबदारीचे भान आपसूकच येत जाते असा आमचा अनुभव आहे.

पाच-सहा वर्षांपूर्वी मुलांची पहिली फळी जेव्हा येथे रुजत होती तेव्हा मुलांमध्ये कुटुंबातील प्रतिकूल वातावरणातून निर्माण झालेल्या काही सवयी शिक्षक-कार्यकर्त्यांच्या लक्षात येत होत्या. त्याबाबत मुले एकमेकांबद्दल अनेक तक्रारी करीत. यातून मार्ग काढण्यासाठी सामूहिक निर्णयाचे तंत्र उपयोगी पडले. 'मी एक चांगला नागरिक होईन, आम्ही आमची शाळा आदर्श करू' अशी संकल्पना समोर ठेवून हे काम झाले. हे करताना मुलांना विचार करण्याची, निर्णयाची मोकळीक, संधी मिळाली तर ती कशी व्यक्त होतात, त्यांच्यातील समजेचा दर्जा काय असतो याची प्रचिती आली. ही चर्चा दोन पातळ्यांवर चालत असे. पहिले म्हणजे गटात. हा गट दोन-दोन मुलांचा असे. या दोघात एकजण लिहू शकणारा असावा असे ठरले. मग प्रत्येक मुद्द्यावर या गटातून चर्चा झाली की सर्व मुले एकत्र येऊन बसत आणि सामूहिक चर्चा घडे. इतर वेळी शिक्षकांनी प्रश्न विचारल्यावर हूं की चूं न करणारी मुले अशा चर्चेत मोकळी होत गेली. सुरुवातीला मुलांनी 'नागरिक' या शब्दाबद्दल खल केला. मग या उपक्रमाच्या शीर्षकात 'नागरिक' ऐवजी 'माणूस' हा शब्द मुलांकडून निश्चित करण्यात आला. 'आदर्श' म्हणजे काय हे ठरविताना आपल्यात जे अवगुण आहेत ते काढून टाकणे म्हणजे आदर्श होणे अशी व्याख्या करण्यात आली. मग या अवगुणांची यादी झाली. शिव्या देणे, अस्वच्छ राहणे, परिसराची सफाई न करणे, रात्री उशिरा झोपणे, सकाळी उशिरा उठणे, जास्त मस्ती करणे, झटकन राग येणे, राग आल्यावर दुसऱ्याला जोरात लागेल असे मारणे, पाठीत न मारता डोक्यात मारणे, दैनंदिन कामात टंगळ-मंगळ करणे अशी भली मोठी यादी झाली. असे अवगुण आपल्यातून दूर झाले तरच आपण चांगले माणूस बनू, आपली शाळा आदर्श बनेल हे सूत्र पुढे आले.

पुढील टप्प्यात या साऱ्या अवगुणांवर गटात व एकत्रित चर्चा होत गेली. आपण सहजपणे ज्या शिव्या देतो त्या लिहून काढून त्यांचे अर्थ समजून घेण्यात आले. त्यामुळे शिव्या किती वाईट असतात हे मुलांच्या लक्षात आले. असे प्रत्येक मुद्द्यावर काम होत-होत मुलांनी आपल्या शाळेची नियमावली तयार केली. तिला घोषणांचे रूप देण्यात आले. 'आम्ही शिव्या मनातूनही काढून टाकल्या आहेत', 'आम्ही रोज सकाळी उठून आपले पोट साफ करण्याचा प्रयत्न करतो', 'आम्हाला काम करायला आवडते', 'आम्ही आमचा परिसर, आमची शाळा दररोज स्वच्छ ठेवतो', 'आम्ही नेहमी नीटनेटके राहतो', 'आमचे जग सुंदर आहे, ते आणखी सुंदर करण्याचा आम्ही नेहमी प्रयत्न करू' अशा घोषणा रोजचा परिपाठ झाल्या, ज्यांची निर्मिती मुलांनी सामूहिक चर्चेतून, सर्व-सहमतीने केली. यातून मुलांना योग्य संधी मिळाली तर ती आपल्या विचारांच्या कक्षा रुंदावू शकतात आणि त्याद्वारे आपल्या वागणुकीला स्वतःच



आकार देऊ शकतात, त्यासाठी मोठ्यांची धाक-दपटशा, नियम-शिस्त वगैरेची गरज राहत नाही हे आमच्या लक्षात आले. पुढेपुढे मुलांना 'हे करा रे, ते करू नका रे' असे सांगण्याचा मुद्दाच संपून गेला. मुलांच्या मनामध्ये शाळेबाबतचे आपलेपण (ओनरशीप) निर्माण झाले. स्वतःबाबतचे रास्त भानही आले.

ही शाळा चालविताना या समाजातील तसेच इतर ठिकाणचेही अनुभव सोबत घेण्यात आले. 'गोटूल'सारख्या पारंपरिक शिक्षणव्यवस्थेतील मूल्यविषयक संदर्भ अभ्यासण्यात आले. हा अभ्यास अर्थात अविरत चालू आहे. महाराष्ट्रातील काही गट/व्यक्तींनी एकत्र येऊन चालविलेल्या 'गोटूल' अभ्यास प्रक्रियेची त्यासाठी मदत होत आहे. मुलांमधील उपजत प्रेरणा, आवडी-निवडी यांना धक्का न लावता त्यांनी समूहात राहून वाढावे, शिकावे अशी प्रयोगभूमीतील रचना आहे. शिकण्यातील औपचारिकतेला फाटा देऊन हे शिकणे सहज जगण्याचा भाग म्हणून घडावे असा प्रयत्न आहे. अर्थात पुढे जाऊन मुलांना समाजाच्या व्यापक अवकाशात वावरावे लागणार आहे याचे पुरेसे भान यावे अशी काळजी घेतली जात आहे. तशी तयारीही करून घेतली जात आहे, मोठेपणाचे जोखड खांद्यावर न ठेवता.

प्रयोगभूमीत कातकरी समाजातील मुलांचा प्रामुख्याने समावेश आहे. कातकरी ही महाराष्ट्रातील तीन निर्देशित आदिम जमातींपैकी एक आहे. उर्वरित माडिया-गोंड आणि कोलाम या दोन जमाती विदर्भातील आहेत. आदिम समाजात स्वतःची अशी सांस्कृतिक रचना आहे. ही रचना बाहेरील बदल सहसा स्वीकारत नाही. जे काही बदल स्वीकारले जातात ते वरपांगी असतात. म्हणजे भौतिक साधनांचा सर्रास वापर होतो मात्र स्वतःच्या जीवनाविषयीचा दृष्टिकोन, धारणा कायम असते. जसे की, कातकरी समाजाच्या मानसिकतेत संचयाला स्थान नाही. रोजचे कमवावे नि रोजचे खावे असा विचार केला जातो, फार दूरचा विचार केला जात नाही. ही मानसिकता मुलांमध्येही खोलवर रुजलेली असते. त्याचा चांगला परिणाम असाही असतो की, मुले त्या त्या क्षणाला सुचणारी, भावणारी कृती अतिशय उत्स्फूर्तपणाने करू शकतात. मुलांच्या अशा मानसिकतेचा सकारात्मक उपयोग त्यांच्या विकासात सूज्ञपणे करता येतो असा आमचा अनुभव आहे. मानसिकतेतील बदल ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया असते. असे बदल सकारात्मक रीतीने होण्यासाठी सभोवतीचे वातावरण अशा बदलांस पूरक असावे लागते. प्रयोगभूमीत अशा बाबींवर सखोल कृती-प्रवण चिंतन होत असते.

**शैक्षणिक गुणवत्ता**

या मुलांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता निर्माण व्हाव्यात यासाठी बारकाईने काम करावे लागते. पण ते करताना मुले खुलेपणाने कशी व्यक्त होतील, बोलतील हे पाहावे लागते. या प्रक्रियेत मुख्य भाग आहे तो मातृभाषेचा. ही मुले कुटुंबात, वाडीत त्यांच्या मातृभाषेतच वावरत, व्यक्त होत असतात. कातकरी समाजाची मातृभाषा आहे 'काथोडी', तर धनगर समाजाची 'धनगरी'. काथोडी भाषेत स्वतःचा असा शब्दासाठा आहे. धनगरी भाषेत लय, सूर याबाबतचे अधिकचे वेगळेपण आहे. ही मुले शाळेत आली की, प्रथम ही शाळा त्यांना आपल्या घरासारखी, परिसरासारखी आहे, म्हणजे आपल्या स्वतःच्या वातावरणापेक्षा वेगळी नाही अशी जाणीव रुजावयास हवी असते. तसे झाले तर ती सुरुवातीलाच मोकळी होत जातात. त्यांच्या मनावर शाळेबाबतचे नवखेपणाचे दडपण राहत नाही. आधीपासून येथे असलेली मुले त्यांच्याशी, एकमेकांशी आपल्या मातृभाषेत बोलत असतात. शिक्षकही या मुलांशी त्यांच्या मातृभाषेत संवाद साधत असतात. त्यामुळे प्रत्येक मूल सहजच इतर सर्वांशी खुलेपणाने देवाण-घेवाण करू लागते. म्हणजे पहिली पायरी असते या मुलांच्या दडपणाशिवाय वावरण्याची. आपल्या मातृभाषेत सहजपणे व्यक्त होण्याची.



भाषा शिक्षणात सुट्या-सुट्या अक्षरांना काहीच अर्थ नसतो. दैनंदिन वापरातील शब्द, या शब्दामागचे तीव्र अनुभव यातून अक्षरांचा वेध घ्यावा लागतो. क = कुकडी (कोंबडी), अ = आनज (जेवण), अ = आयेस (आई), ब = बाहास (बाबा), न = नय (नदी), च = चिडा (चिमणी) अशा भावविश्वात खोलवर रुजलेल्या शब्दांच्या उच्चारणातून अक्षरांची ओळख अधिक घट्टपणे मनात रुजते. रंगांची ओळख दूध, दात =पांढरा, केस = काळा, पान = हिरवा, रगत = लाल अशा जवळीकीतून होते. चवींची ओळख साखर, कांदा, चटणी या पदार्थांतून होते. बऱ्याच मुलांना माडीच्या तुरटपणाचा, दारूच्या कडवटपणाचा परिचय झालेला असतो. त्यातून त्यांच्या घरातील वातावरणाचा अंदाज शिक्षकांना येतो. अशा चर्चेतून गमती-जमती होतात. मुलांना ते आवडते. त्यातून हळूहळू जाणिवा अंकुरत जातात, भल्या-बुऱ्याची समज येत जाते. वयाच्या सहाव्या वर्षी शाळेत दाखल झालेल्या एका मुलाला घरात जेवण करण्याचा, भांडी घासण्याचा अनुभव होता. शिवाय वेगवेगळ्या प्रकारच्या मद्यांच्या चवीतील फरक माहीत होता. घरातील पालक हे मद्य पितात. ते प्यायल्यानंतर घरात जे काही भांडण-तंटे होतात त्यांचा कडू अनुभव असतो. मात्र त्याचा अर्थ माहीत नसतो.

शिक्षकांबरोबरच्या चर्चेतून तो उमगत जातो. भाषा-शिक्षणात हे अनुभव व्यक्त होताना भाषा-शिक्षण सहजी घडत जाते.

अंकज्ञानात दगड, पाने, काटक्या, मणी यांची मोजमापे, लांब दूरच्या अंतराचा परिचय, जाडी, टणकपणा, नरमपणा, स्वतःची उंची, समानता यांचा परिचय होतो. लहान मुलांना घरात आपण ब्यारका (लहान) असल्याने चार तर मोठया भावंडाना दोन-दोन बिस्किटे मिळण्याचा अनुभव असतो. मुलांचे घरातील परिसरातील अनुभव हा ठेवा असतो. त्यावर त्यांची स्वतःची मालकी असते. या 'माझे'पणातून शैक्षणिक गुणवत्तांची बांधणी सहज घडत जाते. या मुलांकडे असलेल्या अनुभवांच्या आधारे शालेय गुणवत्ता संपादित करण्याची गरज त्यामुळेच अधोरेखित होते.

**वर्तन-बदल**

मुलांचे अनुभव खूप काही सांगत असतात. कुणाच्या घरी बाहास(बाबा)सह राहताना तो आपल्यासाठी मटन आणतो, स्वतः मात्र खात नाही, यातून बाबाच्या मायेचा ओलावा उमगत जातो. तो ओलावा स्वभावात झिरपत जातो. कुणाकडे जंगलात झोपडीत राहताना बाहास चार-चार दिवस येत नाही, आयेस रात्री उशिरा येते. तोपर्यंत धाकट्या भावंडाना सांभाळावे, जेवू-खाऊ घालावे लागते. त्याचा कंटाळा आलेला असतो. त्यामुळे कामात संथपणा आलेला असतो. शाळेत मात्र इतर मुले, शिक्षक भराभर कामे करतात ते पाहून आश्चर्य वाटते. आणि मग मनात चपळपणाची रुजवात होते. कुणाला आयेस, बाहासच्या अनुपस्थितीत धाकट्या भावंडांना सांभाळताना त्यांच्यावर खेकसण्याची, रागात हातात जे असेल ते मारण्याची सवय लागलेली असते. शाळेत त्याची पुनरावृत्ती झाली की, इतर मुले हसतात, त्याचा मग आणखीच राग येतो. अशावेळी अशा खेकसण्याने आपलाच आवाज कर्कश्श होईल अशी समजूत शिक्षकांनी घातल्यावर कालांतराने अशा रागीट मुलीच्या स्वभावात कमालीचा समजूतदारपणा येत जातो.



शाळेत मुले, शिक्षक मित्रत्वाच्या नात्याने वावरतात. अशा समानतेच्या नात्यातून मुलांमध्ये सहज मोकळीक निर्माण होते. मुले शिक्षकांशी अगदी खुलेपणाने बोलतात, व्यक्त होतात. समूहातील अशा मोकळया वातावरणाने मुलांमध्ये समंजसपणा आपसूकच येत जातो. वाईट वर्तनातून परस्परांचा तोटा तर चांगल्या वर्तनातून परस्परांचा फायदा आहे, हे न सांगताच कळत जाते. मुलांच्या वर्तनबदलातील हे बारकावे टिपणे, असे बदल कला-कलाने, समजे-उमजेतून घडण्यास अवकाश निर्माण करणे हे शाळेचे काम असते. तसे न घडले तर मुलांच्या स्वभावातील तरलता कोमेजते. मुले हट्टी, हेकेखोर बनतात. मुलांच्या कौटुंबिक, सामाजिक वातावरणाचे ताण-तणाव त्यांच्या मनात रुजलेले असतात. त्यातून बाहेर येत स्वतःच्या अंगभूत प्रेरणांना खुलवण्याची संधी त्यांना हवी असते. तशी संधी शाळेत मिळणे अपेक्षित असते.

वयात येणाऱ्या मुली-मुलांविषयी अशा मोकळ्या वातावरणात फार चिंता राहत नाही. अर्थात या शाळेच्या सुरुवातीच्या काळात ती असायची. अनुभवानंतर ती संपत गेली. शिक्षकांमध्ये दररोज होत असणाऱ्या चर्चांतून अशा बाबी हाताळण्याची वाट सापडत जाते. त्यातही शिक्षकांना तज्ज्ञ, अभ्यासक मंडळींचे नेमके मार्गदर्शनदेखील मिळणे गरजेचे असते. अशा नाजूक बाबी हाताळताना मुलांवर पूर्ण विश्वास टाकणे आवश्यक असते. त्यांचा आत्मविश्वास ढळणार नाही याची काळजी घ्यावी लागते. या वयातील मुला-मुलींमध्ये वैज्ञानिक समज निर्माण करीत असताना समूहजीवनाचे वातावरण कायम राखावे लागते. त्यातून विविध शारीरिक, मानसिक अवस्थांचे अनुभव घेत असताना मुला-मुलींना त्यांचे ओझे वाटत नाही. बालवयात तसेच युवावस्थेत मुलांच्या मनातील तरलता जपणे हे एक मोठे आव्हान असते. मुलांच्या शालेय जीवनात त्याची जबाबदारी कुटुंबातील, समाजातील मोठया माणसांकडे असते. मात्र ती निभावली जात नाही. त्याबाबतची जाणीवही त्यांच्यापाशी नसते. आपल्याकडचे सामाजिक मागासलेपण पाहता, याची मोठी जबाबदारी शिक्षकांकडे येते. शिक्षकांनी ती ओळखून काम करणे अभिप्रेत आहे.

**कला**

संगीत, गायन, नृत्य, चित्रकला, मातीकाम आणि रंगकाम इ. कलांविषयी या मुलांना विशेष रुची असते. प्रयोगभूमीतील रोजच्या संगीत-गायन-नृत्याच्या सरावातून या कला वेगाने विकसित होत जातात. अशा कला व्यक्त करण्याची संधी मिळाली की मुले अधिक फुलतात. त्यांच्यातील कलात्मकता विकसित होत जाते. जी साधने मुलांना आपल्या कुटुंबात उपलब्ध नसतात ती शाळेत मिळाली तर त्यांच्यातील कलात्मकता अधिक फुलत जाते. मुलांना कुटुंबात, वाडीत वर्षभरात साजरे होणारे

सण, लग्नसमारंभ याविषयी केवळ आकर्षण असते असे नाही तर बारीक बारीक गोष्टींबाबतची त्यांची निरीक्षणे खोलवरची असतात. एकदा शाळेत मुलांना लग्नाचा खेळ खेळण्याची हुकी आली. मग हा खेळ सर्वांनीच खेळायचे ठरले. भोवताली जे जे उपलब्ध होते त्याचा वापर करण्यात आला. रंगी-बेरंगी फुलांच्या मुंडावळ्या, स्वयंपाकीण काकूंची साडी अशी साधने जमा झाली. नवरा कोण, नवरी कोण होणार हे ठरले. घरातील अनुभवांचे स्क्रिप्ट तयार होतेच. मग प्रत्यक्ष लग्न, सप्तपदी, नवरा-नवरीमागे सुरीच्या टोकाला लिंबाऐवजी लावलेले कांदे, कान-पिळणी, नवरा-नवरीला खांद्यावर घेऊन निघालेली वरात, एकमेकांचे उष्टे करायला वापरलेले पाव, आहेर देताना घेतलेली पोझ हे सारे काही अगदी सहज साकारले. कलात्मकतेचा सोहळाच जणू संपन्न झाला. प्रयोगभूमीत असे आविष्कार नित्य घडत असतात.

संगीत हा मुलांच्या आवडीचा विषय असतो. पण आपल्या शिक्षणात संगीताला कोणतेही स्थान नसते. संगीत हा रिकामपणीचा उद्योग मानला जातो किंवा ती अभिजनांची मक्तेदारी असते. त्यामुळे एका मोठया क्षेत्रापासून मुलांना वंचित ठेवले जाते. शिवाय हे एक मोठे क्षेत्र दुर्लक्षित राहते. प्रयोगभूमीत संगीताची साधने आहेत. ती रोज सायंकाळी वापरली जातात, फावल्या वेळेत सराव केला जातो. पारंपरिक गीते, नृत्य यांना शास्त्रीय जोड दिली जाते. ताल, सूर, लयीची समज निर्माण व्हायला फारसा वेळ लागत नाही. ढोलकी, हार्मोनियम, बासरीचा वापर करायला आपापल्या आवडीनुसार मुले पुढे येतात. नृत्य आणि संगीत ही कला आहे आणि शास्त्रदेखील आहे. या दोन्ही अंगांनी मुलांच्या शिक्षणात संगीताचा समावेश झाला तर मुलांचे शिकणे आणि जगणेही नाद, ताल, सूरमय होते असा आमचा अनुभव आहे. खेळाबाबतही असेच म्हणता येईल.

मुलांच्या जीवनात अभिव्यक्तीला कोणतेही क्षेत्र वर्ज्य नाही. मात्र आपल्या समाजात शालेय जीवनात संगीत, नृत्य, क्रीडा तसेच इतर अनेक कलात्मक क्षेत्रांना मान्यता नाही. असलीच तर ती स्पर्धांपुरती मर्यादित असते. अभ्यासक्रमात या कलाविषयक क्षेत्रांना स्थान नाही. शालेय अभ्यास, तोही अत्यंत रटाळ पद्धतीचा अशा अत्यंत रूक्ष वातावरणात मुले वाढत असतात. याचा गांभीर्याने विचार करायला हवा. वंचित, दुर्लक्षित समाजघटकातील मुलांना मुख्य प्रवाहाशी जोडायचे तर तो प्रवाहच व्यापक करावा लागेल. अन्यथा ही विपुल ऊर्जा तशीच वाया जाण्याचा धोका आहे. याची समज समाजात निर्माण व्हावी असा प्रयोगभूमीचा प्रयत्न आहे.

**राजन इंदुलकर**
indulkarrajan@gmail.com
9423047620



*With Best Compliments From*

## Shri G N ENGINEERING
(COMMITTED TO ACCURACY)

*Job Work of Precision Components*
*on Vmc, Cnc Turning Lathe*

**VIKASH G YADAV**
Proprietor

**Phone (020) 65115168**
Email : shrignengg@gmail.com

Sr.no., 30/8,30/9, Saraswati Nawle Ind. state, Shop No. 13,
Near prabhat press, Narhe, Wadgaon Khurd, Pune - 411041, India

*With Best Compliments from*

**KALPAK INSTRUMENTS & CONTROLS**

**Technical Solution Provider**

Industrial Estate, Hingane Khurd, Vitthalwadi, Pune : 411 051 (INDIA)
Tel.: +91 20 2434 6363, 2434 6802, Fax: +91 20 2434 6363
Email: kalpakpune@vsnl.com, Website : www.kalpakpune.com



# जीवाचे बांधकाम

**गीतांजली चव्हाण**

गीतांजली चव्हाण यांनी नर्मदा बचाव आंदोलनातील जीवनशाळांसोबत १२ वर्षे काम केले आहे. २००८ मध्ये त्यांनी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस येथून एलेमेंटरी एज्युकेशन मध्ये एम ए केले. सध्या कृष्ण वृंदावन प्रतिष्ठान, दिंडोरी येथे आश्रमशाळांच्या प्रकल्पात प्रकल्प-प्रमुख म्हणून काम पाहत आहेत.

जीवा, माझा मुलगा आता साडेचार वर्षांचा आहे. तो सहा महिन्यांचा असताना मी स्वयंरोजगारासाठी भागीदारीमध्ये वीट बनवण्याचा विचार केला. जीवा साधारण दीड वर्षाचा झाला आणि माझ्या मोटरसायकलवर बसू लागला तेव्हा मी अनेकदा त्याला वीटभट्टीवर नेत असे. तेथे त्याला खेळवायला अनेक मुले होती. परंतु माती निवड, वाहतूक, भिजवणे, कोयला, वीट थापणे, विटांचे साचे, चिखल वाहणाऱ्या गाड्या हे सर्वही त्याच्या परिचयाचे झाले आणि ट्रॅक्टरमध्ये टाकून केलेली वीट विक्रीही त्याने अनुभवली. माती ते घराला लागलेली वीट हा प्रवास जीवाने जवळून अनुभवला.

साधारण एक वर्षानंतर म्हणजे जीवा अडीच वर्षांचा असताना मी मालेगांव येथे घर बांधायला घेतले. स्वतःचा ट्रॅक्टर असल्यामुळे कच्चा माल वाहतूक करणे आणि स्वतःच्या विटा असल्याने कमी खर्चात घर बांधणी हा विचार होता. त्यामुळे कुणी वास्तुविशारद नाही की कुणी ठेकेदार नाही. सारे मीच व सल्लागार घरचे लोक. मजुरांकरवी हे सारे करून घेत असताना जीवा सततच माझ्या आसपास किंवा कडेवर असे.

वीटकाम सुरू असताना वळंबा लावणे व विटांची रचना इ. त्याला माहीत होते. सुतारकाम, सेंट्रिंगकाम, फरशा बसवणे हेही त्याला माहीत झाले होते. दिवसभर तो साईटवर असे व संध्याकाळभर तेच त्याचे खेळही असत. सर्व कारागीर त्यांची अवजारे माझ्या आईकडे ठेवून जात असत. कामगार गेटबाहेर पडताच त्या पिशव्या लगेच बाहेर निघत कारण जीवाचे खेळातील काम या सामानाद्वारेच चाले. त्याच्या बाबांनी त्याला आणून दिलेला खेळण्यातला सुतारकामाचा



संचही तो वापरे तसेच त्याची स्वतःची मीटरपट्टी वगैरे होतीच. तासन्‌तास तो कामात असे. थर्माकॉल शीटच्या मदतीने त्याला प्लायवुडला पर्याय मिळाला होता.

एकदा ब्लॉक्सच्या खेळात तो काही बनवत होता. एक बाजू उंच झाली व दुसरी आखूड. जवळच पडलेली मीटरपट्टी उचलून त्याने अत्यंत सफाईदारपणे मापे घेऊन अंदाज घेतला व दुसऱ्या बाजूला तेवढे ब्लॉक्स लावले. मी व माझी आई आम्ही दोघी हे पाहात होतो. जीवा आमच्याशी गप्पा मारत हे सर्व करत होता व विशेष काही केले असा भावही त्याच्या चेहऱ्यावर नव्हता. त्याच्यासाठी ती अतिशय सहज प्रक्रिया होती. आम्हाला मात्र त्याचे अप्रूप वाटले.

घराचे काम चालू होते तेव्हा जीवा नुकताच बोलू लागला होता, मात्र बोललेले त्याला चांगले कळत असे. त्याच्या संकल्पना स्पष्ट व्हाव्यात म्हणून मी मुद्दाम कारागिरांना प्रश्न विचारात असे. वळंबा का वापरायचा? कोण्या नसेल तर काय चुका होतील? वीट भिजवूनच का वापरायची? वगैरे. त्यामुळे जीवाला हे सर्व कळायचे आणि त्याच्या खेळात ते 'कळलेले' आम्हाला जाणवायचे. त्याचे सर्व खेळ प्रॅक्टिकल असत. अडीच ते साडेतीन या वयात जीवाचे झालेले हे प्रशिक्षण त्याच्यामध्ये खूप मुरले आहे हे वेळोवेळी जाणवते.

आम्ही आता नाशिकला राहायला आलो आहोत आणि येथे एक घर बनवण्याचे नियोजन आहे. मी जिथे नोकरी करते तिथेही बांधकाम सुरू आहे. असेच एक दिवस मी व जीवा सिमेंटच्या चौकटी शोधण्यासाठी ३-४ ठिकाणी गेलो पण मला हवी असलेली ८ बाय ५ फूट ही ऑड साईझ मिळाली नाही. घरी आलो तेव्हा आईने दारातच विचारले, ''काम झाले का?'' मी सांगितले, ''नाही, साईझ ऑड आहे त्यामुळे तसे साचे व डिझाईन त्या लोकांकडे नाहीत.'' जीवा हे ऐकून लगेच म्हणाला, ''तू कशाला टेन्शन घेते मम्मा? मी देतो तुला दोन मिनिटात डिझाईन बनवून. ८ फूट म्हणजे किती उंची हे मला त्या भिंतीवर दाखव.'' मी सांगितले, ''हा दरवाजा ७ बाय ३ चा आहे. त्यावर जो सीएफएल् लावला आहे तो साधारण ८ फूट उंचीवर आहे.'' एवढ्या माहितीच्या आधारावर जीवाने खरेच दोन मिनिटांत दरवाजाचे डिझाईन दिले. आम्ही नाशिकला घर बांधणार आहोत त्याचाही प्लॅन जीवाने घराला येणारा रस्ता, सर्वांच्या खोल्या इत्यादीचा विचार करून बनवून दिला आहे.

माझे जीवासोबत व त्याचे माझ्यासोबत शिकणे सुरूच आहे.

**गीतांजली चव्हाण**
geetanjali.chavan@gmail.com
9423965152



# आक्का, करेक्ट !

**नीलिमा सहस्रबुद्धे**

नीलिमा सहस्रबुद्धे यांचा 'पालकनीती'च्या संपादन गटात १९९३ पासून तर 'शैक्षणिक संदर्भ'च्या संपादन गटात १९९९ पासून सहभाग राहिला आहे. याबरोबरच वेगवेगळ्या शाळांना भेटी देऊन मुलांना विज्ञान-खेळणी, प्रयोग, कागदकाम इ. शिकवण्याचे काम त्यांनी केले आहे. सध्या त्या खेळघरातल्या मुलांसोबत काम करतात.

पुविधाम, ता. जि. धर्मपुरी, तमिळनाडू.

ही लहानशी निवासी शाळा गावापासून थोडी दूर, एका माळरानावर उभी आहे. खरं तर हे एक मोठ्ठं कुटुंबच म्हणायला हवं. मुलांनी चांगलं शिकावं अशी आस असलेल्या आणि जवळ पुरेसं आर्थिक पाठबळ नसलेल्या जवळच्या गावांमधल्या पालकांची मुलं इथे राहतात, शिकतात. त्यांचे काही शिक्षकही त्यांच्या सोबत राहतात. शाळेचे संचालकदेखील इथेच राहतात.

या शाळेत एका आठवड्यासाठी मी आणि माधव येऊन दाखल झालेलो आहोत. एप्रिल महिना सुरू आहे. शाळेला पुढच्याच आठवड्यात सुट्टी लागणार आहे. हा आठवडा नव्या गोष्टी शिकण्याचा आहे. आठवी ते दहावीची वीसेक मुलं चरखा चालवायला शिकणार आहेत, शिवाय किरिगामी म्हणजे कागदावर कापून आणि घड्या घालून नक्षी तयार करायला शिकणार आहेत. त्यासाठी ५-६ चरखे आणि कागद कापायला धारदार पाती, कागदाखाली ठेवायला काचा असं मोजकं साहित्य आणून



तयार आहे. अर्धी मुलं चरखा शिकतील तेव्हा बाकीची किरिगामी !

सातवीपर्यंतच्या मुलांना खरं तर आत्ता सुट्टी आहे, पण तरी अजूनही १५-१६ मुलं शाळेत आहेत. आपल्या दादा-ताईंबरोबर सुट्टीतही काहीतरी नवीन करायची त्यांना जोरदार इच्छा आहे. म्हणून त्यांच्यासाठी टकळीवर सूतकताई आणि नंतर ओरिगामी असा प्लॅन आहे.

सूतकताई चालू होती तोपर्यंत फारसं लक्षात आलं नाही, पण ओरिगामी करायला बसलो आणि माझ्या लक्षात आलं, की मी जे काही बोलते आहे, त्याचा अर्थ मुलं माझ्या हाताचेहऱ्याकडे बघूनच लावत आहेत. त्यांना माझं इंग्रजी किंवा हिंदी किंवा मराठी सारखंच अनाकलनीय आहे, आणि मला त्यांचं तमिळ! मग तुम्ही आधी काय शिकला आहात, तुम्हाला काय करायला येतं आणि आज काय करायला आवडेल... असली सुरुवात गिळून टाकत मी एक बेडूक करूनच दाखवला. तो उड्या मारायला लागल्यावर त्यांनी मला सांगितलं की येस! हाच करूया आपण. म्हणजे मला तसं ऐकू आलं... आणि ते बरोबरच असणार! हा आमचा पहिला बेडूक होईपर्यंत सुरुवातीला आम्ही ज्या मोठ्या ऐसपैस गोलात बसलो होतो, त्याचा आकार आत आत यायला लागला. दोघं-तिघं तर माझ्या पुढ्यातच येऊन बसली होती. जराशी पुढे गेलेली मुलं त्यांच्या मित्रमैत्रिणींना शिकवायला लागली होती. एकदोघांचे बेडूक शर्यतीत उतरले होते, आणि एकंदरीनं धमाल चालू झाली होती.

मग पुढे करायचा होता मोर. मला आपलं वाटलं होतं की हा फक्त मुलींनाच आवडणार, तसं काही झालं नाही, तो मुलग्यांना तितकाच आवडला. नंतर





केलेल्या भिरभिऱ्यांना आणि भिंगऱ्यांनादेखील तसाच प्रतिसाद होता. एव्हाना माझ्या डाव्या मांडीवर एक, उजव्या मांडीवर दोन आणि खांद्यावरही एकेक मूल रेलून बसलेलं होतं. प्रत्येकाला त्याच्या हातातली वस्तू करणं हेच सर्वात महत्त्वाचं काम असल्याची खात्री होती. त्यांच्या तोंडी मात्र दोनच शब्द होते– आक्का, करेक्ट? मला तोंडानं येस किंवा नो म्हणता येण्याची काही शक्यता नव्हतीच... मान हलवूनच ते सांगायचं होतं, आणि घडी चुकली असेल तर ती करूनच दाखवायची होती. थोड्या वेळानं माझ्या लक्षात आलं, की या घड्या करताना आपण मराठीतच बोलायला सुरुवात केलीय आणि ते सगळं मुलांना नीटच समजतं आहे. ओरिगामीची भाषा– माउंट फोल्ड, व्हॅली फोल्ड, प्लस किंवा क्रॉस फोल्ड हे त्यांना एव्हाना लक्षात यायला लागलं होतं.

आणि आपण कसं नवीन काहीतरी करतोय, आणि ते कसं धम्माल आहे, हे त्यांनी त्यांच्या ताई–दादांना सांगितलंही होतं. मोठ्या मुलांना त्यांच्या ठरलेल्या कामामध्ये जरासा अवकाश सापडला तर तीसुद्धा मधेच येऊन काहीतरी करून, शिकून जात होती.



दुसऱ्या तिसऱ्या दिवसापर्यंत आमचे तीन–चार वेगवेगळे ओरिगामी क्लब सुरू झालेले होते– एक खेळण्यांचा, एक सजावटीचा, एक डबे–डब्ब्या तयार करण्याचा. शिवाय आमच्यात देवाणघेवाणही चालू झाली होती. मला मुलांना शिकवायचं होतंच, शिवाय मुलांनाही मला काही गोष्टी शिकवायच्या होत्या आणि या सगळ्यासाठी, आक्का, करेक्ट?' किंवा 'आक्का, करेक्ट!' एवढीच शब्दसंपत्ती आम्हाला पुरेशी होती.

या दोन शब्दांनी त्या आठवड्यात माझ्यापर्यंत कायकाय पोचवलं होतं! तू जे करते आहेस, ते आम्हाला आवडलं आहे, आम्हाला ते करायचंच आहे, आमच्या शिक्षकांनाही दाखवायचं आहे. भाषा कळत नसली तरी आम्हाला ते नक्की समजणार! आम्हाला नवीन शिकायला खूप आवडतं. नवीन माणसंही आवडतात, आणि तूदेखील आवडली आहेस !!

आठवडा संपून आम्ही जेव्हा परत निघालो, तेव्हा सक्काळी–सक्काळी पावणेसहाला सगळी छोटी मुलं आम्हाला टाटा करायला म्हणून साखरझोपेतून उठून तयार होती. याहून जास्त काय हवं?

**नीलिमा सहस्रबुद्धे**
neelimasahasrabudhe@gmail.com
8007907054

*With Best Compliments from*

**Nirmiti Engg. Works**

**Rajendra Sitaram Konde**

**Sr. No. 34, Shop No. 4**
**Ingale Vasti, Narhe Pune.**

# मजेत शिकण्याचा जादुई मंत्र



**प्रकाश बुरटे**

प्रकाश बुरटे यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण सोलापूर येथे झाले. आय आय टी, मुंबई येथून पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर काही काळ त्यांनी भाभा अणुसंशोधन केंद्रात नोकरी केली. अनेक वृत्तपत्रे, नियतकालिके यातून १९७७ पासून ते सातत्याने साहित्य, कला, विज्ञान, समाज-विज्ञान संबंध, सामाजिक प्रश्न, शिक्षण अशा विविध विषयांवर लिखाण करत आले आहेत.

पुस्तकांची आणि दप्तरांची ओझी वाहून पाहा, ज्ञान जड असते हे विधान लगेच पटेल. परंतु त्याला एक मस्त पर्याय आहे. घडलेला प्रसंग सांगतो म्हणजे पर्याय चटकन लक्षात येईल. आमच्या एका नातेवाईक स्त्रीला मुलगा झाला होता. तीन महिन्यांनी ती बाळाला घेऊन सासरी आली. तिला आणि बाळाला भेटण्याला आम्ही गेलो होतो. वेळ बाळाच्या भुकेची होती. पोटोबा भरल्यावर आईच्या मांडीवर विराजमान होऊन आजूबाजूचे जग टकामका बघत होती स्वारी. आई त्याला विचारत होती, ''भूक लागली म्हणून रडत होतास? मला कळलंच नाही. आता पोट भरलं का?'' मुलगा आईकडे प्रसन्न नजरेने बघत होता. नंतर आईने मुलाला दुपट्यावर ठेवले आणि त्याच्या गालावर हात ठेवून तर कधी त्याच्या पाप्या घेऊन विचारत होती, ''मग पुढे काय झालं? अस्सं, मग तू काय केलंस, हाताची मूठ तोंडात घातलीस तर तुला गोष्ट कशी सांगता येईल? अच्छा तर तुला आता पायाचा अंगठा धरता येतोय तर...'' आणि असेच काही काही. आई थांबली की बच्चमजी तोंडाने जमतील तसे आवाज काढत गोष्ट सांगत होते. पुन्हा आईने काही विचारण्याची वाट पाहत होते. आवाजांना त्याच्या चेहऱ्यावरील हावभाव काही अर्थ देत होते. आई-मुलाचा संवाद मस्त चालला होता. जणू भाषा शिकण्याची पूर्वतयारी चालू होती. हे आवडीचे शिकणे आहे, पटतेय ना?

आई-बाबाचे बोट धरून संध्याकाळी शेजारच्या बागेत एक मुलगी फिरत आणि खेळत होती. असेल ती चार-पाच वर्षांची. अचानक तिला जमिनीवरून अगदी सावकाश जाणारा आणि पाठीवर शंख असणारा एक किडा दिसला. त्याच्या शेजारी बसकण मारून त्याच्याकडे ती लक्षपूर्वक पाहात राहिली. तो प्राणी चालताना कसलाच आवाज करत नव्हता. मातीतून सावकाश चालत होता. चालताना रुळवलेली आपली वाट ओली करत होता. तो किडा तोंडातून थुंकी काढतोय का शू करतोय, ते तिने आई-बाबांना एकदोनदा विचारले. आई-बाबांना तिथेच खाली बसायला सांगितले. पण ते काही तरी बोलण्यात रंगले होते. आईची साडी आणि बाबाची पँट ओढून त्यांचे लक्ष वेधून घेत त्यांना पुन्हा एकदा खाली बसायची जागा खूण करून दाखविली. आई खाली वाकून त्या किड्याकडे पाहू लागली. बाबा बसून एका वाळल्या पानावर त्या किड्याला घेण्याचा प्रयत्न करत होता. त्या किड्याला न घाबरणारा बाबा तिला एकदम शूर वाटू लागला. आई कुरकुरत म्हणाली, ''कुठंही काय बसलाय, आणि ती लिबलिबीत गोगलगाय, शी! मला नाही आवडत.'' या किड्याचे नाव 'लिबलिबीत' किंवा 'गोलगाय' असल्याचे तिला बहुतेक कळाले असावे. तिच्या चेहऱ्यावर या शब्दांची मज्जा उमटली. या क्षणाला तिला बाबा एकदम आवडू लागला. त्याचा दंड पकडून 'लिबलिबीत'कडे ती पाहात बसली. आई थोडी लांब हिरव्या गवतावर बसली. आईला नंतर 'लिबलिबीत गोलगाय'ची गोष्ट सांगायची सूचना तिने बाबाला देऊन ठेवली. मुलगी गोगलगायीसारखे चालून पाहात होती आणि हे शिक्षणदृश्य पाहायला मजा येत होती.

लहानपणी तुमच्यासोबत त्या मुलीच्या आई-बाबांप्रमाणे खेळणारे आई-बाबा तुमच्या वाट्याला आले असतील, तर मोठेपणी तुम्हाला गिजुभाईंची शेजारच्या चौकटीतील कविता नक्की आठवेल. परंतु ती न आठवतासुद्धा तुम्ही तुमच्या मुलांसाठी 'मूँछोंवाली बा' म्हणजे गिजुभाईंच्या सल्ल्याप्रमाणे प्रेमाने वागाल.

**शिक्षणतज्ज्ञ गिजुभाई बधेका**
(१५ नोव्हेंबर, १८८५ ते २३ जून, १९३९)

जर तुम्हाला मुलांसाठी
एकच गोष्ट करायची असेल
तर त्यांना मारणे सोडून द्या.
दोन करायच्या असतील
तर त्यांना रागावू नका आणि
त्यांचा अपमान करू नका.
तीन करायच्या असतील
तेव्हा त्यांना घाबरवू नका.
कसलीही लालूच दाखवू नका
आणि डोक्यावर बसवू नका.
चार गोष्टी करायच्या असतील
तेव्हा त्याला सारखा उपदेश करू नका,
सततच्या लाड प्रेमापासून त्याला वाचवा.
पाच गोष्टी करायच्या असतील
तर मुलाला तुमच्याकडून
जे काम करून हवे आहे,
ते त्याला करायला शिकवा.

''आजोबा, आपण सीगलसारखे का उडू शकत नाही?'' साडेचार वर्षांच्या नातीने एकदा विचारले. ''कोण म्हणतं, आपल्याला उडता येत नाही? आपण दोघे

समुद्रावरून सीगलसारखे उडू शकतो; चल, उडूया. तयार आहेस? अगं हो म्हण ना, घाबरतेस काय? मी आहे की सोबत. हाँ! आता कशी आमची गोंडुली खुशीत आली. चल, आता उडायची तयारी करूया. माझ्यासारखा उजवा पाय गुडघ्यात थोडा वाकवून पुढे टाक. छाती ताठ ठेवून थोडं पुढं झुकायचं; डावा पाय मागं; दोन्ही पायाचे फक्त चवडे टेकायचे, टाचा नाही टेकवायच्या. आता दोन्ही हात जमिनीला समांतर आणि एका रेषेत ठेव. नाही कळालं तर माझ्याकडे पाहा. हाँ, बरोबर पोज आहे. आता डोळे मीट. मीपण डोळे मिटून मनातल्या मनात जादूचा मंत्र म्हणणार आहे. तुझ्या हातांचे पंख झालेले दिसतायत मला. झाले ना पंख?'' ''हो, रे हो. तुझ्यापण हातांचे पंख झालेयत. मला दिसतात.'' ''आता पक्ष्याप्रमाणे पंख हलवायचे. तुझे पाय आपोआप उचलले जातील. जातायात ना? भीती वाटली, तर माझा एक पंख तुझ्या पंखानं धरून ठेव. बंद डोळ्यांनीच खाली पाहा. दिसतोय समुद्र आणि त्याच्यावरच्या लाटा? लांब तिकडे पुढे पुढे जाणारे ठिपक्यासारखे समुद्रात काय दिसतंय, गं?''

नात म्हणाली, ''अरे आजोबा सीगल, तू पण असा रे कसा, चष्मा विसरून सगळीकडे फिरतोस? मी बघ बायनॅक्युलर घेऊन आलेय. तरी पण डोळे मिटूनच बघते हाँ, बायनॅक्युलरमधून. अरे ती तर मोठी बोट आहे. आणि त्या बोटीच्या मागून एक देवमासा कधी पाण्यावरून तर कधी पाण्याखालून येतोय. बोटीच्या कॅप्टनला आपण सांगायचं का? अरे रे, आपण बोटीवर पोहोचेपर्यंत तो देवमासाच तेथे पोहोचला की. आणि बघ, बघ तो बोट गिळतोय! सगळीच्या सगळी बोट गिळली त्यानं!''

''बापरे! आता आपण गं काय करायचं?'' विंदांच्या कवितेतील देवमाशाप्रमाणे नात याही देवमाशाला डॉक्टरकडे घेऊन जाते. लगेच गोष्टीतले रोल बदलतात. तेव्हा तीच डॉक्टर झालेली असते. डॉक्टर देवमाशाच्या पोटाचे ऑपरेशन करतात. ऑपरेशन करताना विचारतात, पोट कापताना दुखलं नाही ना? रक्त न्हाई ना आलं?'' शेवटी बोट बाहेर काढतात. समुद्रावर उडण्याच्या खेळाचा शेवट विंदांची ती कविता म्हणून होतो. या खेळातून ती चिमुरडी पोर बरेच काही शिकली असेल; आणि आजोबादेखील लहान मुलांशी कसे खेळायचे ते शिकला असेल. त्यात त्यालाही मजा आली.

कधी आम्ही उंदीर असतो, आणि कधी 'उंदीर टाईम्स' वाचून कोणत्या घरातील फ्रीजमध्ये बटर आणि चीज आहे, त्या घराचा पत्ता लक्षात ठेवतो. ते घर नेमके नातीचेच निघते. सगळे झोपलेले असताना आम्हा उंदरांना फ्रीजमधील चीज, बटर आणि ब्रेडचा फडशा पाडायचा असतो. उंदीर येतात म्हणून प्रत्येक दिवसाच्या गोष्टीत पुढीलपैकी एक तरी अडथळा असतो उंदीर पकडायचे पिंजरे, चिकट कागद, पाळलेली मांजरे, आमच्या खुडबुडीने जाग येऊन काठ्या, झाडू अशी हत्यारे घेतलेली मोठी माणसे, इत्यादी. सगळ्यांना चुकवत मोहीम फत्ते होत असते. नातीला कधी आजीकडून जादूच्या बुटांची गोष्ट ऐकायची असते, तर कधी ती आणि तिची आई मस्त मस्त चित्रं काढत बसतात. मग गोष्ट-बिष्ट लागत नाही.

अमेरिकेत १९२४ मध्ये जन्मलेल्या आणि ८१ वर्षांचे समृद्ध आयुष्य जगलेल्या डोरोथी नोल्टे यांनी १९५४ साली लिहिलेली आणि नंतर मुलांच्या हक्कांच्या जाहीरनाम्यास कारणीभूत ठरलेली सोबतची कविता गिजुभाईंच्या कवितेमागील कारणांची उकल करतेय असे वाटते. ही कविता सगळ्या संवेदना जाग्या ठेवून वाचली, तर लक्षात येईल की मुलांचा स्वभाव, त्यांचा आत्मविश्वास, इतरांवरील विश्वास, मैत्री करण्याचे कौशल्य, मोकळेपणा... अशा व्यक्तिमत्वातील अनेक गोष्टींचे श्रेय आजूबाजूच्या मोठ्या माणसांकडे (पालक, शेजारी, शिक्षक इ.) देखील जाते. स्वभावाचे सगळे कानेकोपरे आणि विशेष फक्त अनुवंशिक नसतात. जे स्वभावाचे तेच हुशारीचेदेखील असते. अनुवंशिकता आणि जगाचे प्रत्यक्ष दर्शन देण्याच्या संधी हुडकणारे आणि उलगडणारे

## Children Learn What They Live



**Dorothy Law Nolte**

***If children live with criticism,***
***They learn to condemn.***
***If children live with hostility,***
***They learn to fight.***
***If children live with ridicule,***
***They learn to be shy.***
***If children live with shame,***
***They learn to feel guilty.***
***If children live with encouragement,***
***They learn confidence.***
***If children live with tolerance,***
***They learn to be patient.***
***If children live with praise,***
***They learn to appreciate.***
***If children live with acceptance,***
***They learn to love.***
***If children live with approval,***
***They learn to like themselves.***
***If children live with honesty,***
***They learn truthfulness.***
***If children live with security,***
***They learn to have faith in themselves and others.***
***If children live with friendliness,***
***They learn the world is a nice place in which to live.***

http://www.empowermentresources.com/info2/childrenlearn.html

संगोपन यांच्या ऊन-सावल्यांच्या खेळातून हुशारीदेखील घडते. जाता जाता एक गोष्ट आपण पक्की लक्षात ठेवली पाहिजे. हुशारी म्हणजे फक्त पटापट गणिते सोडविणे नसते. हुशारी अनेक प्रकारची असते. संगीताचे सूर उमजणे, चित्र-विषय सुचणे, चेहरा आणि संपूर्ण शरीर गोष्ट सांगण्या-ऐकण्याचे साधन बनविणे, एवढेच नव्हे तर स्वतः आणि इतरांसोबत चांगला संवाद साधता येणे, शब्द आणि आशयाशी खेळणे, हे सारे हुशारीचेच तर प्रकार आहेत. हॉवर्ड गार्डनर यांनी सांगितलेले हुशारीचे आठ प्रकार कदाचित आपल्या परिचयाचे असतील. नसतील तर इंटरनेटच्या सर्च इंजिनाला आवर्जून विचारा. हुशारीचे आठ प्रकार म्हणजे जीवन कौशल्येदेखील आहेत. त्यांचा आधार पक्का असेल तर समाधानाने जगणे सोपे जाते.

माणूस सुमारे दोन अडीच लाख वर्षांपासून या भूतलावर वावरत आहे. बराच काळ लोटला तेव्हा कुठे अनेक प्रकारच्या प्राथमिक माहितीचा काही संचय झाला. उदाहरणार्थ, अग्नी, निवारा, शेती, काही धातू, ही तंत्रे हाती आली; विवाहसंस्था, कुटुंबसंस्था या संदर्भात काही प्रयोग घडले; रात्री आकाशात उगवणारे ग्रह-तारे यांचे विश्व आणि दिवसा सभोवताली दिसणारे पृथ्वीवरील वास्तव (समुद्र, पर्वत, नद्या, बर्फ, वादळे पूर, दुष्काळ, ऋतुमान, दिवस-रात्र, ग्रहणे, चंद्रकला, अन्न पुरवठा-शिकार करणे आणि कधी शिकार होणे...) यासंबंधी काही ठोकताळे मनात रुजले आणि ते पुढील पिढ्यांना दिले जाऊ लागले.

अशा नाना प्रकारच्या बदलांमुळे गेल्या दोन-चार हजार वर्षांत निवडक मुलांच्या शिक्षणाची काही एक व्यवस्था तयार होऊ लागली होती. सगळ्या मुलांचे शिक्षण घरी आणि परिसरात जमतेच असे नाही, ही मानवी समाजाची मर्यादा गेल्या दोन-तीनशे वर्षांत लक्षात आली. त्यातून शिक्षक, शाळा, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, परीक्षा अशा व्यवस्थेची गरज जाणवली. औपचारिक शिक्षणव्यवस्था उभारण्याला जगभर सुरुवात झाली. त्यांना समांतरपणे उत्पादनांसाठी कारखाने उभारले जात होते, त्यातून 'क्वालिटी कंट्रोल', 'रिजेक्ट माल' अशा संकल्पना समाजात रुजत होत्या. बहुतेक ठिकाणी कारखान्यांतील उत्पादनपद्धती आणि सैनिकी शिस्तीने बांधलेले ट्रेनिंगचे वस्तुपाठ गिरविले जाऊ लागले. त्यात शिकणारी मुले हे जणू शाळांरूपी कारखान्यांतून तयार होणारे उत्पादन ठरले. त्यात क्वालिटी कंट्रोलसाठी परीक्षा घेऊन रिजेक्ट माल क्रूरपणे बाहेर फेकण्याची व्यवस्था उभारली. मुलांची सर्जनशीलता जपली जाण्याला या व्यवस्थेत स्थान नव्हते.

मुले स्वतः शिकतात, त्यासाठी आजूबाजूच्या पाऊलवाटा त्यांना साद घालत असतात; मोठ्यांनी त्यासाठी पूरक वातावरण उभारायचे असते, बाहेरचे विश्व शाळेत आणायचे असते, तर कधी मुलांना अनुभवांचा अर्थ लावायला उद्युक्त करायचे असते, हे भान व्यवस्था उभारणाऱ्या बहुसंख्य व्यक्तींच्या मनात साकारले नाही. असे भान शिक्षणव्यवस्थेबाहेर आढळले. त्यामागे अनेक क्षेत्रांचा ध्यास घेतलेली मंडळी होती. असा इतिहास रचणारे अवलिये व्हॅन गॉग, दाली, पिकासो, हुसेन यांच्यासारखे चित्रकार असतील; नाही तर गायक संगीतकार असतील. ते कधी गॅलिली गॅलिलीओ, केप्लर, कोपर्निकस असतील, नाही तर कामू, काफ्का, दोस्तोवस्की असे साहित्यिक असतील. त्यांनी झोकून दिलेल्या आयुष्यातून इतिहास रचला होता.

तो इतिहास नजरेआड करत त्यांच्या सर्जनशीलतेचे फक्त माहितीत रूपांतर करणे, ती माहिती शालेय ते विद्यापीठीय शिक्षणाचा भाग बनविणे, असा करंटेपणा शिक्षणव्यवस्थेत उतरला. उदाहरणार्थ सूर्य-चंद्र, तारे (स्थिर ध्रुव ताऱ्याचा अपवाद) आणि मोजके ग्रह आकाशात पूर्व क्षितिजावर उगवताना आणि पश्चिमेकडे प्रवास करत शेवटी पश्चिम क्षितिजावर मावळताना उघड्या डोळ्यांनी दिसतात. दुर्बिणीतून आकाशनिरीक्षण केले तरी निष्कर्ष बदलत नाही. परंतु गॅलिलीओ यांनी मात्र आजच्या तुलनेत मागास दुर्बिणी वापरून उलटा निष्कर्ष काढला: पृथ्वीच सूर्याभोवती फिरते आहे. त्यावर खगोलशास्त्रातील तज्ज्ञांनी शिक्कामोर्तब केले. त्यामुळे गॅलिलीओ यांचा निष्कर्ष शिक्षक, पाठ्यपुस्तके यांनी शिरसावंद्य मानला. गॅलिलीओचा मृत्यू १६४२ मधील, म्हणजे त्यालाही केव्हाची साडेतीनशे वर्षे झाली आहेत. या प्रदीर्घ काळात प्रत्यक्ष निरीक्षणाच्या विरुद्ध जाणारे 'पृथ्वी सूर्याभोवती फिरते' हे विधान का बरोबर आहे, यामागील कारणे शिक्षक आणि पाठ्यपुस्तके यांच्यापर्यंत पोहोचली नाहीत. शिक्षणव्यवस्थेचे असे वर्तन फक्त दूरच्या ग्रहगोलांच्या गतीविषयी नाही; ते सर्वच विज्ञानशाखांच्या संदर्भात आहे. हवेत प्राणवायू किती, हे मोजण्यासाठी काचेच्या हंडीखालील मेणबत्तीच्या ज्वलनाचा एक प्रयोग असाच पिढ्यानपिढ्या सर्व बोर्डांची पाठ्यपुस्तके छापत आली आहेत. हंडीत पाणी चढते, त्याचे कारण 'ज्वलनासाठी प्राणवायू वापरला गेला आणि ते आकारमान पाण्याने व्यापले,' असे सांगितले जाते. मेणबत्ती जळते तेव्हा घडणाऱ्या रासायनिक प्रक्रियांचा विचार केला, तर या कारणातील फोलपणा ध्यानात येईल. हाच प्रयोग एक हंडीखाली एक आणि त्याच आकाराच्या दुसऱ्या हंडीखाली दोन किंवा जास्त मेणबत्या ठेवून केला, तर हे कारण चुकीचे असल्याचे प्रयोगाने समजेल. सूक्ष्मजीव (मायक्रो ऑर्गनिझम), व्हिटॅमिन, अणू आणि त्याहीपेक्षा जास्त मूलभूत कण यांच्या अस्तित्वाबाबतदेखील पाठ्यपुस्तकांचे वर्तन असेच अवैज्ञानिक आहे. हे नक्कीच टाळता येते.

शिक्षण माणसाचे कुतूहल शमवू शकते, विद्यार्थ्यांना सर्जनशीलतेचा अनुभव देऊ शकते, त्यात आनंद आहे. तो आनंदानुभव विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा शिकण्या-शिकविण्याचा गाभा बनेल अशीच आपल्या प्रयत्नांची दिशा असली पाहिजे, नाही का?

**प्रकाश बुरटे**
prakashburte123@gmail.com
9987943666

*With Best compliments From !*

# CONCEPT ELECTRONIC ENGINEERING SOLUTIONS PVT. LTD.

Plot No. 54, Chinmay, Mayur Colony,
Kothrud, Pune 411 038
Maharashtra
Ph. : 020-25459232, 25459233
Mobile : 09850047898
Email : sanjaypataskar@ceespl.com

## 'मिळून साऱ्याजणी' ची तेजोमय दिवाळी भेट

**दिव्यांच्या उत्सवात सौरऊर्जेच्या निमित्ताने भेटणारा वेगळा 'प्रकाश'**

विपुल नैसर्गिक संसाधनांनी समृद्ध असणाऱ्या भारताची लोकसंख्याही अफाट आहे! तिची ऊर्जेची प्रचंड गरज पूर्ण करण्यासाठी सौरऊर्जा हा एक महत्त्वाचा ऊर्जा स्त्रोत आहे. जगाचा हा 'मित्र' आपल्याला शाश्वत आणि सुरक्षित ऊर्जा देतो. पण हे देणं स्वीकारायला आपलीच झोळी दुबळी ठरते. हे दुबळेपण नष्ट करण्याची प्रामाणिक इच्छा आहे. त्या दिशेनं जाणारं एक पाऊल म्हणून सौरऊर्जेची सांगोपांग माहिती देणारा विशेष विभाग दिवाळी अंकात सादर करत आहोत.

डॉ. श्याम आसोलेकर हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संशोधक आणि शास्त्रज्ञ व तरुण कार्यकर्ता कल्याण टांकसाळे या विशेष विभागाचे अतिथी संपादक आहेत. सौरऊर्जेचा शास्त्रीय, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अशा विविध परिमाणांचा परामर्श डॉ. सतीश अग्निहोत्री, डॉ. रंगन बॅनर्जी, डॉ. आनंद राव असे नामांकित तज्ञ घेत आहेत. याबरोबरच अरुण देशपांडे, चेतन सोळंकी, नरेश जोशी, सारिका केळकर यांच्या मदतीने सौरऊर्जेबाबतचं संशोधन आणि प्रत्यक्षात उतरलेले छोटे मोठे प्रयोग आपल्याला समजून घेता येतील.

हे वर्ष युनोने 'प्रकाश वर्ष' म्हणून जाहीर केले आहे. अशा प्रकाश वर्षातली ही तेजोमय दिवाळी भेट.

या अंकातला विशेष विभाग

**सौरऊर्जा : वास्तवाचा वेध**

- **याशिवाय कथेच्या दालनात**
  नीरजा, पंकज कुरुलकर, वंदना भागवत
- **अनुवादित कथा**
  कुर्रतुलैन हैदर, अमृता प्रीतम
- **सुरेल ओळख** – स्नेहा खानवलकर
  पद्मजा फाटक 'मजेत' यांच्याविषयी दीपा गोवारीकर, आनंद ओक, मृणाल पर्वतकर आणि प्रसन्न पेठे यांच्या लेखांचं कोलाज
- **विशेष लेख**
  डॉ. अनुराधा सोवनी, लक्ष्मीकांत देशमुख, दीपा देशमुख आणि अच्युत गोडबोले, विद्या कुलकर्णी
- **कविता आणि इतरही बरंच काही**

**मूल्य १५० रु**

**तीन किंवा तीनपेक्षा जास्त अंक घेतल्यास सवलतीच्या दरात प्रत्येक अंक रु. १००**

*Best Compliments From*

**DIVAKAR B. SHIDHAYE**
9822282456

**GENAU**ENGINEERS
**committed to accuracy**

**An ISO 9001 : 2008 company**

Job work of Precision Components on CNC Turning Lathe

---

*Works : Sr. No. 36/1/1/, Sinhagad Road, Near Hotel Green Field,*
*Wadgaon (Khurd), Pune - 411 041.*
*Tel. : 020-2439 4987. Email : geneauengineers@gmail.com*

*With best compliments from*

# Diligent Solutions Technology Services Pvt. Ltd.

**A. N. Bapat**
Director

7, Chintamani Apts. Plot No.16,
Chintamani Society, S. No. 25/4,
Karvenagar, Pune 411052.
Telefax : +91-20-25454446
Mobile : 9822450104, 9730200711
E-mail : dstspune@yahoo.co.in

*With Best Compliments From*

# Suresh Press Works

**Manufacturers**
**of**
**Pressed Components & Job Works**

Proprietor

**D. T. Wadhokar**

Plot No. 50, Block Dlll. MIDC,
Chinchwad, Pune - 411 019.
Ph : 2747 3694 / 2747 1395
Fax : 020 - 27470 327

With Best Compliments From

# WORLD CLASS
## Hoists & Cranes


Electric Wire Rope Hoist


Electric Chain Hoist




Flame Proof Wire Rope Hoist

**Hoists :**

- ☐ Electric Chain Hoists (250 kg to 2T)
- ☐ Electric Wire Rope Hoists
- ☐ Flame Proof Hoists (upto 5 T)
- ☐ Bi-rail-crabs

**Cranes :**

From 1 T to 50 T

- ☐ Overhead travelling cranes
- ☐ Underslung cranes
- ☐ Jib cranes
- ☐ Gantry/Semigantry cranes

- ☐ Experience of more than 33 years
- ☐ Proven German technology
- ☐ More than 12000 installations
- ☐ Complete service in selection of equipment, designing, manufacturing, installations and commissioning
- ☐ Being used for variety of applications. Reliable after sales service

ISO 9001 COMPANY

SWIFT

CONSOLIDATED HOISTS PVT. LTD.
**REGD.OFFICE & WORKS I :**
29/30, Gultekdi Ind.Estate, Pune 411 037 (India)
Phone : 020 - 2427 1428, 2427 1429, 2427 1430
Fax : 020 - 2427 0246
E-mail : chpl@vsnl.com

**MUMBAI OFFICE :**
Union Co-operative Ins.Society Building,
Sir. P. M. Road, Fort, Mumbai 400 001
Telefax : 022 - 2870333
E-mail : chpl1mum@vsnl.net

Enquires for Dealers / Liaison Agents solicited








At Post Valane, Taluka - Mulshi, Dist - Pune 411 040.
Telephone : +91 020 8888000055/+91 020 8806000055
For Booking : + 91 020 27293999
Email : malharmachi@gmail.com / info@malharmachi.com
Website : www.malharmachi.com

*With Best Compliments From*

## T. WALKER'S PHARMACEUTICALS PVT. LTD.

Our Product range

Adrenaline
Atropine 1ml./10 ml.
Ascorbic Acid
Aminophylline
Potassium Chloride
Sodium Chloride 10 ml./25 ml.
Twacal
Methylene Blue 1 ml./10 ml.
Soda. Bicarb. 10 ml./25 ml.
Dextrose 25% / 50%

Ringer Lactate Conc. 20 ml.
Diclofenac 3 ml./30ml.
Lignocaine & Adrenaline 30 ml.
Twafylin
Ranitidine
Metoclopramide 2 ml. / 10 ml.
Lignocaine & Dextrose (Heavy)
Water for inj. 5 ml. / 10 ml.
Glycopyrrolate Injection

## T. WALKER'S PHARMACEUTICALS PVT. LTD.

Factory :
Gat No. 285, B,
Village Kasaramboli,
P.O. Ambedvet. Tal. Mulshi,
Dist. Pune - 411 004.
Ph. : (020) 22922422 /2 2922449
Fax : (020) 22922475

Pune Office : "Vishnupad "
5 th Lane, Subhashnagar,
1253, Shukrawar Peth ,
Pune - 411 002.
Phone : (020) 2447 5959
Telefax : (020) 2446 7699
Email : t.walker@vsnl.net